म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १००८
१५५५

# उपेक्षित मानकरी

चिंतामण गणेश कर्वे

REFBK-0009295

११०४
७३८२९
८१०
७।३।७१

[illegible] संग्रहालय, ठाणे. स्थापना
विभाग [illegible] ७३८२९ वि: [illegible]
अनुक्रम ................
क्रमांक ११०४ नों: दि: ८-३-७१

मराठी साहित्यांतील

# उपेक्षित मानकरी

मराठी ... ग्रंथालय ठाणे
ग्र. क्र. ८२८५
... शाखा

चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.
कोशसंपादक व संशोधक

मूल्य रु. २·५०

REFBK-0009295

व्हीनस प्रकाशन : पुणें

प्रकाशक :
**सदाशिव कृष्ण पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २

★

आवृत्ति पहिली, डिसेंबर १९५७

★

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

★

मुद्रक :
**श्रीपाद जगन्नाथ गानू**
राजगुरु प्रेस
४०५ नारायण : पुणें २

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

चरित्रें :— पृष्ठें

१. सदाशिव काशिनाथ छत्रे १
२. हरि केशवजी पाठारे ७
३. गोविंद नारायण माडगांवकर १५
४. केरूनाना छत्रे २३
५. बाबा पदमनजी ३१
६. रघुनाथ भास्कर गोडबोले ४०
७. वामन दाजी ओक ४८
८. नीळकंठ जनार्दन कीर्तने ५७
९. नारायण बापूजी कानिटकर ६५
१०. महादेव बल्लाळ नामजोशी ७५
११. महादेव शिवराम गोळे ८४
१२. गंगाधर वामन लेले ९३
१३. लक्ष्मण नारायण जोशी १०२

पुरवणी :—

१४. महादेव गोविंद कोल्हटकर ११४

परिशिष्ट :—

१८५७ पर्यंतची प्रसिद्ध झालेली उपेक्षित ग्रंथसंपत्ति १२२

# प्रस्तावना

चरित्रवाङ्मयाच्या प्रकारांत भिन्न भिन्न दृष्टींनी लिहिलेलीं चरित्रें पडतात. चरित्रनायकाच्या जीवनवृत्तास कोणी प्राधान्य देईल, तर कोणी त्याच्या वाङ्मयीन किंवा इतर कर्तृत्वावर भर देईल. एखादा कुशल चरित्रकार नायकाच्या व्यक्तित्वाची त्याच्या कर्तृत्वाशीं बेमालूम सांगड घालून दाखवील. संकलनात्मक चरित्रांत वर्णनशैली, कल्पनाविलास किंवा भावनात्मकता नसेल तर तें बोधप्रद असूनहि नीरस वाटेल. आत्मचरित्रांत खऱ्याखुऱ्या घटना व प्रांजलपणानें केलेलें विवेचन असावें लागतें. चरित्र हें दैवत–लीलामृत झालें तर त्यावर भक्तांखेरीज इतरांचा विश्वास बसत नाही. संतचरित्रांचा मामला निराळाच; त्यांत साक्षात्कार आणि चमत्कार यांनाच वाव. देशभक्त आणि क्रांतिकारक यांनी हातावर शीर घेऊन स्वातंत्र्यासाठीं कष्ट करावयाचे व त्यांचा शेवट आत्म-बलिदानांतच व्हावयाचा. अशा चरित्रलेखनांत चरित्रकाराच्या अंगीं विशेष गुण नसले तरी रोमांचकारी घटनांमुळे आपोआप रंग भरतो.

चरित्रकाराला भाषाशैली, सत्यान्वेषणक्षमता, विवेचनाचें तारतम्य, गुणदोष-परीक्षण, व्यक्तित्वाचें मूल्यमापन यांसारख्या कित्येक गुणांची देणगी असावी लागते. शिवाय, त्याच्या ठिकाणीं निरपेक्ष जिज्ञासा मोठ्या प्रमाणांत पाहिजे. एरवीं चरित्र प्रचारकी किंवा संकुचित वाटेल. ज्या वेळीं चरित्रसाधनांचा बराच अभाव असतो व विषय साधारणतः मागच्या काळांतील असतो त्या वेळीं तरी त्या काळांतील राजकीय, सामाजिक व इतर प्रवाहांशीं चांगला परिचय करून घेऊन माहितीचे धागेदोरे गोळा करावयाचे असतात, संशोधक-बुद्धि वापरावी लागते व तारतम्यानें विषय सत्यस्वरूपांत सजवावा लागतो. कांहीं हेतु किंवा पूर्वग्रह ठेवून लेखन केल्यास, किंवा चरित्रनायकाला मेटाकुटीनें आदर्शपुरुष बनविल्यास, किंवा वाचकांना—विशेषतः लहान वयाच्या—बोधामृत पाजण्यासाठीच लेखणी हातीं धरण्याचें ‘ सत्कृत्य ’ पार पाडल्यास, चरित्र उच्च दर्जाचें होऊं शकत नाही. तात्कालिक गौरव झाला तरी भविष्यकालांत तें टिकत नाही.

अशा प्रकारांच्या चरित्रलेखनांत प्रस्तुत चरित्रमाला कोठें बसते हें सांगणें झाल्यास, ही माला निराळीच गुंफली आहे असें सत्यार्थानें म्हणावें लागेल. प्रथम हें सांगितलें पाहिजे की, 'अमृत' मासिकाच्या वाङ्मय-कलाभिज्ञ व विशाल दृष्टीच्या संपादकांनी पुढील अनपेक्षित पत्र पाठवल्यावरून फेब्रुवारी १९५५ पासून मालेला आरंभ झाला, व डिसेंबर १९५६ मध्यें १२ लेखांक होऊन तेथे संपली.

"मराठी सारस्वतांत आजतागायत अनेक लेखक होऊन गेले. त्यांपैकी फारच थोड्यांना कीर्तीचा वा मानमान्यतेचा लाभ झाला आहे असें दिसतें. किंबहुना कीर्तिवान् लेखकांपेक्षा, साहित्याचे गुण ज्यांच्या लेखणींत होते, असे कित्येक लेखक प्रसिद्धीच्या प्रकाशांत येऊं शकले नाहीत. अशांपैकी कांही साहित्यिक एका विशिष्ट काळांत चमकलेहि; परंतु थोड्याच अवधींत ते विस्मृतीच्या पडद्याआड गेले. आणि अशा लेखकांची संख्या पुष्कळच मोठी आहे. ह्या लेखकांनी मराठी सारस्वताची मनोमन सेवा केली आहे. परंतु त्यांचें व्हावें तितकें चीज झालें नाही. या उपेक्षित लेखकांविषयी 'अमृत'ने दर अंकांत कांही मजकूर देण्याचें ठरविलें आहे.

या बाबतींत श्री. य. गो. जोशी ह्यांच्याबरोबर बोलणें करीत असता त्यांनी आपलें नांव सुचविलें. मराठी सारस्वताचा गेल्या शतकाचा इतिहास आपण अभ्यासला आहे. या अवधींत साहित्यप्रांगणांत उपेक्षित ठरलेले साहित्यिक आपल्या डोळ्यांसमोर असतीलच. त्यांच्याविषयी आपण 'अमृत'चीं तीन-चार पानें भरतील येवढा मजकूर पाठवावा, अशी आपणांला विनंति करीत आहों. त्या त्या लेखकांचें थोडक्यांत चरित्र, त्यांच्या शैलीचा उतारा व त्यांचा फोटो येवढें साहित्य आपण पाठवावें."

—( डॉ. वर्टी यांचें ता. ७-१२-५४ चें पत्र )

या 'अमृत'-संपादकांच्या पत्रावरून चरित्रलेखनाची मर्यादा व स्वरूप कळेल. याप्रमाणे १२ चरित्रलेख त्यांना पाठविले. चरित्रनायक निवडतांना ज्यांचीं स्वतंत्र चरित्रें झालीं नाहीत, किंवा ज्यांविषयी विशेष माहिती एकत्र प्रसिद्ध झाली नाही अशांची एक यादी करून, माहिती जमवूं लागलों. त्यांचे मूळ ग्रंथ पाहण्याचा प्रयत्न करून व त्यांतून उतारे निवडून त्यांच्याच भाषेंत दिले. प्रथम ज्यांची माहिती

लेखाजोगती हातीं आली ती देत गेलों. त्यामुळे लेखांकांत लेखक-कालानुक्रम ठेवला गेला नाही. पण नंतर जेव्हा व्हीनस प्रकाशन संस्थेने हीं चरित्रें पुस्तक रूपाने काढण्याचें ठरविलें तेव्हा हे लेख चरित्रनायकांच्या जन्मकालाप्रमाणे जुळविले.

यांतील शेवटचे दोन लेख ‘अमृत’मधील नाहीत. पहिला (ल. ना. जोशी) लेख ‘ध्रुव’ मासिकांत आला होता व शेवटचा, महादेवशास्त्री कोल्हटकर यांचा नवीनच तयार करून पुरवणीवजा जोडला. मागच्या शतकाच्या पूर्वार्धांत त्यांची बरीच कामगिरी होती; ती दृष्टीआड करणें बरें वाटलें नाही. या चौदा चरित्रव्यक्तींखेरीज आणखी कितीतरी उपेक्षित मानकरी आहेत. उदाहरणार्थ, मोरोबा कान्होबा विजयकर, कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री तळेकर, माधव चंद्रोबा डुकले, भास्कर दामोदर पाळंदे, गोविंद शंकरशास्त्री बापट, जनार्दन हरि आठल्ये, नारायण कृष्ण गद्रे, इ. इ. यांचाहि थोडाफार परामर्श घेणें एक आवश्यक कर्तव्य आहे. पण आताशा मोठ्या मासिकांना अशी चरित्रमालिका देणें त्यांच्या व्यवहाराच्या दृष्टीने सोयीचें वाटत नाही. मराठी साहित्याच्या इतिहासाला हीं चरित्रें उपयुक्त असलीं तरी पुढे यावयाला साधनें कमीच. साहित्याच्या लहान इतिहासांत यांना स्वतंत्र स्थान मिळत नाही. मोठा इतिहास तर अद्यापि व्हावयाचा आहे. तेव्हा कांही काळ बरेच मानकरी उपेक्षितच राहणार त्याला इलाज नाहीं.

‘विविधज्ञानविस्तार’कार, ‘बालबोध’कार, ‘ज्ञानचक्षु’कार, ‘श्रीसरस्वतीमंदिर’कार या सारख्यांनी मागे अशीं निवडक चरित्रें मोठ्या साक्षेपाने देण्याचे स्तुत्य प्रयत्न केलेले आहेत. त्या नियतकालिकांतील कांही लहान चरित्रें पुस्तकरूपानें निघालींहि होतीं. पण ती प्रथा चालू शतकांत बंद पडली. आता किर्लोस्करादि कांही नियतकालिकांतून आजच्या घटकेच्या विविध क्षेत्रांतील कर्तबगार स्त्री-पुरुषांचीं जीवनचरित्रें चटकदार रीतीनें दिलेलीं आढळतात; तींहि अनुकरणीय व बोधप्रद असतात यांत शंकाच नाही. तथापि, एकदा मागचा सर्व फडशा पाडला पाहिजे. एरवी गतकालांतील कित्येक संस्मरणीय व्यक्ती आधुनिकांना नांवानेहि माहीत पडणार नाहीत. असो.

प्रस्तुत पुस्तकांतील चौदा चरित्रनायकांत फार तर चार पांचच कांही ओळखीचे वाटतील. बाकी नवीनच आहेत. त्यांच्याविषयी दिली एवढी देखील माहिती एकत्र नसणार. रघुनाथ भास्कर गोडबोले यांची साहित्यसेवा भरीव व

मौलिक असूनहि त्यांची फारच उपेक्षा झालेली आहे. जुन्या कवींना पुढे आणण्याची वामनराव ओकांची कामगिरी आदरणीय आहे. कीर्तन्यांनी मराठ्यांना स्वतःचा स्फूर्तिदायक इतिहास आहे हें प्रथमच दाखवून दिलें; तर प्रि. गोळे यांनी आपल्या समाजाचा ऱ्हास कां होत आहे, या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे विचारवंतांची दृष्टि खेचून घेतली. भाऊसाहेब लेले हे एका मोठ्या शिक्षण-संस्थेचे आजीव सेवक एवढेंच माहीत. ते उच्च साहित्याची उस्तवारी करणारेहि होते, ही गोष्ट त्यांच्या यांतील चरित्रावरून बहुतेकांना प्रथमच कळेल. त्यांची माहिती त्यांच्या चिरंजिवाकडून मिळविली व हस्तलिखितेंहि पाहिलीं. हीच गोष्ट ल. ना. जोशी यांची. विद्येचे सर्व पैलू अभ्यासून व अफाट लेखन करूनहि त्यांना जिवंतपणीं साहित्यसेवक म्हणून मानाचें पान लाभलें नाही. मिळेल तो मोबदला घेऊन त्यांना आपलें अव्वल दर्जाचें लिखाण प्रकाशकांना द्यावें लागत होतें व ते सांगतील तें लिहून द्यावें लागत होतें. त्यांचें यांत दिलेलें आत्मचरित्र हृदयस्पर्शी वाटेल. अशा जातिवंत विद्यासेवकांना थोडी तरी प्रसिद्धि मला देतां आली याचा आनंद वाटतो.

यासाठी 'अमृत'ने मला प्रथम धूळपाटी दिली व तीवरील अक्षरें 'व्हीनस'ने गिरवून त्यांना अक्षयरूप दिलें. या दोघांचे मी उपकार मानतों. गेल्या चाळीस वर्षांत माझें फुटकळ लिखाण पुष्कळच झालें आहे, पण त्यांतील कांही भाग पुस्तक-रूपाने हा प्रथमच प्रसिद्ध होत आहे. ज्ञानकोशापासून चालू संस्कृतकोशापर्यंत अनेक संदर्भग्रंथांचा मी सहसंपादक असलों तरी माझ्या एकट्याच्या नांवा-वरचीं स्वतंत्र पुस्तकें थोडींच आहेत. त्यांत याची नवीन भर पडत आहे; तेव्हा त्याला कारणीभूत झालेल्यांचे मनःपूर्वक आभार मानणें कर्तव्यच ठरतें व तें मी करीत आहें.

त्रिपुरी पौर्णिमा, शके १८७९<br>
२०४ सदाशिव, वाघवाडी, पुणें २.

**चिंतामण गणेश कर्वे**

# मराठी साहित्यांतील
# उपेक्षित मानकरी

## : १ :

## सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे

अर्वाचीन मराठी गद्याचे जनक, असें ज्यांना आद्य व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी म्हटलें आहे व ज्यांनी मराठींत पाश्चात्य वाङ्मयाच्या धर्तीवर बालवाङ्मयाचा पाया घातला त्या सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे यांची आठवण करून देणें म्हणजे महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी आल्यावेळची नव्या संस्कृतीच्या जन्माची आठवण करून देण्यासारखेंच आहे. महाराष्ट्राच्या सुदैवाने एल्फिन्स्टनसारखा कमिशनर ( व पुढे गव्हर्नर ) लाभला व त्याने प्रजेला–नवीन काळाला अनुरूप पण जुन्या परंपरेला फारसें न सोडतां–शिक्षण देण्याचें थोर कार्य हातीं घेतलें; शाळा काढल्या व पुस्तकें तयार करुन घेतलीं. याच सत्कार्यांत बापू छत्रे यांचा मोठा भाग आहे.

छत्रे घराणें मूळ रत्नागिरीजवळच्या बसणी गांवचें. बापूंचे पंजोबा हरभट प्रथम मुंबईस वाळकेश्वरीं स्थाइक झाले. दवे नांवाच्या गुजराती सावकाराने तेथे बालाजीचें देऊळ बांधून त्याची पूजाअर्चा छत्र्यांकडे दिली. बापू छत्रे यांचें आरंभीचें शिक्षण संस्कृतचें झालें. जन्म १७८८ त मुंबईस वाळकेश्वरीं झाला; पण त्या वेळीं 'नेटिवां' साठी इंग्रजी शाळा नव्हत्या. म्हणून स्वतःच्या उमेदीने बापू एका मिशनच्यापाशीं इंग्रजी शिकले व पुढे तें वाढविलें. "यांस इंग्रजी भाषा जी येत होती व तिच्या योगानें जी विद्वत्ता यांच्या अंगीं होती ती आतांच्या सवातीन हात किताबवाल्यांच्या बरोबरीची जरी नव्हती, तरी

तेवढ्यावर जे जे ग्रंथ त्यांनीं लिहिले ते इतके उत्कृष्ट उतरले आहेत, कीं किताबवाल्यांच्या हातून अजून एकहि ग्रंथ तसा झाला नाहीं, किंवा नसेल आणि कदाचित् झाला असला तर त्याप्रमाणें उत्तमहि उतरला नसेल ! ” हा सडेतोड अभिप्राय पाऊणशे वर्षांपूर्वी होऊन गेलेले कोशकार रघुनाथशास्त्री गोडबोले यांचा आहे. प्रथम बापू छत्रे यांनी एका इंजिनियरच्या कचेरींत रायटरची नोकरी केली ; पण पुढे सरकारी शाळांचे तपासनीस म्हणून जर्व्हिस साहेबांच्या हाताखाली ते होते. “ त्यांस त्या काळीं तीनशें रुपये दरमहा झाला होता. हा दरमहा त्या वेळेस सर्वांस मोठा वाटत असे ” असें बापूंचे विद्यार्थी दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रांत लिहितात. बापूंनी ‘ फारसा विद्वान् ’ नसलेल्या आपल्या बाबामामाला कापांतील शाळेवर पंतोजी नेमलें होतें. पण हे पंतोजी फार मेहनत घेऊन शिकवीत असा दादोबांचा स्वानुभव आहे. बापू छत्रे केव्हा केव्हा दादोबांच्या वर्गावर जाऊन मुलांना इंग्रजी पुस्तकांचा मराठींत अर्थ समजावून देत. त्यांनी स्वतः लिहिलेलें Wisdom in Miniature नांवाचें छापील पुस्तक होतें, तेंहि मोठ्या हौसेने शिकवीत. पुढे चांगले प्रसिद्धीस आलेले बाळशास्त्री जांभेकर हे यांचेच विद्यार्थी ; या आपल्या आश्रिताच्या मुलाला आपल्याजवळ ठेवून त्याजकडून बापूंनी इंग्रजीचा अभ्यास करविला. पुढे संपादक म्हणून प्रसिद्धीस आलेले भाऊ महाजन हे बापूंचे मेहुणे.

बापू छत्रे यांनी त्या वेळच्या शिक्षणखात्यांतील मोठे अधिकारी कॅ. केपन व जर्व्हिस यांस नवीन शाळा स्थापण्याच्या व मुलांसाठी नवीन धर्तीवर भाषांतरित पुस्तकें रचण्याच्या कामीं फार मदत केली आहे. विद्याप्रसारासाठी सरकारने ‘ बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी ’ ( मराठींत ‘ मुंबईची हैंद शाळा, शाळा-पुस्तक मंडळी ’ ) काढून भाषांतरात्मक ग्रंथ लिहून देण्यासाठी बक्षिसें लावलीं होतीं. “ इंग्रजी भाषेच्या पुस्तकांचें भाषांतर जे करतील त्यांनीं हें लक्षांत ठेवावें, कीं या देशांतील लोकांचे चालीस व समजुतीस जसें नीट येईल तसें कोठें कोठें मूळ ग्रंथ थोडाथोडा फिरवून अर्थ संपूर्ण येईल असें केलें पाहिजे.” अशी सूचना लेखकांस दिली होती. या सूचनेप्रमाणे बापू छत्रे यांनी ‘बाळमित्र ’- ‘ ( इसप ) नीतिकथा ’ यांसारखीं पुस्तकें सुंदर व सोप्या भाषेत लिहिलीं ( १८२८ ). ‘ बाळमित्र ’ हें बार्क्विन नांवाच्या फ्रेंच लेखकाचें ( Ami dis Enfans ) मुलांसाठी बोधपर गोष्टांचें पुस्तक होतें त्याच्या इंग्रजी भाषांतरा-

वरून ( Children's Friend ) हें रूपांतर बापूंनी केलें असून, प्रस्तावनेंत ग्रंथाचा उद्देश व उपयुक्तता सांगितली आहे.

## बाळमित्र प्रस्तावना ( उतारे )

" हा ग्रंथ मुलांस पढिवल्यानें त्यांस लहानपणापासून अनायासानें, बोलावयाचा अभ्यास होईल ; त्यांचा शब्दसंग्रह वाढेल ; त्यांस अनेक व्यवहार, अनेक रीति, नीति समजतील ; बुद्धि सदसद्विकारक्षम होईल. त्यांचें हृदय कोमल होईल. मातापितरांच्या ठायीं त्यांचा प्रेमा वाढेल. बहिणभावंडांच्या ठायीं त्यांची प्रीति वाढेल."

* * *

" ग्रंथकर्त्यानें दोन गोष्टी मनांत आणून ग्रंथ केला आहे ; एकतर मुलांचें रंजन ; दुसरें, त्यांस सद्‌गुण सहज लागावे."

* * *

" बहुतेक गोष्टींचे मुलांच्या ठायीं अनुभवहि घेऊन पाहिले आहेत ; कोठें कोठें नाटकें योजिलीं आहेत. तेणें करून त्यांस हावभावयुक्त निर्भिडतेनें चौघांत बोलतां यावें, लज्जेनें तोंड मुरडतात तें मुरडूं नये. पात्रांत आईबापांसहि मिश्रित केलीं आहेत, तेणें करून मुलांचे आनंद भोगावयास त्यांसहि सवड दिली आहे."

इसपच्या नीतिकथांना मराठी वेष देतांनाहि छत्र्यांनी फार काळजी घेतलेली दिसून येईल. इंग्रजी अंमलापूर्वी मराठींत गद्यग्रंथ म्हणजे बखरीच होत. पण त्यांकडे फार थोड्यांचा ओढा असे. तेव्हा इंग्रजी वाङ्मयाच्या धर्तीवर मराठी गद्याची रचना करण्याचा उद्योग सरकारी मदतीने सुरू झाला. पहिली पायरी म्हणून कांही ग्रंथांचीं भाषांतरें तयार झालीं. त्यांपैकीच बापू छत्रे यांचे ग्रंथ होत. या ग्रंथांना उच्च साहित्यांत स्थान नसलें व त्यांचा वाङ्मयीन दर्जा अगदी सामान्य असला, तरी त्यांचा त्या काळीं चांगला उपयोग होता यांत शंका नाही. बराच काळपर्यंत हे ग्रंथ शाळांतून चालू होते. हा मराठी गद्याचा इंग्रजी अवतार संस्मरणीय आहे. विशेषतः ' बाळमित्र ' याची आठवण पुढे

फार काळ होती व इ. स. १९१७ पर्यंत याच्या पांच आवृत्ति निघाल्या. बापू छत्रे यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाविषयीं मागें दिलेल्या कोशकार गोडबोले यांच्या अभिप्रायाप्रमाणेच छत्रे यांचे समकालीन दादोबा पांडुरंग यांचाहि अभिप्राय होता.

'बाळमित्र' व 'इसप नीतिकथा' यांविषयीहि दादोबा आत्मचरित्रांत सांगतात : "हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें आहेत असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फकीकेंत (फकिका = गद्य-विवेचन) लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आम्ही सर्व झालों." बापू छत्रे यांची भाषा आज चमत्कारिक वाटेल. ती कोंकणीच्या धर्तीवर आहे. अगो, अँगोतल्या, ओंड, जंव-तंव, मातक्यान्, सांज वगैरे शब्द आजच्या शिष्ट भाषेंत सांपडणार नाहीत. तथापि त्यांचीं सुटसुटीत अर्थपूर्ण वाक्यें गोड वाटतात. कांही लेखनशैली स्पष्ट भाषांतरित आहे. (उदा०, "आपला बाप यास आशा देई कीं.", "अमृतरावाचा पस्तावा झाला आहे.", "ईश्वरें मला तुजमध्यें दुसरा लेंक दिला आहे.", "माझे लहानग्या धन्या !"). 'बाळ-मित्रां'-तील नुसतीं धड्यांचीं नांवें पाहिल्यास त्यांतील विविधता व मनोरंजकता कळून येईल. 'बाळ-मित्रा'चा दुसरा भाग टी. गेस्फोर्ड यांच्या हातचा आहे (१८३२). बापू छत्रे यांच्या अकाली मृत्यूमुळे समग्र भाषांतर झालें नसावें.

यांच्या 'इसपनीतिकथे'च्याहि १८७७ सालपर्यंत चार आवृत्ति निघाल्या. 'वेताळपंचविशी' प्रथम १८३० मध्ये जी प्रसिद्ध झाली ती नंतर १८७२ सालीं अग्निहोत्री मंडळींनी काढली. वेताळपंचविशींतील मूळ कथाभाग संस्कृत आहे. प्रथम गुणाढ्याच्या बृहत्कथेंत (इ. स. तिसरें शतक) तो आढळतो. 'बोधकथा' नांवाचें ताराचंद दत्ताच्या (बंगाली) पुस्तकाचें भाषांतर व 'बोधवचन' हें 'लहान मुलांस सोपा योग्य उपदेशा'चें पुस्तक हीं आणखी दोन खुद्द बापूंनी तयार केल्याचें नमूद आहे. बाकी कित्येक जर्व्हिसच्या मदतीनें सोसायटीसाठी तयार केलेलीं दिसतात. ग्रंथप्रकाशन-पोटमंडळांत ते एकटेच मराठी सभासद

होते. पेन्शन घेण्यापूर्वी बापूंनी हिंदशाळा–पुस्तक मंडळीचे ‘ सक्रतार ’ ( सेक्रेटरी ) होण्याचा मान मिळविला होता. १८२९ मध्ये पेन्शन घेतल्यावर आणखी कांही उपयुक्त इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करण्याच्या हेतूनें ते वाळकेश्वरीं स्वतःच्या ‘ धर्मशाळे ’त जाऊन राहिले व तेथे स्वतःसाठीं एक छापखाना घालण्याचा त्यांचा विचारहि होता. पण मृत्यूची झडप पडल्यामुळें सर्व तसेंच राहिलें. त्यांना जास्त आयुष्य लाभतें तर त्यांनी मराठी वाङ्मयांत विशेष भर घातली असती. मराठी काव्याचा त्यांचा अभ्यास चांगला असून त्यांनी कांहीं कविता केल्याचेंहि त्या वेळची मंडळी सांगतात. त्यांच्या मृत्यूचें साल दादोबांच्या माहितीवरून १८३० धरण्यांत येत असतें. पण छत्रे घराण्याच्या इतिहासांत १८३४ दिलें आहे. त्यांचा मुलगा वीरेश्वर ( जन्म १८२५ : मृत्यु १८८५ ) बडोद्यास नोकरीस होता. गायकवाड सरकारच्या पदरीं बापू छत्रे यांचे वंशज शास्त्री म्हणून होते असें त्या घराण्याच्या इतिहासावरून दिसतें.

याप्रमाणे अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा पाया घालणारे बापू छत्रे सवाशे वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांची माहिती वाङ्मयाचा इतिहास मुद्दाम अभ्यासणाऱ्यांसच असते.

## छत्र्यांच्या ग्रंथांतील उतारे

— १ —

**चिमणी**— गोदावरीबाई म्हणून एक शाहाणी भली आणि मायाळू बायको होती; तिची वडील मुलगी गंगा म्हणून होती. तिणें एके दिवशीं कांहीं अन्याय केला, म्हणून आईनें तीस ममतेनेंच धमकावलें. ते आईचे मायाळू शब्द आणि आपला अन्याय स्मरून गंगा रडूं लागली. तें पाहून तिची लहान बहीण चिमणी तीन वर्षांची होती. तिणें हळूच माघारून येऊन एका हातानें परकाराचा पदर घेऊन आपल्या बहिणीची आसवें पुशिलीं, आणि दुसरे हातानें आपल्ये तोंडांतला खडेसाखरेचा तुकडा तिणें तिचे तोंडांत घातला.

मला असें वाटतें, कीं कोणीं चांगल्या चितान्यानें याविषयीं चित्र काढलें असतां काय वेधक होईल !

( बाळमित्र, शिळाप्रेस आवृत्ति, १८२८ )

— २ —

**देवशर्मा पंडित**— एके समयीं देवशर्मा पंडित खेळत होता. तें पाहून कोणी दुसऱ्या पंडितानें त्याची थट्टा केली. त्याचा गर्व उतरावा म्हणून देवशर्म्यानें एक धनुष्य आणविलें आणि त्याची दोरीं काढून तें निर्वाक करून भुईवर ठेवलें. मग तो त्या पंडितास म्हणतो, " हें माझें कूट सांगशील तर तूं विद्वान् खरा. " पंडितास तें उकलेना. तेव्हां तो देवशर्म्यास म्हणाला, " याचा अर्थ आतां तूंच सांग, मला समजत नाहीं." देवशर्मा म्हणाला, " तुला समजत नाहीं तर मी सांगतों ऐक. जर हें धनुष्य सदा वांकविलेलें असलें तर लवकर मोडून जाईल आणि जर काम पडेल त्या त्या समयीं वांकविलें तर फार काळपर्यंत टिकेल. आणि अधिक काम करील. "

तात्पर्य :— मनुष्याचें मन हें धनुष्यासारखें आहे; याला सदा वेधून ठेविलें असतां, तें क्षीण होऊन तादृश उपयोगी पडणार नाहीं. म्हणून विनोद आणि खेळ हे चित्तास विश्रांतिकारक तसेंच बुद्धीस तीक्ष्णता आणणारे आहेत. ते निर्दोष आहेत तर प्रसंगीं थोरांनींहि करावे.

( छत्रेकृत इसापाच्या कल्पित गोष्टी )

* * *

# : २ :

# हरि केशवजी पाठारे

"केशव उदर सुगर्भी अवतरला पूर्ण तो कृपाळु हरी।
सुजनजना पाहुनियां सिंधुपणें येत ज्या कृपालहरी ॥"

— श्यामराज केसकर

हरि केशवजी यांची जात पांचकळशी सुतार असून, यांनी आपल्या पुस्तकांवरहि सोमवंशी क्षत्रिय असें ज्ञातिनाम लिहिलें आहे. उपनाम पुरव होतें. ही मंडळी बिंबराजाबरोबर १४ व्या शतकांत मुंबई, साष्टी, वसई, माहीम या भागांत येऊन राहिलेली. हरि केशवजींचे आजेपणजे गिरगांवांत वतनवाडीवर राहात. वडील केशवजी चांगले गृहशिल्पी असून त्यांच्या हातचीं गिरगांवांत बरींच घरें होतीं. पालवाच्या रस्त्यावरील ठाकुरद्वार मंदिर यांनीच बांधलें. चुलते माधवजी 'बॉंबे क्युरियर' या प्रसिद्ध छापखान्यांत मुख्य कंपॉझिटर म्हणून असत.

हरिजींचा जन्म इ. स. १८०४ मध्ये मुंबईस झाला. त्या काळांत मुंबईंतहि मराठी प्राथमिक शाळा नसल्याने जुन्या वळणाप्रमाणे लिहिणेंवाचणें घरींच झालें. तथापि, वडील माणसांच्या तोंडीं असलेलें वामन-मोरोपंत आदि मराठी कवींचें बरेंचसें वाङ्मय त्यांना पाठ झालें होतें. याचाच परिणाम म्हणून की काय, हरि केशवजींनी आपल्या ग्रंथांतून श्लोक, आर्या वगैरे स्वरचित पद्यें जागजागीं घातलेलीं दिसून येतात. हरि केशवजींचे मामा त्रिंबकजी हे एका मराठी मिशनरी शाळेचे प्रमुख असल्याने त्यांनी आपल्या या तैलबुद्धि भाच्याला जरा मोठा झाल्यावर शाळेंत अडकविलें. तेथेच शाळेचे एक चालक रेव्हरंड केनी त्यांना फावल्या वेळांत इंग्रजी शिकवूं लागले. या पहिल्या मिशनरी मंडळींचा हरि केशवजी यांना जसा चांगला फायदा झाला तसा तोटाहि झाला. त्यांची हिंदु धर्मावरील श्रद्धा ढळूं लागली. पण त्यांच्या आजोबांच्या हें वेळेवरच लक्षांत येऊन त्यांनी आपले गुरु नाथपंथी हरिदास श्यामराज तात्या केसकर

यांच्या देखरेखीखाली हरिजींना ठेवल्यामुळे खिस्ती बनण्याचें अरिष्ट टळलें, असें म्हणावें लागतें.

इंग्रजी येऊं लागल्यावर कॅ. जर्व्हिस यांच्या इंजिनियरिंग शाळेंत मुख्य कारकुनाची जागा त्यांना मिळाली. शिल्पशास्त्राचें शिक्षण जनतेला देण्यासाठी सरकारने ही शाळा मुंबईस काढली होती. १८२९ पर्यंत या शाळेंत काढल्यावर त्यांना ठाण्यास अदालत कोर्टांत अव्वल कारकून व मराठी भाषांतरकार (ट्रान्स्लेटर) म्हणून नेमण्यांत आलें व पांच वर्षांनी सोलापुरास बदली करण्यांत आली. पण घरगुती अडचणींमुळे लवकरच हरिजींनी आपली बदली मुंबईस करून घेतली. मुंबईस ते हायकोर्टांत प्रमुख भाषांतरकार म्हणून शेवटपर्यंत होते.

इंग्रजीप्रमाणेच संस्कृतचाहि त्यांचा चांगला व्यासंग होता. याचें श्रेय इंजिनियरिंग शाळेंतील बाबा व्यास नांवाचे जे शास्त्री होते त्यांना आहे. त्यांच्याजवळ हरिजींनी संस्कृतचा अभ्यास केला होता. यामुळें मराठी, इंग्रजी व संस्कृत या तीनहि भाषांमध्ये त्यांची चांगली गति असे. भाषांतरकाराच्या पेशाला त्यांची योग्यता सिद्ध झाली व उत्कृष्ट भाषांतरकार म्हणूनच ते ओळखले जाऊं लागले.

राज्यांत शिक्षणप्रसार व्हावा म्हणून 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची १८२२ सालीं सरकारने स्थापना केली व या संस्थेने बक्षिसें लावून अनेक संस्कृत आणि इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करवून घेतलीं. बापू छत्रे यांच्याप्रमाणेंच हरि केशवजी हे या संस्थेच्या ग्रंथप्रकाशक पोटमंडळाचे सभासद होते (१८३१-५१). त्यांचें पहिलें भाषांतरित पुस्तक म्हणजे 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' हें होय. परिभाषा आणि सूची यांसह हें १८३३ सालीं शिळाप्रेसवर छापलें आहे. Conversations on Natural Philosophy या इंग्रजी ग्रंथाचें हें भाषांतर कसें उतरलें होतें यासंबंधी सुप्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रांत काय लिहितात तें पाहा—

"हरि केशवजी यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती कीं, हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांही तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाहीं. मूळचाच मराठी ग्रंथ असावा असें बहुतांस वाटलें."

या पहिल्या (वैद्यक आणि ज्योतिषशास्त्र सोडल्यास) मराठी शास्त्रीय ग्रंथांत पदार्थांचे सामान्य धर्म, गुरुत्वाकर्षकत्व, चलनियम, यांत्रिक शक्ति,

ज्योतिषशास्त्र, प्रवाही पदार्थांचे धर्म इत्यादि अनेक विषय विवेचिलेले आढळतील. मराठीला भौतिक शास्त्राचें विवेचन, विशेषतः परिभाषेच्या अडचणीमुळे पेलत नाहीं, हा आजहि कित्येकांकडून घेतला जाणारा आक्षेप सव्वाशे वर्षांपूर्वीच हरि केशवजींसारख्या पट्टीच्या लेखकांनी खोडून काढला आहे. पण पुढे मराठी माध्यम जाऊन असे ग्रंथ निघणें बंद पडलें. याविषयीं दादोबा पांडुरंगहि हळहळतात–

"त्या वेळेस 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' (बाळशास्त्री जांभेकर यांचें) व 'सिद्धपदार्थविज्ञान' हे मोठे व सरस ग्रंथ झाले परंतु पुढें विद्याखात्यावरील अधिकारी इंग्लीश लोक व एतद्देशीय लोक यांची देशभाषेविषयीं इतकी रुचि कमी होत गेली कीं, हे ग्रंथ इतके सरस असतांही आतां त्यांविषयीं कोणास कांहींच माहिती नाहीं."

यानंतर १८३७ सालीं Conversations on Chemistry या पुस्तकाचें भाषांतर 'रसायनशास्त्राविषयक संवाद' या नांवाचें परिभाषेसह सचित्र छापलें. "याचीं ४८० पृष्ठें असून आपला उपकारकर्ता फॅरिशसाहेब यास हें अर्पण केलें आहे." रे. केनीने कॉं. ने. ए. सो. चे एक चालक ना. फॅरिश याच्याशीं हरिजींचा स्नेह जमवून दिला होता. या स्नेहाचें प्रतीक म्हणून फॅरिशने १८४१ त विलायतेस जातांना आपला अमूल्य ग्रंथसंग्रह हरिजींस बहाल केला. काय स्नेह व औदार्य!

या दोन शास्त्रीय ग्रंथांनंतरचा तिसरा शास्त्रीय ग्रंथ म्हणजे 'देशव्यवहारव्यवस्था या शास्त्राचीं मूलतत्त्वें' हा अर्थशास्त्रविषयक ग्रंथ होय (१८५४). मिसेस मार्सेट आणि मिल या इंग्रज लेखकांच्या ग्रंथाधारें रावसाहेब वि. ना. मंडलिक यांच्या साहाय्याने हरि केशवजींनी हा ग्रंथ जो लिहिला तो 'दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी' ने छापला. "संपत्तिविषयक जें शास्त्र त्यास देशव्यवहारव्यवस्था म्हणतात व तें पढावें म्हणजे देश संपत्तिमान होण्याचें साधन काय तें समजूं लागेल," असा खुलासा दिला आहे.

"हें भाषांतर पुण्यास शास्त्री व प्रौढ विद्यार्थी यांच्या सभेंत वाचून तपासण्यांत येई व तें पाहून सर्वांस मोठें समाधान वाटे," असें हरिजींचे चिरंजीव त्यांच्या चरित्रांत लिहितात. इतरांनी लिहिलेलीं पुस्तकेंहि हरिजींकडे तपासण्यास येत.

इंग्रजांचें राज्य इकडे आपल्यावर आल्यामुळे इंग्लंडचा इतिहास अभ्यासणें भागच होतें. १८३२–३४ त इंग्लंड देशाची बखर दोन भागांत निघाली. नंतर नाना नारायण यांनी भाषांतरित देशवर्णनपर ग्रंथ लिहिला. पुढें १८३८ त हरिजींनीहि 'इंग्लंडचा वृत्तांत' लिहिला तो पत्रबद्ध. बापाने आपल्या मुलास पत्रांतून इतिहास निवेदन केला आहे. "त्या देशांचे लोक आतां येथें राज्य करतात, ते शहाणे व गुणी आहेत. याजकरितां येथील लोकांनीं त्यांचा वृत्तांत जाणून घ्यावा. ते जेणेंकरून इतक्या चातुर्यास व वैभवास पावले, त्या गोष्टी समजल्या असतां मोठ्या उपयोगी पडतील, याजकरितां मीं थोडक्यांत लिहावयास आरंभिला आहे–" अशी याची प्रस्तावना आहे.

बापू छत्रे यांच्याप्रमाणेच मुलांस नीति, सदाचार शिकविण्यासाठी यांनी 'चेंबर्सकृत शालेपयोगी नीतिग्रंथ याचें महाराष्ट्र भाषांतर' १८४६ सालीं प्रसिद्ध केलें. 'बाळमित्रा'प्रमाणेच यांतील गोष्टी सुबोध आहेत. Chamber's Moral Class–book त्या काळीं फार लोकप्रिय झालें होतें. तेव्हा त्याचें चांगलें भाषांतर हरि केशवजींखेरीज दुसरा कोण करणार? त्यांचा सर्वांत उत्कृष्ट भाषांतरित ग्रंथ म्हणजे 'यात्रिक क्रमण' होय. मूळ ग्रंथच ( Bunyan's Pilgrim's Progress ) अत्यंत रसाळ व भाविकपणें लिहिलेला; रूपकात्मक व आध्यात्मिक; ख्रिस्ती लोकांचा अत्यंत आवडीचा. तेव्हा हरिजींचे उपकारकर्ते फॅरिशसाहेब यांनी आग्रहाने त्यांच्याकडून करविला व तो बॉंबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटीनें १८४१त छापला. याच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या, पण पुढे मिशनरी संस्थेने या पुस्तकांचें रंगरूप बदललें, येवढेंच नव्हे तर हरि केशवजींचें कर्तेपणहि पुसून टाकलें. यांत मधूनमधून अभंग, आर्या, पदेंहि घातलीं आहेत. "हरि केशवजींच्या गद्यापेक्षां पद्यांचा आम्हांस फार चमत्कार वाटतो" इतकीं तीं गोड आहेत, असें 'बालबोध'कार वि. कों. ओक एके ठिकाणीं सहज उद्गार काढतात.

'यात्रिक क्रमणा' मुळे हरिजींचा मिशनऱ्यांशीं अधिकच संबंध येत गेला व ते बाबा पदमजींप्रमाणे ख्रिस्ती होतात की काय, अशी आप्तेष्टांना भीति पडली. पण वर सांगितल्याप्रमाणे केसकरमहाराजांनी त्यांस संतवाङ्मयाची गोडी लावली व त्यामुळे ते भक्तिमार्गी कर्मनिष्ठ राहिले. "भवसागरतारक श्रीगुरुराज स्वामी माझा ॥ ध्रु० ॥" असें आपल्या गुरूवर हरिजींनी रचलेलें एक पद आहे.

हरि केशवजींच्या काळांत दादाभाई नौरोजी, डॉ. लाड, रा. सा. मंडलिक, माडगांवकर वगैरे मंडळींनी चालविलेली ‘ स्टूडण्टस् लिटररी ॲन्ड सायन्टिफिक सोसायटी ’ नांवाची विद्वत्सभा असून, त्याची ‘ मराठी ज्ञानप्रसारक सभा ’ ही शाखा होती. तिचे हरिजी उपाध्यक्ष होते. इतरहि सार्वजनिक व स्वज्ञाति संस्थांतून ते भाग घेत. यांच्या खटपटीमुळे यांच्या जातींत पुनर्विवाहाची चाल पडली. यांचें एक मदिरापाननिषेधक पुस्तक आढळतें. तथापि दादोबा पांडुरंगच हळहळत असें लिहितात की, “ परंतु दैवगति अशी विलक्षण कीं, उतारवयांत तेच स्वतः त्या प्राशनाच्या स्वाधीन झाल्यासारखे होऊन मृत्यु पावले. ”

तथापि, हरिजी आपला वेळ लेखनवाचनांत व भजनपूजनांत चांगला घालवीत. ते ११ जुलै १८६८ रोजीं मुंबईस अतिसाराने वारले. ते स्वभावाने फार शांत असत.

१९ व्या शतकांतील पूर्वार्धांत मराठी भाषेची सेवा करणारांत ते पहिल्या श्रेणींत होते. त्यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहिले नसले तरी त्या काळाला इष्ट असे भाषांतरित शास्त्रीय ग्रंथ जे लिहिले ते तुलनेने पाहतां महत्त्वाचे आहेत. भाषांतराची कला कांही सोपी नाही. त्यांतून शास्त्रीय विषय सुबोध रीतीने मांडावयाचा, व त्या अगदी पहिल्या इंग्रजी अमदानींत शिक्षणाच्या सोयी फारशा नसतांना, म्हणजे केवढें दिव्य होतें ! बापू छत्रे वगळल्यास त्यांच्या तोडीचा भाषांतरकार त्या काळांत कोणी नव्हता. शास्त्रीय विषयाला अनुसरून साहजिकच छत्र्यांपेक्षा हरिजींची भाषा गोड असली तरी, भारदस्त आहे. ते चांगले कविहि होते हें त्यांच्या ग्रंथांतील व इतर स्फुट पद्यांवरून दिसेल.

## हरि केशवजी यांच्या ग्रंथांतील उतारे

— १ —

पदार्थांचें सामान्य ज्ञान होण्यास आपल्या देहावयवामध्यें ज्ञानतंतूचे ठायीं मात्र योग्यता आहे. अत एव मनास पदार्थांचें विशेष ज्ञान व्हावयास हे ज्ञानतंतू साधन होत; तर पदार्थांचें सामान्य ज्ञान ज्ञानतंतूवर होतें, तेणेंकरूनच त्या पदार्थांचें मनास विशेष ज्ञान होतें. आतां अनुभवावरून असें कळूं येतें कीं, पदार्थांचा ज्ञानतंतूशीं स्पर्श झाल्याविना त्यांजवर त्या पदार्थांचें सामान्य ज्ञान उमटत नाहीं, आणि असा अनुभव आहे,

म्हणून ज्ञानतंतूविशिष्ट जीं इंद्रियें, तीं दूर असलेल्या पदार्थांनें जाणावयास समर्थ होत नाहींत. यास दृष्टान्त जो सुगंधद्रव्याचे परमाणूंचा वस्तुतः आपल्या नासिकेस स्पर्श होतो, त्यांचा मात्र आपणास गंध येतो. आणखी मागांहि तुम्हांस सांगितलें होतें कीं, पुष्पाचे जे पराग उडून आपल्या नाकांत शिरतात, आणि तेथील आघ्राण ज्ञानतंतूवर आदळतांच त्या ज्ञानतंतूद्वारां मनास पुष्पगंधाचें विशेष ज्ञान होतें.

( सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद, पृ. ४३५–३६ )

— २ —

## चेंबर्सकृत शालोपयोगी नीतिग्रंथ

अनुक्रमणिकेनंतरचे श्लोक

प्राणी, आप्त, कनिष्ठ श्रेष्ठ जन जे, त्यांतें सदा सन्मतें, ॥
वर्तें, उद्यम, स्वात्मसेवकपणा, स्वातंत्र्य धारिष्ट तें, ॥
यांतें पोशुन, लक्षपूर्वक करी विस्तीर्ण आलोचना, ॥
संपादीं पटुयुक्तिसूचनलता, संकोचता सज्जना. ॥ १ ॥
घे घे सभ्यपणा, सुयुक्त अशना, आरोग्यसंवर्धना, ॥
संतुष्टत्वगुणा, मितव्ययपणा, लोकोपकारी मना, ॥
अक्रोधादिक क्षांति हीच सुमना, भोगीं क्षमा सद्धना, ॥
सौम्यत्वादिक भूषणा धरिं, रमें या सद्गुणांच्या वना. ॥ २ ॥

( शुद्धलेखन मुळाप्रमाणे, सन १८४६ च्या प्रतीवरून ).

यानंतर ५ आर्या व १ श्लोक आहेत.

— ३ —

## नीच रीतीनें आपलें हित करून घेउं नये यावियीं स्वानुभविकपणा*

वारंवार असें घडतें कीं, जेणेंकरून पैका अथवा बढती अथवा आपलें हित आपल्यास प्राप्त करून घेतां यावें आणि ज्याविषयीं कोणतेंही नीति-

* आपलेंच मन आपल्यास जें सांगतें तो स्वानुभविकपणा असा अर्थ एक दोन ठिकाणीं दिला आहे.

शास्त्र मना करीत नाहीं असे उपाय असतात, असेंही असतां ते आपल्यासारखीं जीं इतर मनुष्यें त्यांच्या वृत्तींस अथवा स्वार्थास अपकारक अथवा वस्तुतः नीच व अयोग्य असतात. अस्यां अवस्थांत तर जो कोणी इतरांनीं आपल्यासीं अमुकरीतीनें चालावें असें पाहायाची इच्छा धरून त्याचप्रमाणें त्यांसीं चालायास अंतःकरणपूर्वक इच्छितो अथवा, आपला स्वतांचा कांहींतरी मान राखावा असें ज्यास वाटतें, त्याला आपलें जें कर्तव्य तें जाणण्याविषयीं उणीव असणार नाहीं. आपल्यास खोटेपणानें साधन करून घेण्याची जी मोहक संधि तिजपासून तो तत्क्षणींच परतेल.

(नीतिग्रंथ, पृ. १६८–१६९)

[इ. स. १८४६ च्या शिळाप्रेसवरील ‘नीतिग्रंथां’त जो लेखनप्रकार वापरला आहे त्यांत खालील विशेष दिसतात—

(१) तृतीयेच्या (नें, नीं) विभक्तिप्रत्ययांवर अनुस्वार नाही. (२) दीर्घ उ–‘उ’ वर रफार देऊन (उँ) काढतात. (३) ओळीच्या शेवटीं शब्द अपुरा राहिल्यास रेघ (–) देत नाहीत. (४) ‘सु’ असा न काढतां ‘स ु’ असा काढतात (उकार पुढे देतात.)]

— ४ —

## यांत्रिक क्रमण

(ख्रिस्ती जागा होऊन गाऊं लागला—)

### अभंग

आतां कोठें आहें मीही कवण्या ठायीं ?
येऊनियां राहीं सौख्य स्थानीं. १
देव लोकांच्या हें जवळील स्थान,
निर्मियलें जाण विश्रांतीशीं. २
माझीं पापें क्षमा करुनि दयाळा,
सांभाळिलें मला ऐशा रीती. ३
यात्रेकरू यांची किती प्रीति चिंता,
वाहशी सर्वथा येशूविशीं. ४

मग तीं प्रातःकाळीं सर्वजणें उठलीं आणि परस्परें भाषण करून ख्रिस्तीसीं बोलूं लागलीं कीं, आम्हीं तुला या स्थानीचें जे अपूर्व पदार्थ ते दाखवितों, ते पाहिल्यावांचून तूं जाऊं नको. मग त्यांनी त्यास पुस्तकालयांत नेऊन अत्यंत प्राचीन लेख होते त्यांतून प्रथमतः त्या पर्वताच्या स्वामीची वंशावळी दाखविली तेथे असें लिहिलें होतें कीं, हा अनादि काळींच्यांचा अनादि पुत्र आहे; याने जीं कर्में केलीं; आणि ज्या शेंकडों जणांस आपल्या सेवेस लावलें; आणि ज्याचा काळें करून किंवा स्वभावेंकरून नाश होत नाहीं अशा स्थानीं त्यास टेविलें, तें सर्व सविस्तर त्या लेखांत होतें.

[ **यात्रिक क्रमण**, इहलोकापासून परलोकास हे स्वप्नाच्या रूपकानें कथिलें. ज्यान बन्यान् याने मूळग्रंथ केला. त्याचें भाषांतर हरि केशवजी सोमवंशी क्षत्रिय पाठारे यांनी केलें. ]

* * *

: ३ :

# गोविंद नारायण माडगांवकर

इंग्रजी अमदानींतील पहिल्या पिढींत मराठीची नवीन रचना व जोपासना करणारे चार मोठे लेखक होऊन गेले. पहिले बापू छत्रे यांना 'आधुनिक मराठीचे जनक' हें नांव शोभेल. बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठींतून अनेक प्रकारांनी शिक्षणप्रसार केला व लोकांना विद्येची गोडी लावली हरि केशवजी यांनी उत्तम इंग्रजी ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करून शास्त्रीय ज्ञानाचा पायंडा घातला; तर प्रस्तुत चरित्रनायक माडगांवकर यांनी धार्मिक, नैतिक आणि सामाजिक विषयांवर लिहून पुढील सुधारणांचा मार्ग सुकर करून दिला. या सर्वांनी मराठी भाषेला नीटनेटकेपणा त्या काळांत आणून दिला. कालगतीने या साहित्यिकांचें ग्रंथकर्तृत्व आज स्मरणांत राहिलें नसलें तरी त्यांच्या वेळच्या संक्रमणकाळावर त्यांनी आपलीं पाऊलें खोल रुजविलीं होतीं यांत शंका नाही. तर्हा या चौकडींतील माडगांवकरांचें व्यक्तिमत्व काय होतें तें या लेखांत पाहणें आहे.

गोविंदजींचा जन्म सारस्वत कुटुंबांत गोवें प्रांतांत मडगांवनजिक पेरी या गांवीं १८१५ त झाला. त्यांचे वडील तपकीर व किरकोळ औषधें विकून कसाबसा प्रपंच चालवीत. गोविंदजी आठ नऊ वर्षांचे असतांना वडिलांनी गोवें कायमचें सोडून मुंबईस पहिलाच धंदा पण चांगला सचोटीनें चालविला. त्यामुळे त्यांची पत वाढली. गोविंदजींचें मराठी व इंग्रजी शिक्षण मुंबईसच झालें. ते 'फ्री जनरल असेंब्ली'च्या शाळेंत होते. ही शाळा डॉ. विल्सन नांवाच्या मिशनऱ्याने काळबादेवी रस्त्यावर गायवाडी गल्लींत काढली होती. वडील १८३३ च्या सुमारास वारले. तेव्हां कुटुंबाचा सर्व भार गोविंदजींवर पडल्याने त्यांनी आपलें शिक्षण गुंडाळून ठेवून त्याच शाळेंत लहानशी शिक्षकाची नोकरी धरली. योगायोग असा की, याच एका शाळेंत ते शेवटपर्यंत होते.

त्यांनी शालेय शिक्षण अपुरें असतांहि पुढे स्वतःच्या प्रयत्नाने तें बरेंच वाढविलें. त्यामुळे मिशन हायस्कुलांत त्यांना शिक्षक म्हणून घेण्यांत आलें व

पुढे ते शाळेचे पर्यवेक्षक (सुपरिंटेंडेंट) या जागेपर्यंत चढले. उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता व शाळेबाहेरहि दादोबा पांडुरंग, डॉ. भाऊ दाजी, रावसाहेब मंडलिक यांसारखा त्यांचा मोठा शिष्यवर्ग होता. १८६३ साल अखेर त्यांनी शाळा सोडली तेव्हां २८ जानेवारी १८६४ रोजीं त्यांचे विद्यार्थी व चहाते यांनी त्यांना मानपत्र देऊन मोठा गौरव केला व वर्गणीने जमा केलेल्या दोन हजार रुपयांची थैली अर्पण केली. या समारंभाचे अध्यक्ष डॉ. विल्सन होते. त्यांनी माडगांवकरांच्या शाळेंतील कामाबद्दल प्रशंसोद्गार काढलेच, पण विशेषतः त्यांनी मराठी आणि गुजराथी भाषेंत ग्रंथलेखन करून समाजजागृतीचें जें कार्य केलें त्याबद्दल व त्यांच्या सच्चारित्र्याबद्दल त्यांना मोठे धन्यवाद दिले.

गोविंदजींचा स्वभाव फार सालस व वृत्ति अतिशय निर्लोभी असे. त्यांच्या इष्टमित्रांनी व एका संस्थानिकानेहि मोठी नोकरी देण्याचें आश्वासन दिलें असतांहि ते दरमहा ६० रु. वेतनावर मिशनरी शाळेंत मिशनरी वृत्तीने राहिले. केवढा हा त्यांचा स्वार्थत्याग ! मोठमोठ्या लोकांशीं त्यांचा पत्रव्यवहार असे व त्यांचें वजनहि या समाजांत असे. पण त्याचा व्यवहारी उपयोग त्यांनी करून घेतला नाही.

मिशनऱ्यांच्या निकट सहवासांत, एवढेंच नव्हे तर मिशनरी शाळेंत ख्रिस्ती धर्मग्रंथ शिकवीत असतांनाहि त्यांनीं बाबा पदमनजींप्रमाणे आपला धर्म सोडला नाही. हें यांचें व हरि केशवजींचें उदाहरण बाबांचे वडील त्यांच्यापुढे मांडीत. बाबांच्या मतें माडगांवकर व दादोबा पांडुरंग देहाने ख्रिस्ती झाले नव्हते तरी मनाने म्हणजे विचाराने तसे होते. कांही का असेना, गोविंदजी हे सद्धर्माभिमानी व सद्वृत्तीचे असल्याने त्यांचा लौकिक धर्म त्यांच्याबद्दलच्या आदराच्या आड येत नाही.

त्यावेळच्या प्रसिद्ध 'ज्ञानप्रसारक मंडळी'च्या चालकांपैकीच ते एक असून, त्यांनी ही मृतप्राय झालेली जुनी संस्था पुन्हा ऊर्जितावस्थेस आणली. मराठी 'ज्ञानप्रसारकां'त त्यांचे अनेक लेख येऊन गेले आहेत. त्यांतून कांही पुस्तकें निघालीं. सरकारी क्लासबुक कमिटीचे व पुरस्कारार्थ आलेल्या पुस्तकपरीक्षण-समितीचे ते सभासद असत.

त्यांचें ग्रंथकर्तृत्व बाचा पदमनजींप्रमाणे दांडगें म्हणतां येणार नाहीं; तरी त्यांनी पंधरा-सोळा पुस्तकें प्रसिद्ध केलीं : (१) नीतिसंवाद. (२) हिंदुलोकांच्या रीती सुधारण्याविषयीं बोध. (३) कुटुंबसुधारणा. (४) सत्यनिरूपण. (५) दारूपासून अनर्थ. (६) पत्रावळी व द्रोण. (७) ऋणनिषेधक बोध. हीं पुस्तकें सामाजिक व नीतिपर असून; (८) 'सुलेखनविद्या' हें भाषिक आहे. (९) 'सृष्टींतील चमत्कार, त्यांचें बोधार्थ वर्णन,' व (१०) 'उद्भिज्जन्यपदार्थ' हीं शास्त्रीय विषयांचीं. (११) 'शुचिर्भूतपणा' हें आरोग्यविषयक व (१२) 'लोखंडी सडकांचे चमत्कार' हें यांत्रिक आहे. मराठींत पहिलें नाटक त्यांचेंच; त्याचें नांव (१३) 'व्यवहारोपयोगी नाटक.' हें एक अंकी ६ प्रवेशांचें नाटक बालविवाह व लग्नखर्च यांच्या निषेधपर आहे. त्यांचें दुसरें 'सुबोध' नाटक (१४) 'भोजनबंधु पानतंबाखू' नांवाचें आढळतें. यांखेरीज महत्त्वाचा त्यांचा ग्रंथ म्हणजे (१५) 'मुंबईचें वर्णन' होय. हा चारशेंहून अधिक पानाचा 'गॅझेटीअर' स्वरूपी ग्रंथ त्या काळांत अपूर्वच म्हणावा लागेल. हा खरोखरच मनोरंजक व उद्बोधक वाटतो. लेखकाची शोधकबुद्धि, वर्णनशैली, भाषाप्रभुत्व, व्यापक दृष्टि हीं सर्व या एका ग्रंथांत दिसून येतात. याची प्रस्तावनाच पाहा —

"सामर्थ्यानुरूप देशकल्याणार्थ कांहीं करावें असें लक्षांत आणून हें मुंबईचें वर्णन लिहिलें आहे. यांत स्थलवर्णन, राज्यव्यवस्था, लोकस्थिति इत्यादि मुंबईतील प्रकार जो जो दृष्टीस पडतो, तो स्वतः पाहून व ग्रंथांतरीं जें जें ह्या नामांकित शहराविषयीं सांपडतें, त्यांतील मजकूर घेतला आहे. मुंबईची पूर्वींची कशी स्थिति होती, व सद्यः कशी आहे, हा सर्व मजकूर जेवढा साध्य झाला तेवढा यामध्यें केवळ प्राकृत भाषेंत लिहिला आहे. शब्दचातुर्याकडे व वाक्यसौंदर्याकडे तादृश लक्ष दिल्याशिवाय केवळ बालबोध भाषेचाच क्रम अनुलक्षून ही रचना केली आहे. कारण कोणत्याही कृत्यांत आपल्या सामर्थ्याच्या धांवेचे पलीकडे जाण्यास डौल घालणें हें विपरीत मार्गाचें अवलंबन करणें होय. आणि तसें केल्यानें मनुष्याचें वास्तविक स्वरूप ओळखायाची लोकांस भ्रांति पडत्ये."

(मुंबईचें वर्णन, सन १८६३, प्रस्तावना)

या ग्रंथांत नकाशे असून शेवटीं शब्दार्थकोशहि जोडला आहे. मुंबईवरील लावण्या, पोवाडे व गाणीं फार मनोरंजक आहेत.

गोविंदजींच्या कांही पुस्तकांच्या दोनतीन आवृत्तिहि निघाल्या आहेत. 'उद्भिज्जन्य पदार्थ' व 'सत्यनिरूपण' या पुस्तकांचें गुजराथींत भाषांतर करून त्यांनी प्रसिद्ध केलें. मुंबई कौन्सिलचे सभासद ना. जॉन विलोबी यांनी १८५१ त Observance of Truth with special reference to the administration of justice and the advancement of the best interest of Society, या विषयावर बक्षीसें लावून ग्रंथ मागविले होते. त्याप्रमाणे 'सत्यनिरूपण' हा ग्रंथ गोविंदजींनी लिहिला.

"सत्य, ह्या विषयावर यथामति ग्रंथ रचून विद्वज्जनांच्या सेवेंत सादर करावा, असी पुष्कळ दिवस इच्छा होती. इतक्यांत लोकहितेच्छु नेक नामदार विलबी साहेब मुंबईतील माजी कौन्सेलर यांजकडून या विषयावर कोणी चांगला ग्रंथ रचिला असतां त्यास इनाम मिळेल; असी जाहिरात सन १८५१ च्या अक्टोंबर महिन्याच्या ओरिएन्टल् खिस्तीअन् स्पेक्टेटर पत्रावरून वाचण्यांत आली. त्यावरून मोठ्या उमेदीनें हा ग्रंथ रचिला. यांत कोठें व्यंगोक्ति आढळल्यास विद्वज्जनांनीं क्षमा करून हा प्रयत्न मान्य करून ध्यावा."

(आवृत्ति पहिली, सन १८५२, प्रस्तावना)

पण हा ग्रंथ लगेच प्रशंसनीय ठरला हें विशेष. यांचे ग्रंथ २५।३० पानांपासून ४००।५०० पानांपर्यंत व पाव आण्यापासून चार रुपये किंमतीपर्यंतचे आढळतील. राजकीय विषयावर एकहि ग्रंथ नाही ही एक उणीव दिसते खरी. पण गोविंदजींचा पेशाच निराळा होता. ते नेमस्त व विवेकी शिक्षक होते. समकालीन 'लोकहितवादी' प्रमाणे इंग्रज राजवटीने दिपून जाऊन त्यांनी सनातनी परंपरेवर जसा तिखट मारा केला नाही तसाच राजसत्तेच्या चांगुलपणाचा डांगोराहि पिटला नाही. निमूटपणें अध्ययनअध्यापन करून तरुण पिढीस सन्मार्गाचा कित्ता त्यांनी घालून दिला.

आपल्या कुटुंबांत त्यांनी विद्या व धर्मबुद्धि रुजविलेली दिसून येईल. त्यांचे दोघे पुतणे रामचंद्र विष्णु व दीनानाथ विष्णु चांगले साहित्यिक म्हणून प्रसिद्धीला आले. ज्ञानेश्वर, तुकाराम व रामदास यांच्या ग्रंथांची चिकित्सात्मक आवृत्ति

काढणारे रा. वि. माडगांवकर कोणा संतवाङ्मयाभ्यासकास माहीत नाहीत? दीनानाथांचे 'सुबोधपत्रिके'तील लेख मननीय आहेत. हे दोघे 'प्रार्थना-समाज'निष्ठ होते.

सन १८६३ अखेर गोविंदजींनी नोकरी सोडल्यावर कांही लेखन केलें नाही. त्यांची प्रकृति मूळचीच अशक्त पण फार नियमाने वागून त्यांनी ती आपल्या कामापुरती चांगली टिकविली. ते रात्रीं कधी लिहीतवाचीत नसत. त्यांचा अंत ता. १५ मार्च १८६५ रोजीं झाला. त्या पाश्चात्य सुधारणेची भूल पडलेल्या काळांत गोविंदजी अत्यंत विवेकी व निर्व्यसनी राहिले हें कौतुकास्पद व प्रशंसनीय खरेंच! त्यांच्याबद्दल सर्व मंडळींना आदर वाटे. नामदार विश्वनाथ नारायण मंडलिक त्यांच्याशीं विचारविनिमय करीत. लग्नखर्चासंबंधींच्या चर्चेत ता. १२ डिसेंबर १८५७ च्या पत्रांत गोविंदजी त्यांना लिहितात,

"लग्नाचे वेळीं मुंबईकर जो भपका व जी उधळपट्टी करतात त्यावर तुमचें काय म्हणणें आहे? ज्या आमच्या शिक्षणाचा आम्ही एवढा गौरव करतों त्याचाच का सारा परिणाम? ह्या शिक्षणानें आमच्यांत कोणतें असें रूपांतर घडवून आणिलें आहे कीं, त्याचा आम्ही इतका गर्व वहावा? खरें बोलावयाचें म्हणजे अजून आम्ही खऱ्या शिक्षणमंदिराचा चांगला पायासुद्धां घातला नाहीं. बरोबर दिशा उमगल्याशिवाय शिक्षणप्रसारांत केलेले आमचे प्रयत्न आरंभावस्थेंतच निष्फळ होतील. योग्य दिशा आमच्या लोकांस दाखविण्याचे जों जों आम्हीं प्रयत्न करावेत तों तों लोक अधिकाधिक चुकत जात आहेत व वेडेपणा करण्याचा हट्टच धरीत आहेत. जोंपर्यंत त्यांना असल्या मूर्खपणाच्या चालींत मोठा आनंद वाटत आहे, तोंपर्यंत त्यांच्या हातून कांही चांगली गोष्ट घडून येईल अशी आशा करणें नको."

आजहि समाजहितकर्ते हेंच म्हणत असतील, नाही?

## ग्रंथांतील कांही उतारे

— १ —

### कमाईस बरकत

आमचे कित्येक लोक असें रडगाणें सांगतात कीं, इंग्रजी राज्यांत द्रव्य मिळत नाहीं व थोडेंबहुत मिळालें तरी कोठचें कोठेंच जातें.

मुंबईंत जें कमावावें तें तिकडचें तिकडे ठेवून जावें, तें संग्रहास किंवा दोनचार पिढ्यांपर्यंत टिकावयाचें नाहीं. याचें कारण इंग्रजी द्रव्यास बरखत नाहीं, अशा अनेक वेड्या कल्पना काढितात. कोणी कोणी अकबर बादशाहाच्या वेळच्या मोहरा व पैसे देवाऱ्यांत ठेवून कमाईस बरखत व्हावी म्हणून नित्य त्यांची पूजा करितात! परंतु असा विचार करीत नाहींत कीं, आपण प्राप्तीपेक्षां अधिक खर्च करितों; तेव्हा आम्हांस बरखत कोठून येईल ? 'अदापेक्षां खर्च मोठा त्याचा होई सदा तोटा.' मग द्रव्याचा संचय कसा होईल. तर हा इंग्रजी राज्यास दोष नाहीं, आमच्याच वर्तणुकीचीं हीं फळें आहेत. अद्याप आम्ही सावधगिरीनें चाललों, तर आमच्या प्रत्ययास येईल कीं, शहाणपणानें व दक्षतेनें चाललें असतां मागील राज्यापेक्षां प्रस्तुतच्यांत कमाईस अधिक बरखत आहे, व कलियुगाचा हा महिमा आहे कीं, उद्योग करून द्रव्य कमावावें आणि तें विचारानें खर्चावें, म्हणजे त्यास बरखत येत्ये. मुंबईस जे लोक दक्षपणानें वागतात व चौकसपणानें व्यवहार ठेवितात, ते सुखी व सधन आहेत.

(मुंबईचें वर्णन, आवृत्ति पहिली, पृ. ३९१).

— २ —

## सुलेखनविद्या

निरनिराळ्या लिपींचें वळण वेगवेगळालें असतें, म्हणून त्या त्या प्रमाणें लेखणी केली पाहिजे, आणि धरली पाहिजे. मोडीचें अक्षर लिहावयास बरूची जाड लेखणी पाहिजे. बाळबोध लिहायास भेरले माडाची किंवा छच्यांच्या काड्यांची लेखणी पाहिजे. इंग्रजी लिपीस पेनच पाहिजे, त्याशिवाय चांगलें अक्षर काढतां येणार नाहीं. लेखणी नीट करितां आणि धरितां आली म्हणजे अक्षराचें वळण अर्धें साधलें असें समजावें. बाळबोध अक्षर कोणते प्रकारचें असावें याविषयीं असा श्लोक आहे :

‘ अक्षराणि सशीर्षाणि वर्तुलानि घनानि च ।
परस्परमलग्नानि कदलीफलसंघवत् ॥ ’*

इंग्रजी अक्षर काढण्याचे व पेन करण्याचे आणि लिहायास बसण्याचे त्या भाषेंत चांगले नेम लिहिलेले आहेत. त्या नेमाप्रमाणें चाललें असतां अक्षर चांगलें वळेल यांत संशय नाहीं. जे इंग्रजी शिकतात त्यांनीं हे नेम अवश्य पाहावे. इंग्रज विद्वानांनीं अक्षर काढण्याच्या पद्धति दोन घातल्या आहेत. एक तिर्कस आणि दुसरी गोल. त्यांत गोल अक्षर काढावें हें चांगलें आहे. गोल अक्षर जलद लिहिण्यास बरें पडतें, व त्यामध्यें सुरेखपणा आणायास फार मेहनत पडत नाहीं, असें एका प्रवीण लेखकाचें मत आहे. अनेक प्रकारच्या वळणाचे कित्ते आपल्यापासीं असावे. मग आपणास साधेल त्या प्रतीचें अक्षर वळवावें.” ·

( आवृत्ति पहिली, सन १८६०, पृ. २७ )

— ३ —

## नीतिसंवाद ( Elements of Morality )

( सन १८५७ त टॉमस ग्रेहाम प्रकाशकांनी छापला. डॉक्टर भाऊ दाजी यांस “ नामदार बोर्ड आव् एज्युकेशनचे मेंबर, व ग्रांट मेडिकल कॉलेजांत वैद्यशास्त्र संपादन करून स्वदेशकल्याणार्थ तत्पर व विद्यावृद्धि करण्यांत सतत झटणारे” म्हणून ‘ प्रीतिपुरःसर नजर ’ केला आहे. यांत ४ लहान संभाषणें आहेत. ) नीतीनें वागलें असतां किती कल्याण होतें, आणि अनीतीनें वागलें असतां किती हानि होती, हें सर्व या ग्रंथांत संवादरूपानें निवेदन केलें आहे. ज्या पात्रांच्या द्वारानें हा संवाद चालविला आहे, ते एका कर्मनिष्ठ गृहस्थाचे मुलगे आहेत. त्यांत रामचंद्र हा वडील आणि दीना धाकटा भाऊ. हा संवाद वाचून हे दोघे मुलगे उत्तरोत्तर नीतीची वृद्धि करितील, आणि लोकांमध्यें तिचा प्रचार करून

---

*या सुभाषिताचा दुसरा रसिक पाठभेद आम्हांस आठवतो—
अक्षराणि समानानि वर्तुलानि घनानि च ।
परस्पराविलग्नानि तरुणीकुचकुंभवत् ॥

सुशील व सुखी होतील, अशी पूर्ण आशा धरून हा ग्रंथ लिहिला आहे.

(आवृत्ति पहिली, पृ. ४–५)

— ४ —

## लोखंडी सडकांचा चमत्कार (कटाव)

हिंदुस्थानीं । अगीची गाडी ।
तिला बांधला । मार्ग लोखंडी ।
मनाचाही । वेग मोडी ।
मग कैंचीं । हत्ती घोडीं ।
पाहुनी झालीं । माणसें वेडीं ।
पाऊण तासांत । ठाण्यास धाडी ।
अधीं निघाली । युरोप खंडीं ।
प्रसार मोठा । तिचा इंग्लंडीं ।
तेथुनि आली । भरत खंडीं ।
ऐशि तिची ही । कथा उदंडी ।
अजून पसरेल । पिंडिब्रह्मांडीं ।
वृद्ध तथापि । म्हणतिल धाडी ।
गरिबांचा । व्यापार मोडी ।
हिंदुस्थाना । दरिद्र जोडी ।
ऐसें म्हणती । हिंदू खंडीं ।
तिचा महिमा । अखंडदंडी ।
किती वाणुं मी । पामर तोंडीं ।
लोखंडी रस्ता झाला । व्यापार वाढवाया ॥ १ ॥

(चंद्रिका)

* * *

: ४ :

# केरूनाना छत्रे

महाराष्ट्रांत इंग्रजी अमल सुरू होऊन, सरकारने शिक्षणप्रसाराचें कार्य हातीं घेतलें तेव्हां भौतिक शास्त्रावरचीं पुस्तकें इंग्रजी ग्रंथांवरूनच भाषांतरित किंवा रूपांतरित करून घ्यावीं लागलीं. हरि केशवजींसारखे लेखक या कामीं फार उपयोगी पडले. पण पुढे स्वतंत्रपणें शास्त्रीय विषयांवर पुस्तकें तयार करणारे विद्वान् निघाले. यांपैकीं ज्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल ते केरूनाना छत्रे एक होत. नामांकित गणितज्ञ व ज्योतिषशास्त्रज्ञ म्हणून त्यांची फार प्रसिद्धि होती. त्यांच्यामागून झालेले शंकर बाळकृष्ण दीक्षित व व्यंकटेश बापूजी केतकर यांनी तर महाराष्ट्राची कीर्ति परदेशांतहि नेली. आज दुर्दैवाने ज्योतिर्गणितांत अव्वल दर्जाचा संशोधक महाराष्ट्रांत नाहीं. कॉलेजांतून हा विषय घेणारे फारच थोडे निघतात. पंचांगसंशोधनांतील सायन–निरयनवाद समजणारे किती सुशिक्षित सांपडतील? केरूनानांनीच शुद्ध पंचांगाची आवश्यकता प्रथम पटवून देऊन त्या बाजूने टिकाऊ प्रयत्नहि केले. नंतर लो. टिळकांनी नानांच्या पंचांगशुद्धिकार्याला मोठी चालना दिली. केरूनाना हे कोंकणांतील वसणीच्या छत्रे घराण्यांतील. वसणी गांव रत्नागिरीपासून सहा मैलांवर आहे. तेथून छत्रेकुटुंब मुंबईस वाळकेश्वरीं आलें. याच कुटुंबांत मागे बापू छत्रे हे मराठींतील आद्य लेखकांपैकी एक होऊन गेले. बापू हे केरूनानांचे चुलत चुलते लागतात. नानांचें पाळण्यांतील नांव विनायक होतें; पण 'केरू' हें टोपण नांवच पुढे रूढ झालें. नानांचा जन्म इ. स. १८२४ च्या मे महिन्यांत कुलाबा जिल्ह्यांतील नागांव येथे झाला.

नानांचें सारें शिक्षण मुंबईस झालें. ते त्यावेळच्या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट-मधील हुषार विद्यार्थी व प्रो. अर्लिबार यांचे आवडते शिष्य. अर्लिबार यांनी १८४० सालीं कुलाब्याच्या दांडीवर जेव्हां एक वेधशाळा उघडली तेव्हा पुढे आपल्या या गणितज्योतिष विषयांतील हुषार विद्यार्थ्याला त्यांनी मदतनीस म्हणून नोकरीवर घेतलें. त्या वेळीं नानांचें वय अवघें १५ वर्षांचें होतें. नंतर पुण्यास १८२१ सालीं निघालेल्या संस्कृत पाठशाळेस वीस वर्षांनी जेव्हां नॉर्मल

क्लास ’ म्हणजे प्राथमिक शिक्षक तयार करण्याचा वर्ग जोडला तेव्हा नानांना सृष्टिशास्त्र व गणित शिकविण्यासाठी असिस्टंट प्रोफेसर म्हणून नेमण्यांत आलें. हा मान मोठाच होता यांत शंका नाही.

पूना कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल मेजर कँडी हे असून त्यांनी मराठींतून क्रमिक पुस्तकें तयार करवून घेण्याचा मोठा व स्तुत्य उद्योग सुरू केला. या क्रमिक पुस्तकांच्या प्रकाशनांत नानांचा विशेष हात असे. त्यांचें ‘ अंकगणित ’ व ‘ पदार्थविज्ञान ’ हीं शालोपयोगी पुस्तकें फार प्रसिद्ध होतीं. १८५९ सालीं त्यांना नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट करण्यांत आलें; पण पुढील वर्षीच त्यांची बदली अहमदनगरच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर म्हणून झाली. पगार १५० रु. होता. पण नगरास त्यांना सुख लाभलें नाही. “ माझा अवतार संपला असें मला वाटतें. बाहेर अडाणी लोकांशीं प्रसंग, घरीं आल्यावर रुग्णावस्थेंत असलेल्या स्त्रीचा सहवास, शिवाय पांच मुलांची काळजी घेण्याचा त्रास व नवीन कडक नियमांप्रमाणें शाळेचें अवघड काम ! ” असें ते रावसाहेब मंडलिकांना लिहितात ( मंडलिक चरित्र, पृ. १०८६ ). मंडलिक हे पुढील पिढींतील न्या. मू. रानडे यांच्याप्रमाणे फार गुणग्राही होते. ते नानांची विद्वत्ता ओळखून त्यांना पुस्तकें लिहिण्याचा तगादा करीत. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये असतांनाच ज्ञान॰ प्रसारक सभेच्या कामांत दोघेहि चांगले लक्ष घालीत. भरती-ओहोटी, कालसाधन, हवा वगैरे विषयांवर नानांनी निबंध वाचले होते.

नगरास त्यांनी बाहेरच्या लोकांसाठी शाळेंत विविध विषयांवर पाक्षिक व्याख्यानमाला चालू केली होती. ( पुणें विद्यापीठाच्या आजच्या बहिःशाल शिक्षण मंडळाप्रमाणे हें कार्य म्हणतां येईल. ) दोन वर्षांनी पुन्हा त्यांची बदली पुण्यास झाली व १८६३ सालीं जेव्हा नॉर्मल स्कूलचें व्हर्न्याक्युलर कॉलेज झालें तेव्हा नानांना सुपरिंटेंडेंटच्या कामाखेरीज गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करावें लागे. नॅचरल फिलॉसॉफी ( सृष्टिज्ञान ) हाहि विषय ते घेत. ‘ शाला-पत्रका ’चेहि ते संपादक होते. १८६५ सालीं ते थोडे दिवस मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत व नंतर पुणें ( डेक्कन ) कॉलेजांत अव्वल प्रोफेसर झाले. त्यांना हा नेटिवांना दुष्प्राप्य असा दर्जा देण्याचें श्रेय त्यावेळचे सुज्ञ लोकप्रिय गव्हर्नर सर बार्टल फ्रियर यांना आहे. मराठींतून भाषण करण्याचा याच राज्य-

पालांनी प्रथम पायंडा पाडला. १८७३ साली सेवानिवृत्त होईपर्यंत नाना पुण्यास होते. मध्यंतरीं ( १८७५–७६ ) त्यांना कॉलेजचे हंगामी प्रिन्सिपल करण्यांत आलें होतें. त्यांनी विलायतेस जाऊन तेथील विद्वत्सभांतून भारतीय ज्योतिषगणित या विषयावर संशोधनपर निबंध वाचावेत अशी राव. मंडलिकांची फार इच्छा होती.

नानांच्या अंकगणिताच्या अनेक आवृत्त्या निघाल्या व पदार्थविज्ञानशास्त्रावर १८५२ सालापासूनच्च अनेक पुस्तकें निघालीं. " पदार्थविज्ञानाची माहिती साधारण लोकांस, आणि मुख्यत्वेंकरून मुलांस कांहींच नसते. अज्ञानानें कितीएक गोष्टींविषयीं उलटी भलभलतीच समजूत होऊन गेलेली असते. म्हणून सृष्टींत जे चालू व्यापार आहेत त्यांच्याकडे मुलांचें लक्ष वळवून त्याच्या द्वारानें पदार्थांचे धर्म व व्यापारशक्ति यांचें ज्ञान त्यांस करून द्यावें हा हेतु मनांत धरून हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे, " अशी प्रस्तावना त्यांनी पदार्थविज्ञान पुस्तकांत केलेली आढळते. मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याखात्याच्या ' अनेक विद्याविषयक बालशिक्षाग्रंथमालें 'तील हें पहिलें पुस्तक आहे. बाल्फोर स्टुअर्ट याच्या इंग्रजी प्राइमरच्या नमुन्यावर केरूनानांनी हें तयार केलें. ' भूमापन ' हें सचित्र गणिताचें पुस्तक १८६३ सालीं व ' कुभ्रमनिर्णय ' नंतर बऱ्याच वर्षांनी निघालें. भूमि स्थिर आहे कीं नाही याविषयीं काशीच्या एका गणितवेत्त्याच्या ' भूभ्रमनिर्णय ' ग्रंथांतील कांही वादग्रस्त प्रश्नांचें यांत खंडन आहे.

केरूनानांचें मोठें कार्य व महत्त्वाचें ग्रंथसाहित्य म्हणजे त्यांचे पंचांग सुधारण्याचे प्रयत्न व ज्योतिषशास्त्रावर लिहिलेलीं पुस्तकें. ' ग्रहसाधनाचीं कोष्टकें ' व ' पचांगसाधनकोष्टकें ' त्यांनी १८६०–६१ सालांत प्रसिद्ध करून जुन्या पूर्वापार चालत आलेल्या ग्रहलाघवीय कालगणनेला मोठाच धक्का दिला. पंधराव्या शतकांत होऊन गेलेल्या गणेशदैवज्ञ या विख्यात ज्योतिषाच्या ' ग्रहलाघव ' ग्रंथावरून निरयन पद्धतीचीं पंचांगें तयार होत व आजहि होतात. पण या निरयन पंचांगांत ज्योतिर्गणित दृक्प्रत्ययास येत नाही व त्यामुळे ऋतुकाल जमत नाहींत. " संपातबिंदूवर ऋतू अवलंबून आहेत. सूर्य अश्विनींत असतां वसंतास आरंभ झाल्यास त्या वेळीं चैत्र महिना असला पाहिजे... दोन हजार वर्षांनीं तो वसंतारंभ फाल्गुन शुद्ध १ स होणार. चार हजार वर्षांनीं तो माघ शुद्ध १ स होणार " ( लो. टिळकांचा १८९१ मधील ' केसरी 'तील लेख. )

७३८२८ दि: ९-३-७९

क्लास ’ म्हणजे प्राथमिक शिक्षक तयार करण्याचा वर्ग जोडला तेव्हा नानांना सृष्टिशास्त्र व गणित शिकविण्यासाठी असिस्टंट प्रोफेसर म्हणून नेमण्यांत आलें. हा मान मोठाच होता यांत शंका नाही.

पूना कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल मेजर कँडी हे असून त्यांनी मराठींतून क्रमिक पुस्तकें तयार करवून घेण्याचा मोठा व स्तुत्य उद्योग सुरू केला. या क्रमिक पुस्तकांच्या प्रकाशनांत नानांचा विशेष हात असे. त्यांचें ‘ अंकगणित ’ व ‘ पदार्थविज्ञान ’ हीं शालोपयोगी पुस्तकें फार प्रसिद्ध होतीं. १८५९ सालीं त्यांना नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट करण्यांत आलें; पण पुढील वर्षीच त्यांची बदली अहमदनगरच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर म्हणून झाली. पगार १५० रु. होता. पण नगरास त्यांना सुख लाभलें नाही. “ माझा अवतार संपला असें मला वाटतें. बाहेर अडाणी लोकांशीं प्रसंग, घरीं आल्यावर रुग्णावस्थेंत असलेल्या स्त्रीचा सहवास, शिवाय पांच मुलांची काळजी घेण्याचा त्रास व नवीन कडक नियमांप्रमाणें शाळेचें अवघड काम ! ” असें ते रावसाहेब मंडलिकांना लिहितात ( मंडलिक चरित्र, पृ. १०८६ ). मंडलिक हे पुढील पिढींतील न्या. मू. रानडे यांच्याप्रमाणे फार गुणग्राही होते. ते नानांची विद्वत्ता ओळखून त्यांना पुस्तकें लिहिण्याचा तगादा करीत. एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्ये असतांनाच ज्ञान-प्रसारक सभेच्या कामांत दोघेहि चांगले लक्ष घालीत. भरती-ओहोटी, कालसाधन, हवा वगैरे विषयांवर नानांनी निबंध वाचले होते.

नगरास त्यांनी बाहेरच्या लोकांसाठी शाळेंत विविध विषयांवर पाक्षिक व्याख्यानमाला चालू केली होती. ( पुणें विद्यापीठाच्या आजच्या बहिःशाल शिक्षण मंडळाप्रमाणे हें कार्य म्हणतां येईल. ) दोन वर्षांनी पुन्हा त्यांची बदली पुण्यास झाली व १८६३ सालीं जेव्हा नॉर्मल स्कूलचें व्हर्न्याक्युलर कॉलेज झालें तेव्हा नानांना सुपरिंटेंडेंटच्या कामाखेरीज गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करावें लागे. नॅचरल फिलॉसॉफी ( सृष्टिज्ञान ) हाहि विषय ते घेत. ‘ शाला-पत्रका ’चेहि ते संपादक होते. १८६५ सालीं ते थोडे दिवस मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत व नंतर पुणें ( डेक्कन ) कॉलेजांत अव्वल प्रोफेसर झाले. त्यांना हा नेटिवांना दुष्प्राप्य असा दर्जा देण्याचें श्रेय त्यावेळचे सुज्ञ लोकप्रिय गव्हर्नर सर बार्टल फ्रियर यांना आहे. मराठींतून भाषण करण्याचा याच राज्य-

पालांनी प्रथम पायंडा पाडला. १८७९ सालीं सेवानिवृत्त होईपर्यंत नाना पुण्यास होते. मध्यंतरीं ( १८७५–७६ ) त्यांना कॉलेजचे हंगामी प्रिन्सिपल करण्यांत आलें होतें. त्यांनी विलायतेस जाऊन तेथील विद्वत्सभांतून भारतीय ज्योतिषगणित या विषयावर संशोधनपर निबंध वाचावेत अशी राव. मंडलिकांची फार इच्छा होती.

नानांच्या अंकगणिताच्या अनेक आवृत्त्या निघाल्या व पदार्थविज्ञानशास्त्रावर १८५२ सालापासूनच अनेक पुस्तकें निघालीं. “ पदार्थविज्ञानाची माहिती साधारण लोकांस, आणि मुख्यत्वेंकरून मुलांस कांहींच नसते. अज्ञानानें कितीएक गोष्टींविषयीं उलटी भलभलतीच समजूत होऊन गेलेली असते. म्हणून सृष्टींत जे चालू व्यापार आहेत त्यांच्याकडे मुलांचें लक्ष वळवून त्याच्या द्वारानें पदार्थांचे धर्म व व्यापारशक्ति यांचें ज्ञान त्यांस करून द्यावें हा हेतु मनांत धरून हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे, ” अशी प्रस्तावना त्यांनी पदार्थविज्ञान पुस्तकांत केलेली आढळते. मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याखात्याच्या ‘ अनेक विद्याविषयक बालशिक्षाग्रंथमालें ’तील हें पहिलें पुस्तक आहे. बाल्फोर स्टुअर्ट याच्या इंग्रजी प्राथमरच्या नमुन्यावर केरूनानांनी हें तयार केलें. ‘ भूमापन ’ हें सचित्र गणिताचें पुस्तक १८६३ सालीं व ‘ कुभ्रमनिर्णय ’ नंतर बऱ्याच वर्षांनी निघालें. भूमि स्थिर आहे कीं नाही याविषयीं काशीच्या एका गणितवेत्त्याच्या ‘ भूभ्रमनिर्णय ’ ग्रंथांतील कांही वादग्रस्त प्रश्नांचें यांत खंडन आहे.

केरूनानांचें मोठें कार्य व महत्त्वाचें ग्रंथसाहित्य म्हणजे त्यांचे पंचांग सुधारण्याचे प्रयत्न व ज्योतिषशास्त्रावर लिहिलेलीं पुस्तकें. ‘ ग्रहसाधनाचीं कोष्टकें ’ व ‘ पचांगसाधनकोष्टकें ’ त्यांनी १८६०–६१ सालांत प्रसिद्ध करून जुन्या पूर्वापार चालत आलेल्या ग्रहलाघवीय कालगणनेला मोठाच धक्का दिला. पंधराव्या शतकांत होऊन गेलेल्या गणेशदैवज्ञ या विख्यात ज्योतिषाच्या ‘ ग्रहलाघव ’ ग्रंथावरून निरयन पद्धतीचीं पंचांगें तयार होत व आजहि होतात. पण या निरयन पंचांगांत ज्योतिर्गणित दृक्प्रत्ययास येत नाही व त्यामुळे ऋतुकाल जमत नाहींत. “ संपातबिंदूवर ऋतू अवलंबून आहेत. सूर्य अश्विनींत असतां वसंतास आरंभ झाल्यास त्या वेळीं चैत्र महिना असला पाहिजे... दोन हजार वर्षांनीं तो वसंतारंभ फाल्गुन शुद्ध १ स होणार. चार हजार वर्षांनीं तो माघ शुद्ध १ स होणार, ” ( लो. टिळकांचा १८[illegible] मधील ‘ केसरी ’तील लेख. )

७३८२८ दि: 8-3-79

अशा रीतीने चालू निरयनपद्धति कायम ठेवल्यास कालांतराने चैत्रांत पावसाळा येईल. तेव्हां सायनगणनाच सर्वस्वी ग्राह्य असली पाहिजे. पण सनातन्यांना हें पटणें फार अवघड होतें.

१८१५ सालीं पंढरपुरास खून झालेल्या गंगाधरशास्त्री पटवर्धनांचे वंशज पुण्यास राहतात. केरूनानांच्या शुद्धपंचांगप्रवर्तनाच्या मोठ्या साहाय्यकांमध्ये सरदार आबासाहेब पटवर्धन हे एक होते. त्यांनी नानांच्या अभ्यासासाठी वेधयंत्रेंहि खरेदी केलीं व आपल्या खर्चानें केरूनानांनी इंग्रजी नॉटिकल अल्मानॅकवरून तयार करून दिलेलें पंचांग ते छापूं लागले (सन १८६५ पासून). या पंचांगास पुढे 'पटवर्धनी पंचांग' असें नांव पडलें व छत्रे आणि पटवर्धन यांच्याच फक्त कुटुंबांतून यावरून सणवार पाळण्यांत येऊं लागले. १८७९ सालापासून वीस वर्षें, रत्नागिरीच्या 'जगन्मित्र' छापखान्याचे मालक जनार्दन हरि आठले या पंचांगाचा अभिमान धरून स्वखर्चानें ते छापूं लागले. नंतर कांही वर्षें 'चित्रशाळा' हें काढीत असे. टिळकपंचांग पुढे आल्यापासून हें साहजिकच मागे पडलें. कारण पटवर्धनी पंचांग व टिळकपंचांग यांत फारसा फरक नाही. केरूनानांचें हें पंचांग ग्रहलाघवीय पंचांगाहून भिन्न आहे हें दाखवून देण्याचें हें स्थळ नव्हे. त्यास फार विस्ताराने लिहावें लागेल. या पंचांगशुद्धीबद्दल छत्रे मंडळींना फार त्रासहि सोसावा लागला आहे. १९०४ सालापासून पंचांगशुद्धीचा सामुदायिक प्रयत्न होऊन नवें टिळकपंचांग अस्तित्वांत आलें व अशा रीतीने केरूनानांनी प्रारंभ करून दिलेल्या कार्याचें चीज झालें. अयनांश तंतोतंत बरोबर न घेतल्याने टिळकपंचांगालाहि अगदी निर्दोष म्हणतां येणार नाही; पण जुन्याशीं जोडून घेण्याच्या वृत्तीमुळे हा दोष ठेवावा लागला आहे. काशीस छापलेला तिथिचिंतामणि नांवाचा आणखी एक ज्योतिषग्रंथ नानांच्या नांवावर आढळतो.

त्यावेळीं बनारस येथें बापूशास्त्री देव म्हणून प्रसिद्ध ज्योतिषि होते. त्यांना डॉ. विल्सन 'दुसरे केरोपंत' म्हणत. छत्रे आणि देव यांच्यामध्ये पंचांगशुद्धीचे वाद चालत. देवांना सायनगणनाच मान्य होती तरी सर्वमान्य म्हणून 'निरयनी' पंचांगच त्यांनी काढलें; पण ग्रहगणित तेवढें नॉटिकल अल्मानॅकवरून घेतलें.

राव. वि. ना. मंडलिकांना नानांच्या गुणाची जशी चहा होती तशीच पुण्याच्या आबासाहेब पटवर्धनांना होती. त्यांचा पुस्तकसाधनें, यंत्रें, मुद्रणें वगैरेंचा खर्च आबासाहेबच करीत. एरवी, या गरीब अध्यापकाला हें कसें शक्य होतें ? नानांनी 'ग्रहसाधनांचीं कोष्टकें' हें पुस्तक या सरदार पटवर्धनांनाच अर्पण केलें आहे. "सर्व प्रकारच्या विद्या व कला यांस चाहणारे व त्यांचा स्वदेशांत प्रसार होण्याविषयीं झटणारे व त्यांतील वास्तवांशाचा निरभिमानानें विचार करून त्याप्रमाणें वागणारे असे श्रीमंत राजमान्य राजेश्री विनायक गंगाधरशास्त्री पटवर्धन निसबत श्रीमंत महाराज गायकवाड सरकार सेनाखासखेल समशेर बहादूर यांस हा ग्रंथ ग्रंथकर्त्यानें त्यांच्या वरील गुणांस चाहून मोठ्या आदरानें व प्रीतीनें नजर केला असे." ही अर्पणपत्रिकेंतील प्रशस्ति अगदी सत्य आहे. आबासाहेबांचे नातू विद्यमान दाजीसाहेब पटवर्धन यांच्या संग्रहीं नानांचीं पुस्तकें, यंत्रें व पत्रव्यवहार जो होता तो आम्हीं लहानपणीं पाहिलेलाहि आहे. दाजीसाहेबहि आपल्या आजोबाप्रमाणे गुणिजनांना आश्रय देणारे असेच आहेत.

नानांचें 'पर्जन्यासंबंधीं व्याख्यान' १८८२ मध्ये नकाशे देऊन मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीने प्रसिद्ध केलें.

सरकारतर्फे केरूनाना छत्रे यांना 'रावबहादुर' हा किताब देण्यांत आला. त्यांच्या मृत्यूनंतर ( १८८४ ) सरकारने त्यांच्या कुटुंबास दरमहा शंभर रुपयांचें पेन्शन चालू केलें होतें. त्यांचे एक चिरंजीव निळकंठ ऊर्फ कोंडोपंत हेहि चांगले विद्वान् होते. ते संगीतशास्त्राचे संशोधक असून, १४ व्या नाट्यसंमेलनाचे एकदा अध्यक्ष होते. या नानांच्या घराण्यांत स्थापत्य, वैद्यक, संगीत, गणित, ज्योतिष, चित्रकला या विद्या आजवर नांदत होत्या. नाना फावल्यावेळीं पियानो वाजवीत बसत असें सांगतात. त्यांचे बंधु गोवर्धनपंत यांनी संगीतस्वरलेखन परिभाषेवर 'गीत लिपी' नांवाचा एक ग्रंथ लिहिलेला आढळतो.

पंचांगसुधारणेप्रमाणेच सामाजिक सुधारणेकडे नानांचें लक्ष असे. शाळातपासनीस असतांना, स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत त्यांनी गृहजीवनोपयोगी ( डोमेस्टिक सायन्स ) शिक्षण मुलींना मिळावें असे विचार मांडलेले सांपडतात.

त्यांचा स्वभाव फार निगर्वी व सालस असे. विद्यार्थ्यांना ते फार प्रिय असत; कारण विद्यार्थ्यांच्या हितासाठी ते सारखे झटत. त्यांचें बोलणें चांगलें विनोदी असे.

## निवडक उतारे

— १ —

## ज्योतिषशास्त्राचें अज्ञान

ज्योतिर्षविद्येचें आमचे लोकांस जें सांप्रत ज्ञान आहे तें पांच सातशें वर्षांचें जुनें आहे, असें म्हटल्यास चिंता नाहीं. ह्या विद्येंत जे अलीकडे नवीन नवीन शोध झाले आहेत व फेरफार झाले आहेत त्यांची वार्ताही त्यांस ठाऊक नाहीं.

ह्या विद्येचा आरंभ म्हटला म्हणजे मनुष्याचे उत्पत्तीपासून झाला असावा; परंतु खस्थपदार्थांच्या गतींचे नियम, आणि त्यांजविषयीं गणित, हें त्यास फार मागून प्राप्त झालें असावें. पुराणांत जें सृष्टीचें वर्णन केलें आहे त्यांत, आणि आतां आपणास तिजविषयीं जी माहिती आहे तींत किती भेद आहे तो पहा!

पुराणांतील मेरु पर्वत, सूर्याचें रथचक्र, ५० लक्ष योजनांचा पृथ्वीचा विस्तार, सात समुद्र, जैनमताप्रमाणें दोन सूर्य व दोन चंद्र, ५४ नक्षत्रें, इत्यादि गोष्टी सर्वांचे ऐकण्यांत आहेत. परंतु ज्योतिषविद्येची अधिक माहिती झाल्यावर, म्हणजे पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे ह्यांजविषयीं विशेष ज्ञान झाल्यावर, भास्कराचार्यांनीं पौराणिक मत आणि जैनमत ह्यांचें खंडन केलें, आणि पृथ्वी गोलाकार, निराधार व पांच हजार योजनें घेराची आहे, चंद्रग्रहणांचें कारण पृथ्वीची छाया आहे, पृथ्वीस सूर्यापेक्षां चंद्र जवळ आहे, इत्यादि गोष्टी कितीएक नवीन युक्तींनीं सिद्ध करून स्थापल्या. परंतु भास्कराचार्यांनंतर ह्या देशांत आजपर्यंत दुसरा कोणीही शोधक ज्योतिषि झाला नाहीं. उलटा ह्या विद्येचा ऱ्हास मात्र होत चालला आहे.

पुढें गणेश दैवज्ञ म्हणून एक चांगले गणिती झाले. त्यांनीं सोप्या युक्ती बसवून ग्रहांचें गणित सुलभ केलें. परंतु ह्यापासून दोन वाईट परिणाम झाले. एक हा कीं ज्या मानानें गणित सुलभ झालें, त्या मानानें तें स्थूल होऊन त्यांतील सूक्ष्मता कमी झाली, आणि तेणेंकरून पुढील चुकीचा पाया पडला. दुसरा परिणाम हा कीं गणित सोपें झाल्यानें सिद्धान्त ज्योतिष शिकण्याचा व वेध करण्याचा प्रचार नाहींसा होऊन, शास्त्रांच्या मूल सिद्धान्तांचें ज्ञान ज्योतिष्यांस नाहींसें झालें; हा परिणाम पहिल्यापेक्षांही विशेष वाईट आहे.

—ग्रहसाधनाचीं कोष्टकें (प्रस्तावना, पृ. १–२)

— २ —

## आमचे अध्यापक असे पाहिजेत

अध्यापकांचें काम कांहीं दिवस देशांत फिरावयाचें असलें पाहिजे. तेवढ्यांत त्यांनीं या देशांतील भूमिगत द्रव्यांचा शोध लावला पाहिजे; यंत्रकलेचा प्रसार केला पाहिजे; आमची भूमि जास्त उत्पादक केली पाहिजे; भूगर्भज्ञानाची वृद्धि करून भूमीचे थर कसले कसले आहेत त्याचें आकलन केलें पाहिजे; व तींत दुसरे पदार्थ काय काय आहेत त्याचा शोध केला पाहिजे, ते पदार्थ बाहेर कसे काढावे व त्याच्यापासून मनुष्याचें हित कसें होईल तें पाहिलें पाहिजे; संस्कृत भाषेचा अभ्यास अन्य भाषांशीं तुलनात्मक पद्धतीनें झाला पाहिजे; आमच्या ज्योतिष-शास्त्रांत सुधारणा केली पाहिजे; त्यांत नवीन शोध करून त्यांचा फैलाव सर्वत्र केला पाहिजे; आमच्या औषधीशास्त्रांत भर घातली पाहिजे, देशी विदेशी औषधांचा अनुभव घेऊन तुलना केली पाहिजे; आमच्या विद्वान् लोकांचा परस्पर संपर्क वाढला पाहिजे; त्यापासून अशी इच्छा उत्पन्न झाली पाहिजे कीं देशी औषधांत नवे शोध करून सुधारणा झाली पाहिजे; देशी शास्त्रांचें उच्चाटण करून त्यांच्या जागीं विदेशी शास्त्राची स्थापना करावयाची नाहीं पण हल्लींचा कल त्या दिशेनें नाहीं. तर्कशास्त्र, शिल्पशास्त्र, वस्तुनिर्माणशास्त्र, अशीं शास्त्रें, कला, देश, रीतिरिवाज,

आमच्या भाषा, आमचे विचार हीं सर्व शीघ्र गतीनें नाहींशीं होत आहेत. त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागा युरोपियन शास्त्रें इत्यादिकांनीं व्यापिल्या जात आहेत! अरेरे माझ्याभोंवतीं केवढा वस्तुविपर्यास मी पहात आहें!

—कॉलेजांतील अध्यापकांविपयीं अपेक्षा ( पत्रांतील अभिप्राय ).

* * *

: ५ :

# बाबा पदमनजी

मराठी वाङ्मयांत, गेल्या शतकांत आद्य ग्रंथकार म्हणून ज्यांचा आदराने गौरव करावा लागेल, त्यांपैकी बाबा पदमनजी हे एक होत. त्यांचें बरेंचसें लेखनकर्तृत्व ख्रिस्तीधर्माच्या प्रसारासाठी झालें असलें तरी आद्य कादंबरीकार, आत्मचरित्रकार, निबंधकार म्हणून यांची जी मोठी योग्यता आहे ती नाकबूल करून चालणार नाही.

बाबांचें आडनांव मुळे, जात कासार व घराण्याचा मूळचा धंदा जवाहिऱ्याचा. प्रथम घराणें सुरतेस होतें म्हणून सुरतकर म्हणत. बाबांचे वडील पदमनजी माणिकजी कॅ. जर्व्हिसच्या इंजिनियरिंग शाळेंत शिकून सर्व्हेअर झाले.

बाबांचा जन्म १८३१ च्या मे महिन्यांत बेळगांवीं झाला. प्राथमिक शिक्षण तेथेच झालें. घरीं कानडी व संस्कृत शिकत, पुराणेंहि वाचत व ऐकत. १८४३ सालीं मिशनच्या इंग्रजी शाळेंत जाऊं लागल्यापासून शाळेंतील ग्रंथालयाचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. एका पारशी मित्राजवळ गुजराती शिकून त्या भाषेचीं पुस्तकेंहि वाचलीं. यावेळीं त्यांच्या मनावर हिंदु धर्माचा पगडा अगदी गच्च बसला असल्याने मिशनऱ्यांनी या धर्माची केलेली भरमसाट निंदा ऐकून त्यांना भारी राग येई; इतका कीं, ते पुस्तक टरकावून टाकीत व हिंदुधर्मावरचीं पुस्तकें पुन्हा वाचून काढीत. त्यांच्या घरांतल्याप्रमाणे ते उपास, व्रतवैकल्यें करीत; व्यंकटेशस्तोत्र, महिम्नस्तोत्र वगैरे म्हणत; पुराण सांगत व मारुतीलाहि प्रदक्षिणा घालीत.

पुढे मुंबईस एल्फिन्स्टन स्कूलमध्ये असतांना तर रामदास, तुकाराम, मोरोपंत, महिपती वगैरेंच्या वाङ्मयाचा चांगला अभ्यास त्यांनी केला; पण वडिलांची बदली एडनला झाल्यामुळे ही शाळा सुटली व परत मुंबईस आल्यावर त्यांना मिशनच्या फ्री चर्च विद्यालयांत नांव घालावें लागलें (१८४९). या काळांत मुंबईत धर्मसुधारणेची मोठी लाट उसळली होती. आपल्यांतील इंग्रजी शिकलेली मंडळी साहेबलोकांच्या अनुकरणाने आपल्याच हिंदुधर्मावर

जाहीर कोरडे ओढत. ‘परमहंससभे’प्रमाणे जातीचे संस्कार मोडण्यासाठी कांहीं संस्था निघाल्या. ज्ञानोदय, प्रभाकर, ज्ञानप्रकाश यांसारख्या पत्रांतूनहि धर्मसमाजसुधारणेचे वाद चालत. या सर्वांचा परिणाम बाबांच्या मनावर झाल्यावाचून कसा राहील ?

फ्री चर्च मिशनमध्ये रे. शेषाद्रि या विद्वान् शिक्षकांशीं त्यांचा स्नेह झाला. बाबा एका वर्गास बायबलहि शिकवूं लागले. त्यासाठीं ख्रिस्तीधर्माचा गाढ अभ्यास त्यांना करावा लागला. तथापि स्वधर्मावरची त्यांची श्रद्धा अजीबात उडाली नव्हती. पण डॉ. मिचेल, रे. निस्बिट, ज्ञानोदयाचे संपादक मि. ह्यूम यांच्याशीं निकट स्नेह जडल्यावर त्यांना “ख्रिस्तीधर्माच्या सत्यतेचीं प्रमाणें दिसूं लागलीं.” या वेळीं ते वृत्तपत्रांतून लिहीतहि. “ज्ञानोदयानें माझी ख्रिस्तीधर्माच्या सत्यतेविषयीं व हिंदुधर्म ईश्वरप्रणीत नाहीं याविषयीं खातरी केली. ‘प्रभाकरा’नें माझ्या मनांत ब्राह्मणांविषयीं जी पूज्यबुद्धि होती ती नष्ट केली आणि ज्ञानप्रकाशानें नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ति होऊं दिली नाहीं,” असें बाबा आपल्या ‘अरुणोदय’ या आत्मचरित्रांत लिहितात.

बाबा बाटणार असें दिसून आल्यावर त्यांच्या वडिलांनी बरेच उपाय केले. त्यांना मुंबई सोडावयास लावली. पण पुन्हा ते परत आले. फ्री चर्च विद्यालयांतून काढून त्याना ग्रँट मेडिकल कॉलेजांत घातलें; पण तो कोर्स लवकरच बाबांनी सोडून दिला व ते पुन्हा फ्री चर्चमध्यें दाखल झाले.

ख्रिस्तीधर्माच्या तुलनेने त्यांनीं आपल्या हिंदुसमाजांतील अनिष्ट चालीरीति व त्या सुधारण्याच्या योजना यांवर १८५१ ते १८५४ या काळांत पांच निबंध-पुस्तकें लिहिलीं: ( १ ) स्त्रीविद्याभ्यास निबंध; ( २ ) हिंदु लोकांच्या सणांविषयीं; ( ३ ) व्यभिचारनिषेधक; ( ४ ) कुटुंबसुधारणा; व ( ५ ) निबंधमाला. या पुस्तकांतून त्यांच्या मनावर ख्रिस्तीधर्माच्या चांगुलपणाची केवढी छाप बसली होती हें स्पष्टच दिसून येतें. ‘लोकहितवादी’प्रमाणे त्यांची लेखणी आपल्या लोकांच्या हितासाठीं कठोर बनली आहे. आपण ख्रिस्ती होणार हें वडिलांना कळविल्यावर त्यांनी साहाजिकच त्रागा केला : “तूं बाप्तिस्मा घेशील तर आम्ही सर्व कुटुंब होडींत बसून नदींत मध्यभागीं जाऊन प्राण देऊं” असा त्यांना धाक घातला. मोठ्या नोकरीचें आपल्या स्नेह्यांकडून आमिष दाखविलें; पण

बाबा अगदीं शांतपणें सर्वांची समजूत घालीत होते व उलट ख्रिस्ती धर्मांतील चांगलीं तत्त्वें त्यांना समजावून देत होते. बेळगांवीं ता. ३ सप्टेंबर १८५४ रोजीं त्यांनीं बाप्तिस्मा घेतला. सहा वर्षांपूर्वी त्यांचें लग्न झालें होतें. पण बायको तिच्या बापाच्या सांगीमुळे आतां बाबांजवळ राहण्यास तयार होईना. कोर्टा-कडूनहि आणविण्याचा प्रयत्न व्यर्थ गेला. नंतर १८६० मध्ये त्यांनी दुसरें ख्रिस्ती लग्न केल्यानंतर पहिली बायको विपन्न स्थितींत असल्यामुळे बाबांकडे येऊं म्हणूं लागली. पण द्विभार्याप्रतिबंधाच्या ख्रिस्ती कायद्यामुळे बाबांचा नाइलाज होता. वडील मात्र शेवटपर्यंत त्यांना येऊन भेटत.

बाबांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यानंतर थोड्याच दिवसांनी हिंदु विधवांची दुःस्थिति वर्णन करणारें 'यमुनापर्यटन' हें गोष्टीवजा पुस्तक लिहिलें. ही आधुनिक पद्धतीची कादंबरी म्हणतां येणार नाही, तर तिला एक प्रकारची कहाणी हें नांव शोभेल. विधवांकडे आसुरी, अमानुष वृत्तीनें पाहणाऱ्या सनातनी समाजावर कोरडे ओढतांना, ख्रिस्तीधर्माचा जागजागीं जो पुरस्कार आणि गौरव केला आहे तो बाबांच्या सद्हेतूवर विरजण घालणारा वाटतो. ख्रिस्ती धर्मातील मानवता, समता, सेवाबुद्धि इत्यादि उदात्त तत्त्वें हिंदुधर्मांत पूर्वी असून तीं नंतर झालेल्या धर्मशास्त्रकारांनी गुंडाळून ठेवलीं, असें बाबांना दाखवून द्यावयाचें होतें, ही मात्र त्यांच्या बाजूची कैफियत लंगडी वाटते. तथापि, बाबांचें स्मृति, पुराणें, संतकाव्य इ. चें ज्ञान या पुस्तकांत प्रतीत होतें. याची भाषा सरळ व भारदस्त आहे. पण मराठी ख्रिस्ती धर्मग्रंथाप्रमाणे ती भाषांतरित वाटते. बायबलचे उतारेहि दिले आहेत. एवढेंच की, १९ व्या शतकांतले पहिल्याचें समाजसुधारक जी तळमळ दाखवितात ती यांत ओतप्रोत आहे. यांत कांहीं साहित्यगुण नसूनसुद्धा मुंबई विद्यापीठाने बी. ए. च्या परीक्षेसाठी मराठी वाङ्मयाच्या १८१८–१८७५ या कालखंडांत याचा एकदा समावेश केला होता. या ग्रंथाचें हस्तलिखित सुप्रसिद्ध सुधारक व व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी पाहून त्याला 'विधवाश्रुमार्जन' नांवाने एक संस्कृत निबंध जोडला. पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तींत हा संस्कृत निबंध व त्याचें मराठी भाषांतरहि आहे. पुढल्या आवृत्तींत तो गाळला. या पुस्तकाला, त्यांतील विषयामुळे चांगला आश्रय मिळाला हें मात्र खरें.

ख्रिस्ती झाल्यानंतर बाबा १६ वर्षे पुण्यास मिशनच्या शाळेंत शिक्षक होते. त्यांच्या या अफाट लेखनांतील कांही महत्त्वाचीं पुस्तकें विसरून चालणार नाहीत. मोलस्वर्थ आणि कँडी या प्रसिद्ध कोशकारांनी जे मोठे मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी कोश केले होते, ते विद्यार्थ्यांना सुलभ होण्यासाठी बाबांनी त्यांच्या संक्षिप्त आवृत्या काढल्या. हीं कठीण व किचकट कामें त्यांनी एक-ट्यांनी तनमनधन खर्च करून केलीं हें विशेष !

या संक्षिप्त इंग्रजी-मराठी कोशाच्या प्रस्तावनेंत शेवटीं मूळ मोलस्वर्थ या कर्त्याप्रमाणेंच फलश्रुति-उद्देश सांगितला आहे.

" आतां ग्रंथकर्त्याची ईश्वरापासीं हीच प्रार्थना आहे कीं, या देशांतील महाराष्ट्रभाषा बोलणारी प्रजा व तिजवर राज्य करणारें इंग्लिश भाषा बोलणारें सरकार ह्यामध्यें परस्पर सख्यत्वाची वृद्धि होण्यास, व ज्यांत अक्षय जीवनाचे शब्द आहेत असें जें पवित्रशास्त्र त्याचा ह्या देशांत प्रसार होण्यास हा लहानसा ग्रंथ कांहीं अंशीं कारणभूत होवो. "

यावरून बाबांची धर्मश्रद्धा कशी सार्वत्रिक होती हें सहज दिसून येतें.

या इंग्रजी कोशांप्रमाणेच त्यांनी शालोपयोगी संस्कृत-मराठी कोशहि प्रसिद्ध केला. त्यांचें संस्कृतचें ज्ञान बाळपणींच मिळविलेलें होतें. इंग्रजींत ' रॉजेट्च्या थेसॉरस ' नांवाचा एक अनेक प्रतिशब्दात्मक कोश आहे. त्या धर्तीवर बाबांनी ' शब्दरत्नावली ' लिहिली. या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या पुस्तकाप्रमाणेच त्यांनी आपल्या ' महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास 'हि १८६६ सालीं रचिला. यांत प्राचीन काळापासून इंग्रज येईपर्यंत काय काय घडलें तें थोडक्यांत सुबोध दिलें आहे.

इंग्रजी अमदानी येण्यापूर्वी देशांत कधीच शांतता व सुव्यवस्था नव्हती व " पुढेंही हजारों वर्षे अशीच उलटापालट, रणधुमाळी, लुटालूट व प्रजापीडन हीं चाललीं असतीं, " असें उपसंहारांत मत मांडून बाबा लिहितात—

" तर ईश्वरानेंच दया करून हा देश अशा दुरवस्थेंतून काढला. परमेश्वर न्यायी व दयाळू देव आहे. इंग्लिशांचें राज्य या देशांत कोणत्या प्रकारें वाढलें याचा निष्पक्षपातानें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, ह्या देशाच्या कल्याणार्थ ईश्वरानें त्यांस एथें आणिलें. त्यांच्या येण्यापासून देशाला किती सुख

व समाधान झालें आहे याचा थोडासा विचार करण्यास या लहानशा ग्रंथाच्या दुपटीचाही ग्रंथ पुरणार नाहीं."

(म. दे. सं. इतिहास, पृ. ८२.)

"हें इंग्रजसरकार इतकें चांगलें, न्यायी व दयाळू असण्याचें कारण कीं ज्या ख्रिस्ती धर्माप्रमाणें तें चालतें तो खरा व प्रीतीचा धर्म आहे," अशी बाबांनी आपली ठाम समजूत या पुस्तकांत नमूद केली आहे. तसेंच लोकहित-वादी, न्या. मू. रानडे प्रभृति त्या त्या वेळच्या थोर पुढाऱ्यांप्रमाणे "इंग्रजी राज्य आपल्यावर आलें तें ईश्वरी कृपेनें आपल्या कल्याणासाठींच आलें" (Divine Dispensation), अशी बाबांची ठाम समजूत यांत व्यक्त होते.

बाबांचें सर्वांत उत्कृष्ट पुस्तक म्हणजे त्यांचें 'अरुणोदय' नांवाचें आत्म-चरित्र होय. यांत "आपलें हिंदुधर्मासंबंधीं जिणें व ख्रिस्ती होणें ह्या गोष्टींचें वर्णन" असून यांत बाबांनी लहानपणापासून तो ख्रिस्ती होईपर्यंतची हकीकत दिली आहे.. शंभर वर्षापूर्वीची समाजस्थिति कळून घेण्यास समाजशास्त्राच्या अभ्यासकास याचा उपयोग तर आहेच, पण विशेषतः धर्मसुधारणेचे विचार सुशिक्षितांत कसे गोंधळ माजवीत होते, हें दिसून येईल. "एका दीन पाप्यावर ईश्वरानें जी परम दया केली तिचें वर्णन करावें आणि तें वाचून त्याजसारख्या इतर पाप्यांनीं त्या दयेचा अनुभव घ्यावा व ज्यांस असा अनुभव झाला आहे त्यांनीं तिचा महिमा गावा," हा ग्रंथकर्त्याचा हेतु ख्रिस्ती धर्मप्रचारकांना फार मानवून याचीं इंग्रजी, तामीळ, बंगाली, ऊर्दू इतकेंच नव्हे तर चिनी आणि जर्मन या भाषांतूनहि भाषांतरें झालीं. मूळ मराठी पहिली आवृत्ति १८८८ सालीं, तर दुसरी १९०८ सालीं बाबांच्याच–अगोदर लिहून ठेवलेल्या-प्रस्तावनेसह निर्णयसागर छापखान्यांत छापली आहे. दुसऱ्या आवृत्तींत शेवटीं पुरवण्या जोडल्या आहेत, त्यांत एक रे. ना. वा. टिळक यांनी बाबांच्या गौरवपर लिहिलेली आहे.

बाबांची भाषाशैली फार सुबोध व ठसठशीत आहे. विषयाची मांडणीहि व्यवस्थित असते. त्यांची जुन्या काळचे एक उत्तम लेखक म्हणून गणना होते ती उगीच नाही.

१८६७ सालीं बाबा पुण्याच्या फ्री चर्च मिशनचे 'पाळक' झाले. हा त्यांना मोठा मान मिळाला; पण १८७२ मध्ये प्रेमळ पत्नी सेराबाई वारल्यामुळे

त्यांना धक्का बसून, पुढील वर्षी या 'पाळक'पणाचा त्यांनी राजीनामा दिला व नंतर शेवटपर्यंत लेखनव्यवसायावरच कसाबसा योगक्षेम चालविला. १८७७ त बॉंबे बायबल व ट्रॅक्ट सोसायटीचे ते संपादक झाले व ब्रिटिश ॲंड फॉरिन बायबल सोसायटीचे 'सन्मान्य सभासद' होण्याचाहि बहुमान त्यांना लाभला. त्यांची मुलगी एस्तेर त्यांना संपादकीय कामांत फार मदत करी. त्यांचें तिसरें कुटुंबहि १८९० सालीं वारल्यावर त्यांना आधार मुलीचाच राहिला. १९०२ मध्ये बायबल सोसायटीने त्यांना पेन्शन दिलें त्या वेळीं ते ७१ वयाचे होते. दृष्टि अत्यंत अधू झाली होती, तथापि "(आजवर) प्रिय प्रभूनें मला सांभाळिलें, आतां माझें ऐहिक आयुष्य संपण्याची वेळ जसजशी जवळ येत आहे, तसतशी मला अनंतकालिक आयुष्याची आशा लागत चालली आहे. मी प्रभूजवळ जाण्यास उत्कंठित आहें. तरी एथेंही राहून त्याची सेवा करण्याची माझी इच्छा आहे" हे त्यांचे सात्त्विक विचार पाहा. ता. २९ ऑगस्ट १९०६ रोजीं ते प्रभूमध्ये विलीन झाले. समाजाविश्लेषण आणि आत्मविश्लेषण या संबंधांत त्यांना मागे टाकणारे मराठी लेखक फार थोडे होऊन गेले.

## बाबांच्या ग्रंथांतील उतारे

— १ —

### हिंदूंची भाषा आणि धर्म

हिंदुस्थानांतील सर्व भाषांत संस्कृत भाषेचें पुरण भरलें आहे; तरी मूळचा पिठाचा उंडा तो त्या पुरणाहून निराळाच आहे. मूळ प्राकृत भाषांचे शब्द निराळेच आहेत. त्यांची उत्पत्ति संस्कृत भाषेंत सांपडत नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शेंकडा वीस शब्द अशा प्रकारचे आहेत. त्यांच्या भाषेच्या व्याकरणाचे नियमही संस्कृत व्याकरणाशीं सर्व प्रकारें लागत नाहींत. दुसर एक प्रमाण असें आहे, कीं त्यांचा धर्म सांप्रतच्या हिंदुधर्माहून निराळा आहे. जसा शेणाचा गोळा जमिनीवर पडला म्हणजे त्याला दगड, गवत, माती वगैरे चिकटतात व त्यांत शिरतात त्याप्रमाणें आतांचा हिंदुधर्म आहे. ब्राह्मणांच्या धर्मास एथल्या मूळ प्रजेच्या धर्माच्या बहुतेक गोष्टी चिकटल्या आहेत व आंत शिरल्या आहेत. वेताळ, म्हसोबा, महादेव

अथवा त्याचे अवतार भैरोबा, जोतीबा वगैरे देव; सटवाई, मरीआई, जाखाई, जोखाई, इत्यादि दैवतें ब्राह्मण-धर्माचीं नव्हतीं. तसेंच होळी, नरकचतुर्दशी, बळीप्रतिपदा, नागपंचमी इत्यादि सणहि प्राचीन हिंदूंचे नव्हते. आणखी एक प्रमाण ह्या लोकांच्या रीतीभाती, आचार, विधि यांवरून मिळतें. त्यांचीं लग्नें ब्राह्मणांप्रमाणें होत नाहींत, ते आपल्या मेलेल्यास पुरतात. ते सर्वांच्या हातचें शिजलेलें अन्न भक्षण करितात व गाईचें मांस खातात.

( महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास, सन १८६६, पृष्ठ ३-४. )

— २ —

## माझी धर्मावरील श्रद्धा

सरकारी शाळेंतील शिक्षणानें माझी हिंदुधर्मावरील श्रद्धा कांहीं कमी झाली नाहीं. मी सुधारलेल्यांच्या मंडळींत मिळालों नाहीं. सुधारणूक म्हणजे काय हें मला ठाऊकही नव्हतें. आमचे मास्तर आम्हांस धडे शिकविण्याशीं काम ठेवीत, त्याशिवाय दुसऱ्या गोष्टी क्वचित काढीत. वर्गांतील मुलांचेंही लक्ष धड्याकडे असे. आमच्यावर जें कॉलेज दिविजन होतें, तेथें कशी काय स्थिति होती हें मला ठाऊक नाहीं. शाळेच्या जवळच मारुतीचें देऊळ होतें तेथें मी वारंवार जावें, व वर्गांत वरची जागा मिळावी म्हणून मारुतीस नवस करावा. शाळा सुटली म्हणजे घरीं येतांना रामवाडींतील रामाच्या देवळांत जावें, व तेथें पुराण होत असलें तर तें ऐकावयास उभें राहावें. अशीं "देवदर्शनें" करीत घरीं यावें. ह्या कीर्तनांत एका हरदासबावांनीं विषयलुब्ध मनुष्य आपली हानी कशी करून घेतो याविषयीं एक उत्तम दाखला दिला, तो मी अद्याप विसरलों नाहीं. ते म्हणाले कीं जसा कुत्रा एखादें सुकलेलें हाडूक चघळीत असतां त्याला त्यापासून कांहीं मिळालें नाहीं तरी त्याच्या दांतांचें रक्त त्या हाडाला लागलेलें पाहून, तें त्या हाडांतूनच निघालें असें समजून तें चाटतो, पुनः तेंच हाड तो चघळीत बसतो; तद्वत् विषयलुब्ध प्राणी आपली हानी काय होते हें न समजतां त्याच्या नादीं लागतो.

( अरुणोदय, प्रकरण ६ वें )

— ३ —

## माझें गरिबींत सुख

गरिबींत असणें हें पाप आहे अथवा श्रीमंत लोकांवर ईश्वराची विशेष दया आहे असें मी कधीं समजत नसें. जेव्हां मी गरिबींत असें तेव्हां प्रभु येशूच्या स्थितीची मला आठवण होई. तो धनवान् असून आम्हांकरितां गरीब झाला; आणि जेव्हां माझ्यापाशीं चार पैसे असत तेव्हां "नीच होणें हें मला कळलें, आणि पुष्कळ असणेंहि मला कळलें. हरएक प्रसंगीं व सर्वांमध्यें तृप्त असण्यास व भुकेला असण्यास आणि समृद्ध होण्यास असा मी पूर्ण शिकलों," हा जो पौलसचा अनुभव तो माझाहि अनुभव आहे असें वाटून मला आनंद होई. मी ख्रिस्ती झाल्यानंतर मला मोठा पगार व बढतीची जागा मिळेल असें माझ्या कित्येक ख्रिस्ती व अख्रिस्ती मित्रांस व नातलगांस वाटे व त्याविषयीं ते मला बोलूनहि दाखवीत. परंतु त्यावरून माझ्या ठायीं तसा विचार आला नाहीं. एकंदरीनें पगाराच्या व धनिकपणाच्या संबंधानें पाहिलें असतां संसाराच्या गोष्टींत देखील "रम्य ठिकाणीं मला विभाग पडला आहे" असें मला वाटावें.

(अनुभवसंग्रह, भाग : १.).

— ४ —

## मराठी भाषेचा इतिहास

आज शेंकडों वर्षांपासून एतद्देशीय विद्वानांनीं प्राकृत भाषांची उपेक्षा केल्यामुळें त्यांत विद्या, ज्ञान, नीति यांचा संग्रह झाला नाहीं. ह्या आमच्या सुंदर महाराष्ट्र भाषेची गोष्ट पाहा. तिला ब्राह्मण लोकांनीं विद्या-मंदिराच्या बाहेर हांकून दिल्यामुळें ती बिचारी रस्तोरस्तीं व गल्लोगल्लीं भटकत फिरूं लागली. तिच्या सुंदर व सुकुमार बाळांस (शब्दांस) कोणी व्याकरणाचे नियमांनीं आवरून धरणारा नसल्यामुळें, तीं उनाड होऊन सैरावैरा धांवत सुटलीं; त्यांस कोशकारांच्या शाळेंत अर्थरूप सुशिक्षा न मिळाल्यामुळें त्यांस आपला मूळ स्वभाव काय, आपलें गणगोत कोणतें, कोठलें हें समजनासें झालें. प्राकृत जनांनीं त्यांस भलभलतीं नांवें दिलीं,

व भलभलत्या कामांवर त्यांस योजिलें. त्यांच्या आईस विद्येची सेवा करायास कोणी ठेवीना म्हणून तिनें नाटककार, तमासगीर, डफ तुण-तुण्यावर गाणारे यांची चाकरी पत्करली. अशा स्थितींत असतां ह्या देशांत मुसलमानांचा प्रवेश होऊन त्यांचें प्राबल्य झाल्यावर तर महाराष्ट्र भाषेचें रूप फारच बदललें. तिला तिची माता संस्कृत भाषा हिचें निरें व पुष्टिकारक मधुर दुग्ध मिळेना म्हणून ती यावनी भाषांतील मादक रस प्राशन करूं लागली. तिचें माधुर्य व विनय जाऊन तिच्या ठायीं काठिन्य व उन्माद आला. आणि पुढें असाच क्रम चालला असतां तर काय झालें असतें तें नकळे, परंतु शिवाजी राजाचा उदय झाल्यापासून महाराष्ट्र-भाषेस ऊर्जित दशा प्राप्त झाली. मुकुंदराज, ज्ञानेश्वरप्रभृति कित्येक सुज्ञ व परोपकारी पुरुषांनीं तिला कवितेचें खाजें चारून तिची मूळ प्रकृति अगदींच बिघडूं दिल्ही नव्हती. म्हणून पुढें शिवाजीच्या वेळेस व पेशवाईंत जे प्रख्यात प्राकृत कवि झाले त्यांनीं तिला मोठ्या वात्सल्यानें आपल्या पदरांत घेऊन व तिला आपल्या अंकावर बसवून कन्येप्रमाणें तिचें लालनपालन केलें व संस्कृत भाषेचा सुधारस पाजून तिला जगत्या पंथास लाविलें.

(संक्षिप्त मराठी–इंग्रजी कोशाची प्रस्तावना, सन १८६३.)

* * *

: ६ :

# रघुनाथ भास्कर गोडबोले

महाराष्ट्रांत, गेल्या शतकांत विविध कोशांची सुव्यवस्थित रचना करून ज्ञानकोशा (एन्सायक्लोपीडिया) सारख्या सर्वसंग्राहक अशा मोठ्या ग्रंथांना प्रारंभ करून देणारे साहित्यिक म्हणून रघुनाथशास्त्र्यांचा गौरव करावा लागेल. त्यांनी पुराणांचें व मराठी संतवाङ्मयाचें चिकित्सक बुद्धीने आलोडन करून चारपांच कोश सिद्ध केले; इतकेंच नव्हे तर मुकुंदराज, ज्ञानेश्वर या आद्य कवींच्या कृती अभ्यासकांना सुलभ करून दिल्या. त्या काळांतील त्यांचें हें प्रकाशन-कार्य नीट पाहिल्यास त्यांच्या चौरस बुद्धीचा अचंबा वाटतो. लोकहितवादींच्या खालोखाल, सामान्य व सर्वांगीण महत्त्वाचें ज्ञान लोकांना करून देण्याची त्यांची तत्परता दिसून येते. महाराष्ट्रांतील कोशयुगाला त्यांनी सुरुवात करून दिली असें म्हटल्यास चुकीचें होणार नाही.

त्यांच्याविषयी दुर्दैवाने आपणांस फार थोडी माहिती आहे. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत त्यांचा जन्म वांई येथे झाला. ते थोडेंफार इंग्रजी शिकले. प्रथम सैन्यांत व नंतर शाळाखात्यांत त्यांनी नोकरी केली. त्यांच्या लेखनावरून पाहिल्यास असें ठाम मत होतें.की, त्यांचा विद्याव्यासंग जबर असला पाहिजे. कोशांना जोडलेल्या त्यांच्या लहान इंग्रजी प्रस्तावना, इंग्रजी भाषेशीं असलेला त्यांचा चांगला परिचय दर्शवितात. गेल्या शतकांतील नांवाजलेले विद्वान् शाळाकॉलेजांत फारसे न शिकतांहि लेखन आणि व्यवहार यांना चांगलें उपयोगी पडणारें इंग्रजीचें ज्ञान कसें मिळवीत होते, याचें आज नवल वाटेल. मोठ्या परिश्रमाने, चिकाटीने व स्वावलंबनाने ते विद्या संपादन करीत. अभ्यासाची जुनी पंडिती पठडी त्या काळापर्यंत तरी मोडली नव्हती. रघुनाथशास्त्री यांचे अध्यात्मगुरु निजामराज्यांतील हंसदास किंवा हंसराज होते. हे रामदासी गुरु परमहंसपंथाचे होते. वेदेश्वरी, कथाकल्पलता, आगमसार इत्यादि त्यांचे ग्रंथ आहेत. या गुरुविषयी माहिती गोडबोल्यांनी आपल्या 'हंसकोशां'त दिली आहे.

'हंसकोश' (१८६३), 'मराठी भाषेचा नवीन कोश' (१८७०), 'विवेकसिंधु' (१८७५), 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' (१८७६), 'ज्ञानदेवगाथा' (१८७७), व 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश' (१८८१) असे सहा ग्रंथ गोडबोले यांनी रचले असून, 'ज्ञानेश्वरी परिभाषा' याचे ते साहाय्यक आहेत.

" हंसकोश म्हणजे महाराष्ट्रभाषेच्या कवितांमधील कठीण व निवडक शब्दांचा कोश " अशी त्यांचीच व्याख्या असून, हा परोपकारबुद्धीने लोककल्याणार्थ रचल्याचें या कोशाच्या मुखपृष्ठावर त्यांनी छापलें आहे. या आधी त्यांनी दासबोधाची लहान परिभाषा तयार करून ठेवली होती. हंसकोशांत " दुर्बोध शब्दांस ग्रंथांतील ओव्या लावल्या व संस्कृतादि संज्ञा दर्शविल्या " असून, याच्या पहिल्या भागांत ( १ ) कवींचें वर्णन, ( २ ) कवितांमधील वेचे, ( ३ ) कवितांमधील प्रत्यय, अव्ययें, गुणविशेषणें व क्रियाविशेषणें, ( ४ ) क्रियापदें, व ( ५ ) शब्दांचे रूपांतर-नियम दिले आहेत. ( महाराष्ट्रकवितेंत यमक, छंद व कविरूढि यांच्या साधगुकीसाठी हे १६ नियम असून प्रश्नोत्तर रूपाने त्यांचा विनियोगहि दाखविला आहे. ) दुसऱ्या भागांत शब्दार्थकोश आहे. या कोशांत सात हजारांवर शब्द आहेत. " ह्या ग्रंथांत सार सार अशा निवडक प्रकारांचा संग्रह आहे म्हणून याचें नांव हंसकोश असें ठेविलें. " जुन्या कवितांतील कांही समासांचा चुकीने विग्रह केल्यामुळे 'हणावनी' सारखे ( स्वसंविद् द्रुमबीजप्ररो- । हणावनी ॥ -ज्ञानेश्वरी १८-१०. यांत प्ररोहण + अवनी असा सामासिक शब्द आहे., शेवटचा चरण 'हणावनी' असा तुटल्यामुळें हा नवीनच शब्द वाटून त्याचा अर्थ 'आवड' असा कोशांत दिला आहे. ) असे कांही दोष यांत सांपडतात. तथापि, संतकाव्याची लोकांत आवड उत्पन्न करण्यासाठी तें सुलभ करण्याचा त्यांचा प्रयत्न प्रशंसनीय आहे यांत शंका नाही. वा. गो. आपटे यांचा 'शब्दरत्नाकर' हा या पहिल्या पावला-वरचें पाऊल आहे.

'मराठी भाषेचा नवीन कोश' कां रचला याचें विवेचन या कोशाच्या प्रस्तावनेंत आहे.

" पूर्वी मुंबईमध्यें इंग्लिश सरकारचे आज्ञेवरून मोठाले पंडितांनीं मिळून मराठी भाषेचा कोश बहुत श्रम घेऊन व अपार बुद्धिसामर्थ्य खर्चून लिहिलेला

अतिशयच उत्तम आहे, परंतु तो फार मोठा असल्यामुळें हातांत वागवून फिरण्याची व पाहिजे तो शब्द पाहिजे तेव्हां पाहाण्याची अगदीं सोय नसून यवनी राज्याच्या संबंधानें जे त्या भाषेचे शब्द मराठींत मिसळले जाऊन केवळ मराठीच शब्द असें जें होऊन गेलें आहे त्याची महाराष्ट्र लोकांस कळायाजोगी निवड नाहीं; ह्या सर्व अडचणी दूर व्हाव्या व आबालवृद्धांस उपयोग पडावा असा कोश करण्याचे माझे मनांत फार दिवसांपासून होतें. त्याच हेतूनें सांप्रत हा कोश आरंभिलेला निर्विघ्नपणें परमेश्वराच्या कृपेंकरून तडीस लागला."

मराठी–मराठी शास्त्रीकोश व मोलस्वर्थाचा मराठी–इंग्रजी कोश यांचा उल्लेख वर आलाच आहे. या कोशांत श्रीधर-मोरोपंतांखेरीज जुन्या कवींचा परामर्श घेतलेला दिसत नाही. तो हंसकोशाद्वारें या कोशांत घेतला असून, अरबी-फारसी शब्दांकडे लक्ष वेधण्याची भाषाशुद्धि पण यांत सांपडेल. तथापि हा कोश फार वापरला गेल्याचें वाटत नाही. यालाच 'सुवह कोश' असें दुसरें नांव पडलें होतें. मुंबई सरकारच्या विद्याखात्याच्या हुकुमावरून हा तयार केल्याचें दिसतें.

पण त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे आणखी दोनें मोठाले कोश होत : एक 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' व दुसरा 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश.' पहिला १८७६ सालांत निर्णयसागर छापखान्यांत छापलेला असून त्याची किंमत ६ रु. आहे. "भरतवर्षांत पूर्वी आपणांमध्यें जे जे प्रख्यात लोक होऊन गेले त्यांचा, त्यांच्या स्त्रिया, त्यांचे पुत्र, त्यांचा धर्म, त्यांचे देश व राजधान्या, तसेच त्या देशांतील नद्या व पर्वत इत्यादिकांसहित, त्यांच्या जन्मापासून मरणापर्यंत जो इतिहास तो" या कोशांत ठिकाठिकाणीं मूळ ग्रंथांचा आधार दाखवून सारांशाने दिला आहे. प्राचीन इतिहासग्रंथांत जो निश्चितपणा नसतो तो काढून टाकण्याचा प्रयत्न (अर्थात् आपल्या मतानुसार) रघुनाथशास्त्री यांनी केला आहे. कोशांत पुराणांतील माहिती प्रथम देऊन, ती चुकीची किंवा मोघम वाटल्यास त्याचें स्पष्टीकरण केलेलें आढळेल. उदाहरणार्थ, सीता या शब्दाचा जानकीखेरीज दुसरा व तिसरा अर्थ स्वर्धुनी व भागीरथी यांचा एक प्रवाह असें स्पष्ट सांगून, "या प्रवाहांचा पुराणांतून व भारतांत भारी घोटाळा आहे. परंतु मीं येथें बहुमतानें त्याची नीट व्यवस्था लाविली

आहे." असें त्यांनी बजावलें आहे. सत्यलोकाविषयी माहिती देतांना, "प्राकृत ग्रंथकार मेरूवरच सत्यलोक असल्याचें वर्णितात; परंतु तें वर्णन ब्रह्मदेवाचा दिवस अत्यंत मोठा असल्याकारणानें, अगदीं खोटें आहे."

"ममता — उशिज अ० ऋषिज ऋषीची स्त्री. दीर्घतमा ऋषीची माता. दीर्घतम्याच्या वेळेस ही गर्भिणी असतां, हिशीं बृहस्पति संभोगाची इच्छा करूं लागला. त्यावरून गर्भांतून दीर्घतम्यानें त्याचा निषेध केला असतां, तूं जन्मांध होऊन जन्मशील, असा बृहस्पतीनें त्यास शाप दिला. (ही कथा धर्मशास्त्राविरुद्ध असल्यामुळें कृतक होय; कारण गार्भिणीशीं संभोग वर्ज्य असें धर्मशास्त्र आहे.)"

— भा. प्रा. ऐ. कोश, पृ. ४२३.

पूर्वी लोक धर्मशास्त्राला धरूनच हमखास वागत याविषयीं शास्त्रीबोवांचा केवढा हा विश्वास! बुध आणि तारा यांच्या अनैतिक संबंधाच्या कथेविषयी आपले साहाय्यक रामशास्त्री सुरपूरकर यांच्याशीं वाद घालून त्यांचें जुनें मत खोडून काढलें आहे. "पुराणकर्त्यांनीं असले श्रुति-स्मृतीविरुद्ध लेख मुळींच लिहिलेले नसून, कोणीं वंचकांनीं प्रतारणा करण्याकरतां नवे घातलेले असल्यामुळें कृतकच होत," या रघुनाथशास्त्र्यांच्या खरमरीत शेऱ्यावर रामशास्त्री उत्तरतात कीं, "कृतक म्हणण्यापेक्षां कूटच म्हणावें हें बरें!"

पौराणिक व्यक्तिचरित्रांबाबत हा कोश विश्वसनीय आहे. ठिकठिकाणीं पुराणांचे स्थलांच्या आंकड्यांसहित आधार दाखविले आहेत. याचा व अर्वाचीन कोशाचा उपयोग महाराष्ट्रीय ज्ञानकोश व चरित्रकोश संपादण्याच्या कामीं फार झाला. या कोशाला इंग्रजी मुखपृष्ठ व इंग्रजी प्रस्तावना देण्याचें कारण मराठीतर विद्वानांसहि याचें महत्त्व कळावें असें असेल. इंग्रजी प्रस्तावनेच्या शेवटीं आपल्या नांवाखाली A. M. N. D. हीं अक्षरें काढलीं आहेत. ही कोणती एक पदवी नसून Author of Marathi New Dictionary या शब्दांचा आद्याक्षरसंक्षेप दिसतो.

यानंतर 'भरत खंडाचा अर्वाचीन कोश' पाहूं. १८८१ सालीं निघूनहि हंसकोशाप्रमाणेच हा शिळा प्रेसमध्ये छापला आहे. अर्वाचीन काळांतील म्हणजे "युधिष्ठिरशकाच्या आरंभापासून आजपावेतों जे जे येथें नामांकित

पुरुष होऊन गेले त्या सर्वांचीं थोडथोडींच परंतु खरीं चरित्रें शोध लागला तितकीं शकमितीवार दिलीं आहेत." भरतखंडाची व्याप्ति गोडबोले हिंदुस्थानापेक्षा नऊपट अधिक मानतात ('भरतखंड' पाहा). आणि प्राचीन काल आणि अर्वाचीन काल यांस विभागणारी रेषा म्हणजे कुरुयुद्धकाल ते धरतात. माधवाचार्यांनी 'शांकरदिग्विजयांत', परमार्थसाधनपर विचारांत उत्क्रांति व तज्जन्य सामाजिक ध्येय यासंबंधी जे विचार व्यक्त केले आहेत तेच रघुनाथशास्त्री यांनी या कोशाच्या प्रस्तावनेंत मांडले आहेत. प्राचीन कोशांतल्या प्रमाणेच यांतहि कोशकाराने आपली खंडनमंडनात्मक बाजू स्पष्ट मांडली आहे.

पुंडलीक या प्रसिद्ध विठ्ठलभक्तासंबंधी माहिती देतांना, पांडुरंगमूर्ति जैनधर्मीय लोक आपली समजतात व जैनग्रंथांतील पुरावे पुढे टाकतात (ते पुरावे देऊन) त्यांचें खंडन करण्यासाठी गोडबोले सांगतात की, जैन श्लोकांतील गोष्टी सिद्ध होण्यास बराच सबळ पुरावा पाहिजे. ज्ञानेश्वरी आणि ज्ञानदेवांचे अभंग यांमधील भाषा एकसारखी नाही हें त्यांस मान्य आहे. "या उताऱ्यांवरून ज्ञानेश्वरांची भाषासरणी जी दिसून येते तीवरून लोकांचें असें अनुमान आहे कीं, त्या वेळेस भाषाच तशी होती; व आणखी तिजमध्यें छपन्न भाषांचेही शब्द आहेत, परंतु तें अनुमान खरें नाहीं; कारण स्वतः ज्ञानेश्वरानें केलेला जो हरिपाठ त्यांतीलच भाषा यास प्रत्यक्ष साक्ष असून मुकुंदराज व हेमाद्रिपंत त्यांचीहि साक्ष पाहतां वरील अनुमान सिद्ध होत नाहीं," असें ते स्पष्टीकरण देतात.

त्यांनी १८७७ सालीं प्रसिद्ध केलेल्या ज्ञानदेवगाथेंत ज्ञानदेवाच्या भावंडांचेहि अभंग दिले आहेत. यापूर्वी त्यांनी जी विवेकसिंधूची आवृत्ति प्रसिद्ध केली तींत कठीण शब्दांचा कोश दिला आहे. अर्वाचीन कोशाप्रमाणेच हे ग्रंथ रा. श्री. गोंधळेकर यांच्या जगद्धितेच्छु छापखान्यांत शिळाप्रेसवर छापलेले आढळतील.

याप्रमाणे रघुनाथशास्त्री यांनी गेल्या शतकांत मराठी वाङ्मयाची जी मोठी सेवा केली व संदर्भ ग्रंथांना चांगला प्रारंभ करून दिला त्याबद्दल आपण त्यांचे ऋणी असलें पाहिजे. त्यांचा मृत्यु १८८७ च्या जुलै महिन्यांत झाला. त्यावेळच्या 'केसरी'त त्यांचा मृत्युलेख आला होता.

# ग्रंथांतील कांही उतारे

— १ —

## ओवीछंद स्वच्छंद आहे

महाराष्ट्रभाषेचे आद्यकवि, जयत्पाल राजाचे गुरु मुकुंदराज यांणीं आचार्योक्तीवरून प्रथमतः ओवीबद्ध असा विवेकसिंधुनामक ग्रंथ रचिला व कांहीं अवकाशानें मागून परमामृत म्हणून लहानसें पुस्तक लिहिलें. त्या दोनहि ग्रंथांतील ओव्यांचा विचार करून पाहातां, संस्कृत-मध्यें जो अनुष्टुभ छंद आहे त्याच्याच साम्यतेच्या त्या म्हणावयास चिंता नव्हती. परंतु त्यांचीं अक्षरें कधीं कधीं ३२ व कधीं कधीं तीन अक्षरांच्या फेरानें अधिक किंवा उणीं अशीं आढळतात. म्हणून व अन्य कितीएक कारणांवरून ओवीछंद हा संस्कृत छंदाहून अगदीं भिन्न आहे असाच निर्णय ठरला आहे.

दासबोधादि कितीएक लहानमोठे ग्रंथ विवेकसिंधूच्याच तोडीचे आहेत. परंतु ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत या ग्रंथांच्या ओव्या अनुक्रमानें विवेकसिंधूच्या ओव्यांहून नऊनऊ दाहादाहा अक्षरांनी उण्या व अधिक अशा आहेत. म्हणजे ज्ञानेश्वरीची ओवी बावीस अथवा चोवीस अक्षरांची व भागवताची ओवी ४२ किंवा ४४ अक्षरांची आदिकरून आहे. आणि यावरून ओवीच्या परम लघुत्वाची व दीर्घत्वाची सीमा आतां लिहिलेल्या प्रमाणाहून अधिक अथवा उणी नसोन, ही कविता, कवीच्या मर्जीप्रमाणें म्हणजे स्वच्छंद कविता आहे असें सिद्ध होतें.

— हंसकोश.

— २ —

## म्लेंच्छ

अस्पष्ट भाषण करणाऱ्या व ज्ञानविज्ञानशून्य ज्या जाति त्या. यवन आणि म्लेंच्छ हे जरी वेदबाह्य आहेत तरी ह्यांच्या जाति दोन असून, त्यांमध्यें बराच भेद असल्याचें (भार० कर्ण० अ० ४५ श्लो० ३६ यावरून) दिसतें. हे प्रायः पिशाच, राक्षस किंवा प्रेत यांच्या अंशानें

जन्मलेले असून, स्वच्छंदाचारवेष्टित असतात. (भार० शांति० अ० १८८). कौरवपांडवांचें युद्ध झालें त्यांत हे लोक बरेच होते असें भारतावरून दिसतें, आणि त्यावरून कृष्णद्वैपायन व्यासास हे चांगल्या रीतीनें ऐकून जाणत होते इतकेंच नव्हे, तर ते, आमच्यांतील अडाणी लोक द्वैपायन हीं अक्षरें गाळून, व्यासकृष्ण येवढ्याच शब्दांतील, व्याकरण हा शब्द म्हणतांना जसें यियाकर्न म्हणतात, त्याप्रमाणें व्यास या स्थलीं यियास म्हणत, आणि कृष्ण या स्थलीं क्रष्ण बोलत, तो शब्द ऐकून ऐकून जीजास क्रष्ण म्हणतां म्हणतां जीजस क्राईस्ट शब्दोच्चार करीत, परस्परांत त्याच्या वार्ता नेहमीं बोलत ; आणि व्यासाची माता कुमारी, तसेच त्यास शिष्य च्यार, हेंहि वृत्त त्यांस चांगल्या प्रकारानें ठाऊक होतें, मात्र त्यांचीं नांवें तादृश त्यांच्या ध्यानांत राहिलीं नसावींत, तरी जैमिनि हा शिष्य व्यासासहि अंमळ भारी होता, त्यामुळें त्याच्या नांवाचा त्यांस विसर न पडल्यामुळें, त्याच्या गोष्टी वारंवार जॉन अशा नांवानें काढीत. आतां यावरून मला असें वाटतें कीं, पुढें त्यांच्यांत कोणी एकादा पुरुष उत्पन्न झाला असावा, आणि त्याच्यावर वर लिहिलेले व्यासाचे संबंध त्यांनीं बसविले असावेत. या माझ्या म्हणण्याचा मार्मिक लोक विचार करोत.

—भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश.

— ३ —

## नास्तिक मताचें खंडन

बौद्धमत वैदिक धर्माच्या जरी मागचें आहे, तरी तें लपून छपून बरेंच प्राचीन असल्याचें वाल्मीकि रामायणावरून दिसून येतें. त्या मतांतील लोकांच्या मनांतून अहिंसाधर्ममिषानें यज्ञ बंद पाडावेत असें तेव्हांपासून असतांहि त्या काळचे राजे व ऋषी यांच्यापुढें त्यांचा कांहीं उपाय चालेना. त्यामुळें तो ग्रह, ही संधि केव्हां येईल तिची मार्गप्रतीक्षा करीत असतां, गेल्या द्वापरयुगाच्या अंतीं भारती युद्धांत प्रायः सर्व राजे नाश पावले, तसेंच ऋषीहि अदृश्य झाले, असें पाहतांच चार्वाकाच्या व क्षपणकाच्या रूपानें प्रगट झाला. आणि त्यानें ईश्वर नाहीं, परलोक

नाहीं इत्यादि प्रकारचें नास्तिक शास्त्र प्रवृत्त करून, लोकांस यज्ञकर्मापासून परावृत्त केलें असें वृत्त त्यांच्याच ग्रंथावरून दिसून येतें.

ही नास्तिक मताच्या आघाडीची चार्वाक–क्षपणकरूप जोडी युधिष्ठिर-शकाच्या सहाशें साठाव्या वर्षाच्या सुमारास प्रगट झाल्यावर, मागून बुद्ध व अर्हत् क्रमानेंच उत्पन्न झाले. त्यांनीं जरी त्यांच्या मताचें खंडन केल्याचें व ईश्वर आणि परलोक आहेत असें मानल्याचें जैनग्रंथांवरून दिसतें तरी वेद हे पौरुष होत, हा जो त्यांचा सिद्धांत, तो त्यांनीं जीवापलीकडचा समजून, अहिंसाधर्ममिषानें कर्मकांड बंद पाडलें. तें इतकें कीं, तो शब्द थोडक्याच काळांत कानांनीं मात्र ऐकावा, अशी दशा त्यास येऊन पोंचली. अर्थात् ज्ञानकांडहि त्याच पंथास लागून राहिलें होतें.

याप्रमाणें कर्म आणि ज्ञान या दोहोंचा ऱ्हास करून, बौद्ध व जैन आपला तृतीय पंथ विस्तृत करीत सर्व भरतखंडांत सुमारें दीड हजार वर्षेंपर्यंत एकसारखी धुमश्चक्री उडवीत असतां, त्याच संधींत वैदिक लोक मध्यम कांडास ( उपासनाकांडास ) अनुसरले, परंतु तें मध्यम कांड आगमोक्त व श्रुतीविरुद्ध असल्यामुळें, एकंदरींत सर्व गोंधळच होऊन गेला असें पाहून, स्वामी कार्तिक, ब्रह्मदेव आणि इंद्र, हे तिघे ईश्वराज्ञेनें प्रथम पृथ्वीवर पुढें आले व त्यांनीं कुमारिलभट्ट, मंडनामिश्र व सुधन्वा या नांवांनीं अवतीर्ण होऊन, तशीच कर्मकांडाची पूर्ववत् स्थापना करून, बौद्ध व जैन यांचा अगदीं धुव्वा उडवून दिला.

— भरतखंडाचा अर्वाचीन कोश
( प्रस्तावना )

* * *

: ७ :

# वामन दाजी ओक

इंग्रजी अमदानींत विद्यालयांतून विशेषतः इंग्रजी वाङ्मयाचें गुणग्रहण करण्यास शिकविलें जात असल्यानें, आपल्या जुन्या उत्कृष्ट काव्येतिहास-वाङ्मयाकडे साहजिकच तरुण पिढीचें दुर्लक्ष झालें; किंबहुना आपल्या मराठींत अभिमान वाटण्याजोगें रसाळ काव्य नाहींच असा ग्रह होत चालला होता. पण 'सर्वसंग्रह' कार माधव चंद्रोबा डुकले, 'काव्यमाला' व 'काव्यसंग्रह' यांचे संपादक जनार्दन बाळाजी मोडक, वामन दाजी ओक प्रभृति काव्य-व्यासंगी संशोधकांनी मराठींतील जुनें साहित्य अनेक ठिकाणांहून गोळा करून, निवडून, सटीप प्रसिद्ध करण्याचा जेव्हा मोठा चिकाटीचा उद्योग आरंभला, तेव्हा कोठे आंग्लविद्याविभूषितांचें त्याकडे लक्ष जाऊं लागलें व त्याचा थोडाबहुत अभ्यास सुरू झाला. 'काव्येतिहाससंग्रह'कारांनी बखरींसारख्या इतिहाससाहित्याकडेहि लक्ष वेधलें. प्रस्तुत चरित्रनायक वामन दाजी ओक यांनी या दोन्ही क्षेत्रांत केलेली कामगिरी मुळीच उपेक्षणीय नाहीं. उलट वामन, मुक्तेश्वर, अमृतराय, मोरोपंत, आनंदतनय, देवनाथ यांसारख्या अव्वल दर्जाच्या कवींचा प्रथम परिचय त्यांच्यामुळेच झाला असें म्हणावें लागतें.

वामनरावांचा जन्म कोकणांत चिपळूण तालुक्यांतील हेदवी गांवीं इ. स. १८४५ मध्ये झाला. त्यांचे वडील दाजीपंत खाऊनपिऊन सुखी होते. हेदवीसच तात्या पंतोजीजवळ वामनरावांचें प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर त्यांना रत्नागिरीस हायस्कुलांत ठेवण्यांत आलें. त्या वेळीं हेडमास्तर, पुढे जगप्रसिद्ध संस्कृतपंडित म्हणून लौकिक मिळविलेले डॉ. रा. गो. भांडारकर हे होते. वामनरावांचाहि संस्कृतकडे विशेष ओढा. तेव्हा त्यांना जगन्नाथ शंकर-शेटची शिष्यवृत्ति मिळाल्यावांचून कशी राहील ! आपल्या या सन्माननीय गुरुवर्यांना वामनरावांनी १८९६ सालीं 'देवनाथकृत कवितासंग्रहा'चें पुस्तक अर्पण केलेलें आढळतें.

१८७० सालीं मॅट्रिक झाल्यावर वामनराव मुंबईत कॉलेज शिक्षणासाठी राहिले. कांही अडचणींमुळे त्यांना कॉलेजचा अभ्यास सोडून नागपुरास सिटीस्कूलमध्ये नोकरी धरावी लागली ( १८७५ ). आठ वर्षांनी ते सिटीस्कूलचे हेडमास्तर झाले; यावरून त्यांचें अध्यापनकौशल्य व शालेय शिस्तीबद्दलची कार्यक्षमता दिसून येते. नागपुरास शिक्षक म्हणून असतांना त्यांनी नुकत्याच निघालेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेवर चांगलें लक्ष ठेवून शास्त्रीबोवांशीं सामना देण्याची तयारी केली. मालाकारांनी आपल्या उत्साहाच्या भरांत मोरोपंत कवीवर जीं अपरंपार स्तुतिसुमनें उधळलीं व नसते काव्यगुण त्यांना चिकटविले त्याबद्दल वामनरावांनी मालेंतूनच शास्त्रीबोवांची हजेरी घेतली व "मन मानेल तसा अभिप्राय झोंकून देणें अत्यंत साहसात्मक, गर्हणीय व अनुचित होय," असें पटवून दिलें. 'यमक्या वामन' ही वामनपंडिताला दिलेली पदवीहि अयथार्थ आहे, असें इतर विठ्ठलादि कवींचे दाखले देऊन दाखवून दिलें. वामन पंडिताचें स्फुट काव्य व 'यथार्थदीपिका' पुढे 'कवितासंग्रहां'तून वामनरावांनी चांगल्या रीतीने संपादून या कवीची वास्तविक योग्यता वाचकांच्या नजरेस आणून दिली.

वामनरावांची बदली १८८४ नंतर नागपूर मेल नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट म्हणून झाली व पुढे पांच वर्षे ते संबळपूर हायस्कूलचे हेडमास्तर होते. वामनराव 'दंभहारक', 'अबलामित्र', 'सद्धर्मदीप', 'इंदुप्रकाश', 'विविधज्ञानविस्तार' यांसारख्या भारदस्त नियतकालिकांतून निबंध व कविता प्रसिद्ध करीत. त्यांच्या कांही पुस्तकांना दक्षिणा प्रैज कमिटीकडून बक्षिसें मिळालीं आहेत. 'लॉर्ड बेकन ह्यांचें चरित्र' ( १८८४ ), व 'बाबा नानक ह्यांचें चरित्र' ( १८८९ ) हीं दोन चरित्रें; तसेंच १८८९ सालांत 'कादंबरीकथासार', 'मुद्राराक्षसकथासार' व 'वासवदत्ताकथासार' हे सारग्रंथ त्यांचें स्वतंत्र लेखन म्हणून सांगतां येतील. मुंबईस निर्णयसागर छापखान्याने दोन मासिकें जुनें मराठी काव्य प्रसिद्ध करण्यासाठी काढलीं होतीं. त्यांचें संपादकत्व जनार्दन बाळाजी मोडक यांजकडे होतें. ते १८९० सालीं वारल्यावर वामनराव त्यांचे संपादक झाले.

मराठी काव्यग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचा उद्योग प्रथम माधव चंद्रोबा डुकले यांनी 'सर्वसंग्रह' मासिक काढून चालविला होता. तसेंच, पुण्यास 'काव्येतिहाससंग्रह' मासिक पुस्तक याच हेतूनें काढण्यांत येत होतें. पण हे संग्रह दुर्मिळ होऊं लागले असतां, मराठी काव्यवाङ्मयाच्या पुनरुज्जीवनार्थ वेळींच प्रयत्न न केल्यास उपलब्ध असलेले ग्रंथहि नष्ट होतील, म्हणून मुंबईच्या जावजी दादाजींच्या निर्णयसागर प्रेसनें सन १८९० च्या जानेवारीपासून 'काव्यसंग्रह' या नांवाने एक मासिक पुस्तक काढण्यास सुरुवात केली. वरील दोन्ही संग्रहांत प्रसिद्ध झालेलें, त्यांच्या बाहेर छापलेलें व त्यावेळेपावेतो न छापलेलें असें काव्यसाहित्य या मासिकांत पद्धतशीर व शुद्ध रीतीनें प्रसिद्ध होऊं लागलें. ग्रंथशोधन, अर्थनिर्णय, काव्यगुणग्रहण, पुराणेतिहास, व्युत्पत्ति, व्याकरण, छंद व अलंकार इत्यादि संबंधीच्या विस्तृत व विपुल टीपा देण्याचें अवघड काम वामन दाजी ओक यांच्याकडे सोपविण्यांत आलें होतें. या 'काव्यसंग्रहां'तून मुक्तेश्वर, मोरोपंत, अमृतराय, सोहिरोबा, देवनाथप्रभृति अनेक ज्ञात-अज्ञात कवींचीं पदें, कविता वगैरे उत्कृष्ट छापून निघालीं. अनेक कवींकृत पदें, कटाव, लावण्या व 'लघुकाव्यमाला' व 'काव्यमाधुर्य' यांसारखे त्यांचे कवितासंग्रह चांगले लोकप्रिय झाले. त्यांची अर्थनिर्णायक टीपा देण्याची पद्धत कशी आहे हें पुढें दिलेल्या नमुन्यांवरून कळून येणार आहे.

## टीपांचे नमुने—

१. "न दिसति, म्हणवुनि केवळ काय नसति गुर्जरीस[1] कुच[2]? राजा!।"
(—महाभारत, विराटपर्व, अध्याय २, १२.)

१. गुर्जरी = गुजराथदेशांतील स्त्री. २. गुर्जर देशांतील स्त्रियांचे स्तन इतके झांकलेले असत कीं ते असूनहि नाहींत असें वाटे. जगन्नाथराय यांनीं श्लोकांचा अर्थ कसा असावा याविषयीं एक पद्य केलें आहे त्यांतहि गुर्जरीस्तनगूढत्वाचा उल्लेख केला आहे:— 'अर्थो गिरामपिहितः पिहितश्च कश्चित्सौभाग्यमेति मरहट्टवधू कुचाभः। नांध्रीपयोधर इवातितरां प्रकाशो नो गुर्जरीस्तन इवातितरां निगूढः॥' याचा भावार्थ:— मरहट्ट (मारवाडी) स्त्रियांच्या स्तनांप्रमाणें जेव्हां कवितेचा अर्थ धड उघडा नाहीं व धड झांकलेला नाहीं तेव्हां फार खुलतो; परंतु आंध्र प्रदेशांतील

स्त्रियांच्या स्तनांप्रमाणें जेव्हां अगदीं उघडा असतो; अथवा गुर्जर देशांतील स्त्रियांच्या स्तनांप्रमाणें जेव्हां अगदीं अत्यंत गूढ (झांकलेला) असतो तेव्हां शोभत नाहीं.

२. "गाती भाट[२१] अचाट घोष करिती, थाटीं[२२] पुढें चालती,"
(सामराज्यवामनविरचित सुदामचरित्र, श्लोक ११३.)

२. पूर्वी भाट, चारण यांची प्रतिष्ठा फार असे. ते राजाचे उपाध्ये असत, आणि राजाच्या वंशाचें वर्णन कवितारूपानें करीत, व तें वर्णन वीररस उत्पन्न करण्याकरितां स्वारींत राजापुढें म्हणत. त्यांस 'वहिवंचे भाट' म्हणतात. राजांची वंशावळ त्यांजजवळ लिहिलेली असते, व दरएक राजकुळास नेमलेला भाट असतो. तो वर्षास राजदरबारीं येतो, व त्यास कांहीं द्यावें लागतें. याप्रमाणें भीक मागून ते निर्वाह करतात. जामीन घेणें तरी त्यांस घेत; मुलीबरोबर पाठविणें तरी भाट पाठवीत; त्याचेसारखा विश्वासू कोणी नाहीं व तो प्राण दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, अशी लोकांची समजूत असे. ते त्रागा करीत म्हणजे त्यांजवर कोणीं जुलूम केला तर ते आपले घरच्या म्हाताऱ्या माणसाचें डोकें मारीत; आणि जो जुलूम करील त्याचे घरीं त्या प्रेतास आणून त्याचें तोरण बांधीत व 'तुझ्यावर ही हत्या पडली' असें म्हणत! मरणाची तर त्यांस बिल्कूल पर्वा नसे. अहमदाबादेंत एका भाटिणीवर सरकारांत खोटी फिर्याद झाली. सबब ती आपले पोटांत कटार मारून वेऊन मेली! तिचें देऊळ हल्लीं शाहापुरांत आहे. कोणीं त्यांस नेमणूक वगैरे दिली नाहीं तर ते त्याचें चित्र करून, तें एका उंच काठीवर टांगून त्याजबद्दलचें कवन व निंदा सर्व मुलखभर दाखवीत फिरत. व याजकरितां राजेसुद्धां त्यांस भीत असत, आणि त्यांचा संतोष राखीत! हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्याः—ब्राह्म भाट, बारवट भाट, वहीवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमण भाट, वगैरे. भाट लोक रजपूत लोकांपासून उपजीवन करितात. त्यांच्या कवितेस कुंडली, सवाई, चौपाई, छप्पा, कवीत, छंद, प्रबंध, दोहा, केहेवत, गीत, असें म्हणतात. असें म्हणतात कीं; कृतयुगांत वेलंग, बैंकास व भीमसी

अनुक्रम ७३५२८ दि: १०।८।८१ ४-२-७९

हे मोठे भाट झाले; त्रेतायुगीं बळीराजाजवळ पिंगळ नामक भाट होता; रामाजवळ रंपाळ होता; द्वापारयुगांत पांडवांजवळ सूत व संजय हे होते; पृथ्वीराजावळ चंद भाट म्हणून होता, त्यानें 'रासा' म्हणून मोठा भारतासारखा ग्रंथ केला आहे. विक्रमाजवळ वेताळ भाट होता आणि तसाच अकबराजवळ गंग भाट म्हणून होता. २२ थाटानें.

२. "पुण्याहघोष करिती बरवा द्विजाती[३], सप्तस्वरें[४] विविध[५] वाजति वाद्यजाती;।"

(—रामात्मजकविकृत कृष्णदानकथा)

३. ब्राह्मण. ४. स्वर सात आहेत :– 'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवताः। पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिताः स्वराः॥' (अमरकोश.) 'षडजं रौति मयूरस्तु गावो नर्दंति चर्षभम्। अजाविमे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम्। पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम्। अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजरः॥ १ ॥' नि – निषाद – हा शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि – ऋषभ – हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग – गांधार – हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा – षड्ज – हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन्। षड्भ्यः संजायते यस्मात्तस्मात्षड्ज इति स्मृतः॥' 'नाक, कंठ, ऊर, जिव्हा आणि दांत या सहा स्थानांपासून होणारा तो षड्ज.] ५ म – मध्यम – हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध – धैवत् – हा अश्वाचा, याचें ललाटस्थान; प – पंचम – हा शब्द वसंतकाळांत कोकिलाचा, याचें कंठस्थान; [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु ऊर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. ५. अनेक.

या टीपांवरून अभ्यासूला काव्य तर चांगलें कळेलच; पण साहित्य-अलंकार-व्याकरणादि शास्त्रांचीहि माहिती होईल. वामनाच्या द्वारकाविजयाच्या टीपेंत त्यांनी बायको शब्दाची व्युत्पत्ति वि. वि. विस्तार (२२. अं. १–२) वरून दीड पान दिली आहे. टीपांना आधारभूत ग्रंथांचाहि उल्लेख साक्षेपाने ते करीत.

वामनराव जसे काव्यमर्मज्ञ होते तसे कवीहि होते. ‘सार्वजनिक काका’ (गणेश वासुदेव जोशी) १८८० सालीं वारले तेव्हा ‘गणपतिनिधन-विलाप’ नांवाची विलापिका त्यांनी रचली. यापूर्वी चार वर्षेंच प्रसिद्ध कर्ते सुधारक विष्णु परशुराम पंडित वारले तेव्हा २७ श्लोकांची विलापिका नागपुराहून त्यांनी प्रसिद्ध केली. तीहि करुणरसाने ओथंबलेली आहे. थोरले माधवराव पेशव्यांच्या अकाली मृत्यूवरहि त्यांनी पद्यरत्नमाला गुंफलेली आढळते. रा. ब. साने संपादीत असलेल्या ‘काव्येतिहाससंग्रह’ या ऐतिहासिक साधनग्रंथमालेंत ‘काशीराव राजेश्वर गुतेविरचित नागपूरकर भोंसल्यांची बखर’ व ‘नागपूरकर भोंसल्यांच्या संबंधाचे कागदपत्र’ अर्थनिर्णायक टीपांसह वामनरावांनी प्रसिद्ध करून इतिहास-क्षेत्रांतहि भर टाकली आहे. ते चांगले ग्रंथपरीक्षक व टीकाकारहि होते. ‘काव्यरत्नावली’च्या परीक्षकांत त्यांचें नांव असे.

१८९१ सालीं त्यांची बदली रायपुरास झाली व अखेरपर्यंत ते तेथें होते. कुटुंब निवर्तल्यावर मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. ‘काव्यसंग्रहा’स ग्राहक मिळविण्याचें काम त्यांनी पत्करलें होतें. पंढरपुरास मोरोपंती काव्याचें हस्तलिखित मिळविण्याच्या हेतूने तिकडे जात असतां वाटेंत मायजीस ते आजारी झाले. तेव्हा नागपुरास परतले. पण दुखणें वाढून १३ जून १८९७ रोजीं वामनरावांचा अंत झाला.

शिक्षकाचा कडक शिस्तीचा पेशा, प्रपंचाचा भार व संशोधकीय ग्रंथ-लेखन-संपादन यांमुळे त्यांच्या प्रकृतीवर फार ताण पडला. त्यांचा स्वभाव निर्लोभी व विनयशील होता. जुन्या मराठी वाङ्मयाचें रसग्रहण करण्यास त्यांनी शिकविलें यांत मुळीच शंका नाही. “कविहृद्गत नुसतें स्वतः समजण्याचीच नव्हे—तर तें आपल्या मधुर भाषेनें, वाचकांच्या अंतःकरणांत बिंबविण्याची शक्ति ह्यांचे अंगीं होती. ती अप्रतिम होती. ही त्यांची शक्ति ते ‘काव्यसंग्रह’ चालवूं लागल्यापासून विशेष प्रकट झाली.” असें ‘बालबोधे’कार वि. कों. ओक सांगतात (बालबोध, जुलै १८९७) तें अगदी सत्य आहे.

# ग्रंथांतील कांही उतारे

— १ —

## धर्माचा हेतु

आमच्या हिंदुस्थानांत अनेक धर्म, विविध पंथ, आणि असंख्य मतें पसरलीं आहेत. ज्याला त्याला आपला धर्म जीवप्राण वाटतो. कोणताही धर्म पाहिला तरी धर्माचा प्राण म्हटला तर विश्वास आणि ईश्वरास्तित्व होय. धर्माचा हेतु सुख. मग तें पारलौकिक असो अथवा ऐहिक असो. स्वधर्माचरण करून शेवटीं मिळवावयाचें काय? तर सुख. सुखप्राप्ति हा सर्व धर्मांचा उद्देश. हिंदुधर्म पहा, मुसलमानधर्म पहा, परधर्मोपहासपटु ईश्वरपुत्रसेवकांचा धर्म पहा, सर्वांत सुखप्राप्तीची लालुच आहे. निरपेक्ष, निरिच्छ असें म्हणून कांहीं नाहीं. विश्वासाचे पायावर सर्व धर्मांची इमारत उठविली आहे. लोकव्यवहारांत साधारणतः विश्वासाचें जसें प्राधान्य आहे तसेंच धर्मव्यवहारांतही आहे. जेथें विश्वास नाहीं तेथें धर्म नाहीं, अधर्म नाहीं, पाप नाहीं, पुण्य नाहीं आणि कांहीं नाहीं. सर्वच शून्यवत् होय. धर्माचा ओघ पारलौकिक सुखप्राप्तीकडे जसा आहे तसा ऐहिक सुखाकडे आहे. धर्मांतराच्या संबंधानें वेळोवेळीं मनुष्याचे सुखांत जितक्या घडामोडी होत असतील तितक्या दुसऱ्या कोणत्याही योगानें नाहींत.

— बाबा नानक ह्यांचें चरित्र, पृष्ठ ८ -

— २ —

## आत्मानात्मपरायणांच्या शोधाची योग्यता

पदार्थविज्ञानशास्त्र्यांस मूर्तसृष्टीमध्यें, नवनवे चमत्कार आढळून त्यांच्या आधारानें नवनवे शोध करावयास सांपडतात, त्याप्रमाणें अमूर्तसृष्टीमध्यें नवनवे चमत्कार दृष्टीस पडून, आत्मानात्मपरायणांस नवनवे चमत्कार व्यक्त करण्यास सांपडतात, आणि या सगळ्यांच्या योगानें, जगाची व्यावहारिक आणि मानसिक उन्नति होत जात आहे. ह्यांत आत्मानात्मपरायणांच्या शोधाची योग्यता कांहीं वेगळी आहे. कां कीं,

त्यांचा संबंध आत्म्याशीं म्हणजे मनुष्याच्या जिवाच्या उद्धाराशीं असतो. त्या मंडळींत कवि आणि साधु हे मुख्य होत. आणखी कवित्व आणि साधुत्व हीं ज्या व्यक्तींत एकवटतात, त्या व्यक्तीची योग्यता खरोखर अवर्णनीय होते, हें उघड आहे. असे जे कोणी वंद्य पुरुष अर्वाचीन काळीं आमच्या राष्ट्रांत होऊन गेले, त्यांत देवनाथमहाराज हे एक होते. ह्यांच्या कविता म्हटल्या म्हणजे मुख्यत्वेंकरून कटाव आणि पदें आहेत. त्यांस लोकोद्धाराची इतकी घाई झालेली दिसते कीं, मात्रा, गण, यति, यमक, छंद इत्यादिकांच्या व्यर्थ खटाटोपींकडे लक्ष देण्यास फुरसद झाली नाहीं. ते आपला भक्तिभाव लोकांच्या अंतःकरणांत, जणुं काय मोठ्या घाईनें ओतीत गेले आहेत.

— देवनाथमहाराजकृत कवितासंग्रह ( चरित्र )

— २ —

## विष्णुशास्त्री पंडितांसंबंधीं विलाप

लया गेलें भाग्य प्रतनुहि नसे पुण्य पदरीं ।
यमाला कां नाहीं उपजली दया हा ! लवभरी ।
मनीं वाटे शोका करुनि अबला दीन बसल्या ।
अरे रे शोकानें ग्रसुनि विधवा म्लान पडल्या ॥ ४ ॥

×

हिरवुनि अशा रत्ना नेलें सुतेज कसें खुलें ।
तिमिर पसरे लोकीं साऱ्या सशोक खरे भले ।
अचल विधवा ताराया जो सदां अतितत्पर ।
अहह विधिनें दुष्टें केला अहा ! बहुसत्वर ॥ ८ ॥

×

जुन्या पंडितांनीं तुला फार भ्यावें ।
तुझें नांव घेतां थरारे उठावे ।
तुझे ऐकुनी वाद सारे जनाचे ।
लया जाति किंतू बहुतां दिसांचे ॥ १७ ॥

×

परिणयें पतिसौख्य मिळावया ।
अशरणा विधवाश्रम तूं सया ।
बहुत घेवुनियां सुखि घातल्या ।
तव कृति स्तुतिपात्र खऱ्या भल्या ॥ २१ ॥

×

वा दा ओ रडुनी अहो जन भले यावें असें सांगशी ।
शास्त्रार्था बघुनी खरेंच दिसतें तें घ्या तुम्ही मानसीं ।
ऐसें त्वां कथिलें दुराग्रह लया जावा म्हणोनि सदा ।
यासाठीं कृतकृत्य तूं मज गमे जाशीं त्वरें सत्पदा ॥ २७ ॥

* * *

: ८ :

# नीळकंठ जनार्दन कीर्तने

महाराष्ट्रांतील पहिले इतिहाससंशोधक म्हणून ज्यांचा यथार्थ गौरव करावयास पाहिजे ते नीळकंठराव कीर्तने कोल्हापूरच्या कीर्तने कुटुंबांतील होत. त्यांचे वडील जनार्दनपंत कोल्हापुरास दरमहा दोन रुपयांच्या चाकरीवरून संस्थानच्या कारभारीपदापर्यंत चढले होते. त्यांची आई लहानपणींच वारली व त्यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापुरास झाल्यानंतर आपल्या बंधूसह ते मुंबईस इंग्रजी शिक्षणासाठी गेले. या कीर्तनेबंधूंबरोबर, पुढे महाराष्ट्राला ललामभूत झालेले माधवराव रानडे हेहि शिकण्यासाठी स्वतःच्या उमेदीने गेले होते. नीळकंठरावांच्या जन्माचें साल नक्की माहीत नाही, तथापि तें १८४५ च्या दरम्यान असावें. म्हणजे मुंबईला गेल्यावेळीं त्यांचें वय दहाअकरा वर्षांचें होतें. त्यांचे वडील बंधु विनायकराव पुढे चांगले नांवलौकिकास चढले व त्यांच्यामुळेच नीळकंठरावांस मध्य हिंदुस्थानांत चांगल्या नोकऱ्या मिळाल्या.

प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण वडीलबंधूंच्या नजरेखाली झाल्यानंतर नीळकंठराव मुंबईहून पुण्यास येऊन डेक्कन कॉलेजांत शिकण्यास राहिले. त्या वेळीं कॉलेजांत 'पूना यंग मेन्स असोसिएशन' नांवाची संस्था विद्यार्थ्यांना लिहिण्याबोलण्याची संवय व्हावी म्हणून काढण्यांत आली होती. या सभेंत वारंवार विद्यार्थ्यांचें निबंधवाचन होऊन चर्चा चाले. १८६५ सालीं अशाच एका सभेंत नीळकंठरावांनी, 'क्याप्टन ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका' अथवा 'मराठ्यांचे इतिहासाविषयीं थोडेंसें निरूपण' हा, पुढे मराठ्यांच्या इतिहाससंशोधनाभ्यासाचा पाया म्हणून ठरलेला, निबंध वाचला. ही सभा मोठी भारदस्त म्हटली पाहिजे. कारण, अध्यक्षस्थानीं सुविख्यात पंडित कृष्णशास्त्री चिपळूणकर असून, श्रोतेमंडळींत शंकर पांडुरंग पंडितांसारखे थोर विद्वान् गृहस्थ होते. या विद्वानांनी कीर्तन्यांच्या निबंधाची फार तारीफ केली, इतकेंच नव्हे तर शं. पां. पंडितांनी तो मागून घेऊन 'इंदुप्रकाशां'त छापविला.

त्या काळांत ग्रँट डफच्या मराठ्यांच्या इतिहासास फार मान होता. साताऱ्यास रेसिडेंट असतांना ग्रँट डफने इतिहाससाधनें गोळा केलीं ; पेशव्यांचें दफ्तरहि त्यास पाहण्यास मिळालें होतें. हीं व इतर साधनें हाताशीं घेऊन विलायतेस गेल्यावर १८२६ सालीं त्याने मराठ्यांचा पहिला मोठा इतिहास इंग्रजींत लिहिला व तो अगदी प्रमाणभूत म्हणून साहजिकच मानला जाऊं लागला. या वेळपावेतो या डफकृत इतिहासावर टीका करण्याचें कोणीं धाडस केलें नव्हतें. मराठ्यांच्या कर्तृत्वाविषयी तरुणांत अभिमान मात्र बराच जागृत झाला होता. नीळकंठरावांच्या वडील बंधूंनी १८६१ सालीं मुंबईच्या 'मराठी ज्ञानप्रसारक सभे' पुढे आपलें 'थोरले माधवराव' नाटक वाचलें. माधवराव रानडे यांनीं नाना फडणिसांवर बाणेदार लेख लिहून आपल्या अध्यापकांची इतराजी ओढवून घेतली व शिष्यवृत्ति घालविली. त्यांचे सहाध्यायी विठ्ठलराव पाठक (पुढे सातारा हायस्कूलचे हेडमास्तर असलेले) यांनी मराठ्यांच्या इतिहासाचें स्फूर्तिदायक सार काढलें होतें. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर असें स्वाभिमानाचें वारें सुशिक्षित तरुणांत शिरलें होतें. तेव्हा नीळकंठराव याला अपवाद कसे ठरतील ?

"(डफचा) ग्रंथ मोठा गूढ अथवा समर्पक आहे असें नाहीं ; त्या साहेबास जी मदत मिळाली व जे हस्तलिखित ग्रंथ सांपडले व ज्या सनदा मिळाल्या त्यांचा विचार केला असतां त्यांवर ही मोठी सुंदर इमारत उठली असें म्हणवणार नाहीं." (प्रस्तावना आवृत्ति २, पृ. २–३). "आमच्या मतें या प्रकरणांत ग्रांट डफ् साहेबांचे हातून एकच चुकी झाली आहे. ती ही कीं, त्यांनीं शिवाजीचें चरित्र लिहितांना मराठ्यांचे लेखांवर जितका भरोसा ठेवणें योग्य आहे तितका ठेविला नाहीं. इतकेंच नव्हे पण आम्हांस वाटतें कीं, या लेखांवर जितकें लक्ष पुरविणें योग्य आहे तितकें लक्षहि त्यांनीं पुरविलें नाहीं." (पृ. २४). कोण हें कॉलेजविद्यार्थ्यांचें धाष्ट्र्य ! त्यांच्या निबंधाचा सारांश त्यांच्याच शब्दांत पाहा—

"प्रथमतः आम्ही या विषयावर ग्रंथ अगदीं कमी व ते सर्वमान्य नाहींत असें सांगून या विषयावरील एका प्रख्यात ग्रंथकाराचे गुणदोषांचें निरूपण केलें. पुढें हा विषय मनोरंजक होऊं शकतो असें दाखवून कांहीं जुनी माहिती सांगितल्यावर शिवाजीपासून मराठ्यांचा उत्कर्ष व राज्यनीति यांचें निरूपण शेवटच्या बाजीरावापर्यंत केलें. हें केल्यावर पुढें इंग्रजी राज्यावर जी आम्हीं

टीका केली ती नीट समजावी असें झालें. यावर कांहीं पुढचाही विचार केला. गोष्टीचे कथनांतच ग्रांट डफ् साहेबांचे ग्रंथांतील गुणदोष दाखविल्यास मनोरंजक होईल असें वाटल्यावरून तसेंही केलें."

या गाजलेल्या निबंधाबद्दल पुढे पट्टीचे इतिहाससंशोधक व इतिहासकार म्हणून प्रसिद्धि पावलेले वि. का. राजवाडे आपल्या पहिल्या साधनग्रंथाच्या प्रस्तावनेंत लिहितात की, "कीर्तन्यांना अस्सल कागदपत्र न मिळाल्यामुळें यद्यपि त्यांनीं केलेली टीका तांत्रिक आहे तत्रापि ग्रांट-डफच्या ग्रंथांत दोष व न्यूनें आहेत हें दाखविण्यास तिचा उपयोग झाला आहे. हिंदु लोकांच्या भित्रेपणाविषयीं व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीं ह्या टीकाकारांचें म्हणणें सयुक्तिक व सशास्त्र आहे."

डफ्च्या पुस्तकांतील शिवाजीमहाराजांच्या चरित्रासंबंधी आपल्या निबंधांत कीर्तने यांनी असमाधान व्यक्त केलेलें आपण वर वाचलेंच. या आंग्ल इतिहासकाराने महाराजांना कसा अन्याय केला आहे हें दाखविण्याकरिताच की काय त्यांनी पुढे १८८२ सालीं 'विविधज्ञानविस्तारां'तून मल्हार रामरावकृत 'श्रीशिवछत्रपति महाराज यांचें सप्त प्रकरणात्मक चरित्र' प्रसिद्ध केलें. या बखरीच्या उपोद्घातांत ते लिहितात की, "ग्रांट डफ्वरील टीकेच्या निबंधापासून लोकांचें लक्ष या विषयाकडे लागून पूज्यबुद्धि निर्माण झाली. महाराष्ट्रबांधवांची अभिरुचि वाढवावी या उद्देशानें आमच्या संग्रहीं असलेल्या बखरी प्रसिद्ध करण्याचा उद्योग आरंभिला." नंतर 'काव्येतिहाससंग्रहां'तून बखरी व इतर ऐतिहासिक साधनें प्रसिद्ध होऊं लागल्याने कीर्तने यांनी हा 'उद्योग' बंद ठेवला. बखरींचें महत्त्व, त्यांची भाषा, इंग्रज सरकारलाहि काळ्या फौजेंत वीरश्री उत्पन्न करण्यासाठी त्यांचा उपयोग वगैरे विवेचन या शिवाजीच्या बखरीच्या उपोद्घातांत त्यांनी चांगलें केलेलें आढळतें.

कॉलेजशिक्षण आटोपल्यानंतर नीळकंठराव आपल्या बंधूंच्या मदतीनें होळकर सरकारच्या विद्याखात्यांत नोकरीस राहिले. नंतर जावरा संस्थानच्या नबाबाचे शिक्षक होते. पुढे देवासच्या (धाकटी पाती) संस्थानिकाचे शिक्षक झाले. देवासच्या महाराजांनी त्यांच्या कामगिरीवर खूष होऊन त्यांना संस्थानांतील एक गांव वंशपरंपरा इनाम दिला. तो आजहि त्यांच्या नातवाकडे चालला आहे. शिक्षकपेशानंतर त्यांना मंगळूर (काठेवाड), बढवाण व देवास (धाकटी पाती)

-या संस्थानांचें कारभारीपण पत्करावें लागलें. त्यांना इंग्रज सरकारनेहि 'रावबहादूर' हा किताब देऊन गौरविलें होतें.

त्यांचा विद्याव्यासंग अखंड चालूच होता. 'इंडियन अँटिक्वेरी'सारख्या भारदस्त संशोधनपर नियतकालिकांतून त्यांचे लेख येत. चारशे वर्षांपूर्वी नयनचंद्र सूरि या जैन कवीने 'हमीर महाकाव्य' संस्कृतांत रचिलें होतें. पृथ्वीराजाच्या हमीर नांवाच्या वंशजावर रचलेलें हें ऐतिहासिक काव्य आहे. कीर्तने यांनी हें काव्य उत्कृष्ट इंग्रजी प्रस्तावनेसह चांगलें संपादून प्रसिद्ध केलें. ते पुण्यास येत तेव्हा त्यांच्या विद्वत्तेचा लाभ 'वसंतोत्सवां'त पुण्याच्या विद्या-प्रेमी व गुणग्राही श्रोत्यांना रा. ब. रानडे हमखास करून देत. त्यांचें १८८१ सालीं हिंदुधर्माच्या योग्यतेसंबंधी झालेलें व्याख्यान लहान डायरीच्या आकारांत १८८६ सालीं छापलेलें आमच्या संग्रहीं आहे. 'सांप्रत प्रचारांतील हिंदुधर्म व अर्वाचीन इष्ट सुधारणीच्या संबंधें त्याची योग्यता' असें लांबलचक नांव या छोटेखानी पुस्तकाला आहे. "लहानपणीं मी जेव्हां विश्रामबागेंत इंग्रजीचा अभ्यास नूतन करीत होतों तेव्हां हिंदुधर्माची फजीती वाचण्यांत, ऐकण्यांत येई. त्यामुळें माझ्या तापट मनास दुःख होई...(इंग्रजी विद्येच्या परिचयानें) या आचारप्रधान धर्माची अडचण भासूं लागते. माझ्या मनाची अशीच स्थिति झाली होती. नंतर बायबल, कुराण यांचें वाचन केल्यावर हींच गोष्ट दिसून आली...तेव्हां धर्माच्या ठायीं उदासीन वृत्ति आली. नंतर हिंदुधर्मावरील केरकचरा काढून टाकल्यास त्याची थोरवी कळेल असें दिसून आलें. सुनीतीच्या संबंधानें हिंदुधर्म ख्रिस्ती व मुसलमानी धर्मापेक्षां श्रेष्ठ आहे. हा धर्म ज्ञानमार्गांत आडवा येत नाहीं..." यांसारखे आत्मपरहि विचार पुस्तकांत आढळतात. "धर्मप्रकरणीं माझ्या मनाची प्रवृत्ति प्रार्थनासमाजादि मंडळ्याकडे. मुख्यत्वें इतर धर्मापेक्षां हिंदुधर्म मनुष्यांत पापभीरुता उत्पन्न करण्याविषयीं दक्ष आहे. अतएव पुराण व हरिकीर्तन ह्यांच्या श्रवणीं माझ्या मनाची रति आहे." पुराणांतील कथा म्हणजे रूपकेंच आहेत व तीं न समजल्याने सध्याच्या इंग्रजी शिकलेल्या मंडळींत अश्रद्धा उत्पन्न होते असें सांगून गणपति, महिषासुरमर्दिनी, शेषशायी नारायण, श्रीकृष्ण इत्यादि हिंदु देवतांच्या ध्यानांचें सोपपत्तिक वर्णन कीर्तने यांनीं या व्याख्यानांत केलें. धर्मकर्में आत्मशुद्धीसाठी आहेत, त्यांतील उत्तम संस्कार घ्यावेत व अनिष्ट टाकावेत, वगैरे त्यांचें विवेचन ऐकून सनातनी

श्रोत्यांस मूठभर मांस चढलें, तर आगरकरांसारखे सुधारक खंडन करण्यास प्रवृत्त झाले. प्रार्थनासमाजिष्टांना ( यांत रा. ब. रानडे आले. ) देवतांच्या साकारत्वाचें विवेचन पटलें नाहीं; कारण ते देव सगुण पण निराकार मानतात. याप्रमाणे रा. ब. कीर्तने यांचें हें व्याख्यान फार गाजलें व पुढे पांच वर्षांनी पुस्तिकेंत अवतरलें.

होळकर संस्थानांत मुख्य गुरूचें काम करीत असतांना विद्यार्थ्यांस शेक्सपियरचें ' टेंपेस्ट ' हें प्रसिद्ध नाटक शिकवावें लागे. हें नाटक शिकवीत असतांना, महादेवशास्त्री कोल्हटकरांनी ज्याप्रमाणे ' अथेल्लो 'चें सुंदर भाषांतर करून प्रसिद्ध केलें ( १८६७ ), त्याप्रमाणे याचेंहि करावें असा सुविचार कीर्तन्यांच्या मनांत येऊन, त्यांनी तो कृतींतहि आणला ( १८७५ ). हें त्यांचें ' टेंपेस्ट ' नाटक त्यावेळचे मध्यहिंदुस्थानांतील एजंट टु दि गव्हर्नर जनरल सर एच्. डी. डेली यांस अर्पण केलें आहे. याच्या प्रस्तावनेंत भाषांतराविषयीं त्यांनी आपले विचार मांडले आहेत, ते आजहि स्वीकारणीय वाटतील.

" भाषांतराविषयीं माझें मत असें आहे कीं, मुळांतील शब्द व मर्म न सुटतां कोणत्याही भाषेंतील काव्यनाटकादि ग्रंथांचें भाषांतर कोणत्याही प्रौढ भाषेंत चांगलें होऊं शकतें. ग्रंथकाराजवळ शब्दांचा व वाक्यरचनांचा भरणा मात्र पाहिजे. " ( प्रस्तावना, पृ. ८ ). या नाटकावर ' निबंधमालें 'त गुणग्रहणपर परीक्षण आहे.

याप्रमाणे कीर्तने यांच्या वाङ्मयव्यासंगाचें थोडक्यांत परीक्षण केलें आहे. रा. ब. रानडे यांच्यासारख्या त्यावेळच्या विद्वान् समाजधुरिणांत त्यांना चांगला मान असे. वढवाण संस्थानचे कारभारी असतांना कांहीं कामासाठी ते इंदुरास गेले व एकाएकीं आजारी पडून, रविवार फाल्गुन व॥ ८, शके १८१७ ( ७ मार्च सन १८९६ ) रोजीं वारले. स्वभाव फार मनमिळाऊ व बोलका असे. राहणीहि अगदी साधी असे. त्यांचे चिरंजीव कै. भास्करराव ( यांच्या पत्नी आनंदीबाई ) व त्यांचे चिरंजीव नीळकंठराव होत. कै. आनंदीबाई यांनी पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळास अर्पण केलेली रा. ब. नी. ज. कीर्तने यांची मोठी तसबीर मंडळाने ता. २६ नोव्हेंबर १९३० रोजीं कीर्तने कुटुंबाचे ऋणानुबंधी रा. ब. माधवरावसाहेब किबे यांच्या हस्तें अनावृत केली. इतक्या वर्षांनी कीर्तन्यांच्या स्मृतीला उजळा मिळाला.

# कीर्तने यांच्या ग्रंथांतील उतारे

— १ —

## मराठे मुसलमान सख्य

मराठ्यांनीं, ज्या देशांत शूर लोक नाहींत असा अपवाद आला होता, त्या देशांत शौर्याचीं कृत्यें करून या देशास मोठेपणा आणला. आपण कोणाचेही ताबेदार नाहीं असा आव घालून स्वतंत्र राज्याचा पाया घातला व देशाभिमान धरिला; इत्यादि स्तुत्य कृत्यें करूनच जरी ते राहिले असते तरी ते स्तुतीस पात्र होते. त्यांचें राज्य धर्माचे व हिंदू जातीचे अभिमानानें उद्भवलें; तथापि त्यांच्या राज्यांत इतर धर्मांचे लोकांस इजा पोंचली नाहीं. ( -सर जान माल्कम ). ज्याप्रमाणें ब्राह्मण व मराठे लोकांस मोठमोठ्या जागा मिळत त्याप्रमाणेंच मुसलमानांसही मिळत. मराठ्यांचे मुलखांत मुसलमानांचें व मराठ्यांचें हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां सख्य असतें व बाह्यात्कारीं देखील मोठ्या शहरांतील मुसलमान खेरीज करून मराठ्यांमध्यें व त्यामध्यें कांहीं फरक दिसत नाहीं, ही गोष्ट आमच्या म्हणण्यास सबळ कारण आहे. हिंदुस्थानांतील हिंदु रहिवाशी व मुसलमान रहिवाशी यांचा एकमेकांशीं द्वेष व एकमेकांच्या भिन्न रीतीभातीविषयीं ज्यानें विचार केला असेल त्यास हें आमचें म्हणणें अगदीं सयुक्तिक वाटेल. या गोष्टींचा विसर लोकांस पडला आहे असें लोकांचे साधारण बोलण्यावरून दिसतें. ही फार खेद वाटण्यासारखी गोष्ट आहे.

—क्याप्टन ग्रांट डफ्कृत मराठ्यांचे बखरीवर टीका (आवृत्ति २, पृ. ४७).

— २ —

## महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचें अध्ययन

इतिहास शिकण्यापासून कोणकोणते फायदे होतात तें आतां बहुतकरून महाराष्ट्र वाचकांस सांगण्याची गरज राहिली नाहीं. परंतु ही गोष्ट मोठी शोचनीय आहे, कीं हिंदुस्थानच्या व विशेषतः महाराष्ट्र

देशाच्या इतिहासाच्या अध्ययनापासून कांहीं उपयोग होत नाहीं असें प्रतिपादन करणारे आम्हांमध्यें अद्यापि पुष्कळ लोक आढळतात; व या वर्गांत कित्येक विद्वान् लोकांचीही गणना आहे. प्रस्तुत ग्रंथ (श्री शिवछत्रपति महाराज यांचें चरित्र) प्रसिद्ध करण्याचे पूर्वी त्यांचे अध्ययनापासून उपयोग आहे. व ते प्रसिद्ध करण्यास योग्य आहेत हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे. महाराष्ट्र देशाचे इतिहासाचे अध्ययन केल्यापासून कांहीं लाभ नाहीं, ही जी कित्येकांची गैरसमजूत आहे ती दूर करण्यास त्यांचे मताचें नुसतें खंडन करून उपयोगी नाहीं. या व्यतिरिक्त त्यांचें समाधान केलें पाहिजे. त्यांच्या दुराग्रहरूप वृक्षाचे मुळावरच घाव घातला पाहिजे. फांद्यांची छाटाछाट केल्यानें अरिष्ट टळणार नाहीं. या दुराग्रहाचें मूळ म्हटलें म्हणजे विवक्षित विषयाचें समूळ अज्ञान हेंच होय. ह्या अज्ञानाचे नाशास्तव महाराष्ट्र देशाचे इतिहासाचें चांगलें पुस्तक करून तें स्वदेशबंधु वाचतील असें तरी करावें; किंवा या विषयावर पूर्वी जे ग्रंथ लिहिलेले असतील ते सर्वांस उपलब्ध तरी करावेत; हे दोन प्रशस्त उपाय आहेत.

—श्रीशिवछत्रपतिमहाराजचरित्र—उपोद्घात.

—३—

## रूपकमय देवता

हिंदुधर्माच्या पुराणांतील देवतांचीं वर्णनें व त्यांचीं ध्यानें रूपकमय नाहींत; परंतु तीं जशीं देवतांचीं जड शरीरें आहेत तशींच त्यांचीं यथातथ्य वर्णनें आहेत, असें बहुधा सांप्रत लोकांचें मत झालें आहे. परंतु हा त्यांचा केवळ भ्रम आहे. प्रथम वेदामध्यें विवक्षित सृष्टिचमत्कारांचीं जीं सामान्यनामें आहेत तींच पुढें पुराणांमध्यें जडाकार देवतांच्या मूर्तीचीं विशेषनामें होऊन बसल्याचीं हवीं तितकीं उदाहरणें देतां येतील. अखिल सृष्ट पदार्थांमध्यें मनुष्यांच्या हृदयांत धर्मविषयक विचारांचा जणू आदि जनकच कीं काय, असा जो सूर्यमंडल मध्यवर्ती सविता हिरण्यवपु नारायण तो बहुतेक देशांतील देवताचरित्रांचा नायक आहे असें दिसून येईल. उषा, रात्री, तारामंडल, शशी इत्यादिकांशीं जो निरनिराळ्या राष्ट्रांनीं त्याचा निरनिराळा संबंध कल्पिला आहे त्या

संबंधाचीं जीं सूचक चरित्रें कल्पिलीं आहेत त्यांहीं देवतांशास्त्रांतील त्यांचे चरित्रास विलक्षण वैचित्र्य प्राप्त झालें आहे.... हे रूपकांचे अर्थ ध्यानांत ठेविले म्हणजे त्या त्या देवतांचे पुराणाचा किंवा माहात्म्याचा अर्थ बहुतेक स्पष्ट होईल.

—सां. प्र. हिंदुधर्म ( पृ. ९३-९४ ).

—४—

## गोंझालोचा विनोद

**गोंझालो** — पण या सर्वांहून हा मोठा चमत्कार आहे कीं-कोणास सांगितलें तर खरें देखील वाटणार नाहीं.—

**सिबाश्चियन** — बहुतेक खरे खरे म्हणून सांगितलेले चमत्कार जसे असावयाचे तसाच हा एक.

**गोंझालो** — अहो, पण हे आपल्या अंगावरचे कपडे, हे समुद्राच्या पाण्यांत भिजले असतांही जसेच्या तसेच झकाकत आहेत; इतकेंच नाहीं, पण समुद्राच्या पाण्यानें खराब होण्याचें राहून जसे नवे रंगवून काढिले आहेत असे दिसतात !

**आन्तोनिओ** — जर याचे एखाद्या खिशास वाचा असती तर, त्यानें यास सोदा म्हणून म्हटलें नसतें काय ?

**सिबाश्चियन** — खिशानें असें जर म्हटलें नसतें तर त्यानेंहि सत्य खिशांतच घालून ठेविलें असतें म्हणायचें.

— टेम्पेस्ट नाटक ( अंक २, प्रवेश १. )

* * *

: १ :

# नारायण बापूजी कानिटकर

कानिटकरांचे पूर्वज कोकणांत पालशेत गांवीं राहात असून, बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या अमदानींत घाटावर येऊन वांईजवळील बावधन येथे त्यांनी जी वस्ती केली, ती अद्याप त्यांच्या वंशजांनी कायम ठेवलेली दिसते. पुढे मराठ्यांचे सेनापति म्हणून प्रसिद्धीस आलेले हरिपंत फडके कानिटकरांचे जवळचे आप्त व त्यांच्याच लष्करांत काम करणारे. पानपतच्या घनघोर संग्रामापूर्वी कांहीं कानिटकर मंडळी उत्तर हिंदुस्थानांत दौलतीच्या हिशेबी कामासाठी गेली होती. नंतर वांईचे एरंडे व कानिटकर सरकारी दप्तर सांभाळून दक्षिणेंत परत आले. याच एरंड्यांच्या संग्रहांतील पानपतासंबंधी पत्रव्यवहार इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १ ला' यांत प्रसिद्ध केला.

कानिटकर घराण्यांतील भास्करपंत हे सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत आपल्या वीरश्रीने पुढे आले व त्यांनी बावधन गांवीं चांगली वसाहत केली. त्यांच्या आश्रयाने अनेक कुटुंबें तेथे राहूं लागलीं. चरित्रनायक नारायण बापूजी यांचे आजोबा (महादेव गोपाळ) बडोद्यास गंगाधरशास्त्री पटवर्धन (ज्यांचा पुढे पंढरपुरास खून झाला ते गायकवाडांचे वकील) यांचे कारभारी होते. यामुळेच नारायणरावांना बडोद्याच्या गादीविषयी आपुलकी वाटत असे व त्यांनी मल्हाररावांच्या पदच्युतीवर एक नाटकहि रचिलें.

महाराष्ट्रांतील गेल्या शतकांतील प्रख्यात स्थापत्यशिल्पज्ञ (इंजिनियर आर्किटेक्ट) रा. ब. वासुदेव बापूजी हे नारायणरावांचे वडील सावत्र बंधु. त्यांनीच सर्व कानिटकर कुटुंबांचा चांगला समाचार घेतला. त्यांचे चिरंजीव गोविंद वासुदेव व त्यांच्या सूनबाई काशीबाई महाराष्ट्राला रसिक साहित्यिक

दांपत्य म्हणून सुपरिचित आहेत. हरि नारायण आपटे यांच्याशीं या दांपत्याची असलेली मैत्री प्रसिद्धच आहे.

नारायणरावांचा जन्म १८५२ सालीं पुण्यास झाला. त्यांची मातुश्री यमुनाबाई या वांईच्या परांजपे कुटुंबांतील. कानिटकरांचें मराठी शिक्षण पुण्यास व हायस्कूलचें मुंबईस झालें. ते १८६८ सालीं मॅट्रिक उत्तीर्ण होऊन कॉलेजांत गेले. पण त्या वेळची बी. ए. पूर्वीची 'लिटल गो' परीक्षा एकदोनदा प्रयत्न करून न देतां आल्यामुळे ते वकिलीकडे वळले. पुण्यास त्यांचा वकिलीचा धंदा चांगला चालून त्यांनी समाजांत चांगलें नांवहि मिळविलें. सातारच्या छत्रपतींचेहि तेच वकील असत. त्या वेळीं चिंचवडच्या मोरया गोसाव्यांच्या संस्थानांत फार गोंधळ झाला असल्याने नारायणराव व बॅ. गाडगीळ यांनी पुढाकार घेऊन सरकारास संस्थानच्या व्यवस्थेसंबंधी एक योजना सादर केली. ही विश्वस्त (ट्रस्ट) स्वरूपाची योजना सरकारने मान्य करून कानिटकरांना एक विश्वस्त (ट्रस्टी) नेमलें. अखेरपर्यंत ते या जागेवर असून त्यांनी संस्थानच्या कारभारांत चांगली सुधारणा करून दाखविली. ती अद्याप दिसत आहे.

कानिटकर विशेषतः त्या काळांत चांगले नाटककार म्हणून चमकूं लागले होते. त्यांनीं १८८० ते १८९७ पर्यंत एकंदर तेरा नाटकें लिहिलीं तीं अशीं :—

| | | |
|---|---|---|
| १. | मल्हारराव गायकवाड यांचें नाटक (बडोदें विष प्रकरणावर) | १८७५ |
| २. | शशिकला रत्नपाल ('रोमिओ ज्युलिएट'च्या आधारें) | १८८२ |
| ३. | प्रतापराव चंद्रानना ('केनिलवर्थ' कादंबरीच्या आधारें) | १८८३ |
| ४. | तरुणीशिक्षण नाटिका (सामाजिक) | १८८६ |
| ५. | शिवाजी नाटक (ऐतिहासिक) | १८८९ |
| ६. | न्यायविजय नाटक (क्राफर्ड प्रकरणावर) | १८८९ |
| ७. | बाजीराव मस्तानी (ऐतिहासिक) | १८९२ |
| ८. | संमति कायद्याचें नाटक (सामाजिक) | १८९२ |
| ९. | भावी सुधारणा प्रदीप (सामाजिक. अप्रसिद्ध) | १८९२ |
| १०. | बाजी देशपांडे (ऐतिहासिक) | १८९४ |
| ११. | राजाराम नाटक (ऐतिहासिक. अपूर्ण) | १८९६ |
| १२. | प्रतापगडचा मोहरा (ऐतिहासिक. अपूर्ण) | १८९७ |
| १३. | सुभेदार तान्हाजी (ऐतिहासिक. अपूर्ण) | |

या नाटकांपैकी बहुतेक रंगभूमीवर आलीं होतीं. व तीं चांगलीं लोकप्रिय झालीं होतीं. या नाटकांमुळे शाहुनगरवासी मंडळी, परांजपे संगीत मंडळी व स्वदेशहितचिंतक मंडळी यांसारख्या नाटक कंपन्यांना चांगली ऊर्जितावस्था प्राप्त झाली. शाहुनगरवासींचें 'बाजी देशपांडे' इतकें गाजलें होतें कीं त्यांतील ऐतिहासिक प्रसंगाने परधर्मीयांचीं मनें दुखावलीं जाऊन त्यांनी पडदे जाळले; एवढेंच नव्हे तर एकदा गणपतराव जोशांवर हल्ला करून त्यांना जखमी केलें. तेव्हा मंडळीने हा प्रयोग करण्याचेंच बंद केलें.

बाजीराव मस्तानी नाटकहि असेंच फार लोकप्रिय झालें होतें. त्यांतील स्त्रीस्वभावांचीं चित्रें फार कुशलतेनें रंगविलीं आहेत. अगोदरच आपणा मराठ्यांना पहिला बाजीराव त्याच्या पराक्रमामुळे अत्यंत आवडता व त्यांत त्याची ही रहस्यमय प्रेमकथा! या लोकप्रिय नाटकाच्या आधारें गु. हि. पूर्वदेशी यांनी १९०९ सालीं 'संगीत प्रेमबंधन' नाटक तयार केलें व तें वाशीमकर नाटक मंडळीने रंगभूमीवर आणून अलोट पैसा मिळविला.

'मल्हारराव महाराज नाटक' हें सप्तांकी असून करुणरसप्रधान आहे. यांत बडोद्याचे रेसिडेंट कर्नल फेयर यास विषप्रयोग झाल्यापासून तों मल्हारराव गायकवाड यांस मद्रासेस हद्दपार करीपर्यंतचें संविधानक आहे. "हें नाटक लिहिण्याचा मुख्य उद्देश हा आहे कीं, एखादा राजा अशिक्षित, भोळा व हलक्या कानांचा असून त्यास रात्रंदिवस सल्लामसलत देणारे मंत्री स्वार्थी, अक्षरशत्रु व दुर्वर्तनाचे असले तर राजावर वारंवार कशीं घोर संकटें येऊन त्याचा शेवटीं काय परिणाम होतो हें दाखविण्याचा आहे." (प्रस्तावना). पुस्तकाच्या मुखपृष्ठावर नांवाखाली पुढील श्लोक आहे—

न तीव्रमति भूप जे, स्थिर न बुद्धि ज्यांची असे ।
तयास अतिनीचसा जन सदैव सेवीतसे ॥
किती फसविती! किती लुटुनि नेति संपत्ति ती!।
अहा! भरंवसा अशांवरि किती पहा ठेविती! ॥

या नाटकांत कानिटकरांच्या इतर नाटकांप्रमाणेच रचनाकौशल्य बिलकूल नाही. नुसतें संवादात्मक गद्य आहे. कमिशनपुढील चौकशींत साक्षी व कैफीयती यांनी कित्येक पानें अडविलीं आहेत.

१८७५ सालीं बडोद्याच्या महाराजावरील हा खटला फार गाजला होता. पुण्याच्या 'सार्वजनिक काकां'नी पैशाची मदत महाराजांच्या वतीनें खटला लढविण्यासाठी केली होती. या प्रकरणावर बरींच काव्यनाटकें रचिलीं गेलीं. कानिटकरांचें वरील नाटक याच वेळीं प्रसिद्ध झालें.

साठसत्तर वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षण व स्त्रियांची उन्नति या प्रश्नांवर सनातनी व सुधारक यांमध्ये फार तीव्र मतभेद होता. या दोन टोकांच्या पक्षांमध्ये कानिटकरांसारखे सुवर्णमध्याचें प्रतिपादन करणारे कांही विचारी लोक होते. त्यांना पाश्चात्यांचें अंधानुकरण बिलकूल मान्य नसे व ते तशी टीका करीत. 'तरुणीशिक्षण नाटिका' याचें दुसरें नांव 'आधुनिक तरुणी-शिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य याचें भविष्यकथन' असें जें कानिटकरांनी दिलें आहे तें मोठें सूचक आहे. हें नाटक एक Satire उपहास-गर्भ अनिष्ट सुधारणा-टीका आहे. नाटकाच्या पहिल्या आवृत्तींत मोठी प्रस्तावना लिहून लेखकाने आपली बाजू मांडली आहे. "तरुण स्त्रियांना मानसिक, अव्यवहारिक, दिखाऊ (ऑर्नमेंटल) इंग्रजी भाषेंत इंग्रजी रीतीच्या वगैरे सांप्रत सुरू असलेल्या शिक्षणपद्धतीचे व तदंगभूत स्वातंत्र्याचे भावी परिणाम वर्णिले आहेत." "स्त्रिया गृहशोभा आहेत, त्या जात्या मनोहर, सुंदर, सुकुमार आहेत. सबब त्यांचें शिक्षणहि तशाच थाटाचें पाहिजे. त्या उत्तम गृहिणी, व्यवहारांत व गृह-व्यवस्थेंत तरबेज होतील, व त्यांच्या सुंदरपणास व धर्मशीलपणास ज्या विद्येनें अधिक सौंदर्य व सद्धर्मशीलत्व येईल अशा प्रकारची विद्या त्यांना पाहिजे," ही नाटककाराची भूमिका आजहि सुविचारी समाजहितचिंतकांना पटण्या-सारखीच आहे.

या नाटिकेने व त्याचप्रमाणें त्यांच्या 'संमतिकायद्याच्या' नाटकाने लोकांत फार खळबळ उडवून दिली. "ग्रंथकर्त्यावर आधुनिक विद्वानांनीं तर कहर उसळून दिला, प्रसिद्ध 'विविध ज्ञान विस्तारां'त ग्रंथकर्त्याच्या एका जिवलग मित्रानें हवेंतसें तोंडसुख घेतलें; हर हर ! इतका जरी ग्रंथकर्त्यावर आधुनिक विद्वान् स्त्रीपुरुष सुधारकांकडून गहजब झाला तरी या गरीब बिचाऱ्या नाटिकेनें आपलें करण्याचें तें काम बरेंच केलें आहे." असें कानिटकरच 'तरुणी शिक्षण नाटिके'च्या दुसऱ्या आवृत्तींत लिहितात. कानिटकर कुटुंबांतच दोन पक्ष पडले

होते. त्यांचे पुतण्ये गोविंद वासुदेव हे पक्के सुधारक व हरिभाऊ आपटे यांचे स्नेही. तेव्हां साहजिकच घरांत सुधारणाप्रश्नावर कडाक्याचे वाद चालत. सुधारक मंडळी नारायणरावांना 'पुष्करणी शेक्सपीयर' असें म्हणून त्यांचें विडंबन करीत. ( कानिटकरांचा वाडा जुन्या पुष्करणीच्या हौदाजवळ आहे. )

पुण्यास १८९१ सालीं संमतिवयाच्या बिलावर फार वाद माजला होता व त्यांतून कोर्टांत केस जाईपर्यंत वैर निर्माण झालें होतें. कानिटकरांनी १८९२ सालीं सनातन्यांची बाजू मांडण्यासाठी उपहासपर नाटक लिहिलें. तें वरील-प्रमाणेच सुधारकांना फार झोंबलें. 'ज्ञानप्रकाशां'त त्यांच्यावर टीका, तर "केसरी'त त्यांचा पाठपुरावा, असें गमतीचें दृश्य दिसे.

'न्यायविजय' हें पंचांकी नाटक त्या काळांत गाजलेल्या सिव्हिल सर्व्हंट क्राफर्ड याच्या लांचलुचपतीच्या खटल्यावर आधारलेलें आहे. हें क्राफर्डप्रकरण त्या वेळीं फार गाजलें होतें. 'अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते' म्हणजे अतीव पापपुण्यांचा झाडा या जन्मींच मिळतो, हें तात्पर्य ग्रंथनामाखालीच दिलें आहे.

'भावी सुधारणाप्रदीप' किंवा शीघ्र सुधारणा नाटक हें एका दिवसांतच लिहून स्वदेशहितचिंतक नाटक कंपनीला दिलें; पण तेंहि सुधारकांवरील खवचट टीकेमुळे फार लोकप्रिय झालें.

नारायणराव कवीहि होते. त्यांनी आपल्या नाटकांतून मधूनमधून कविता घातल्या आहेत. रघुवंशाच्या ८ व्या सर्गावरील 'अजविलाप' हें काव्य १८७२ सालीं गोविंद वासुदेव या आपल्या पुतण्याच्या साहाय्याने रचून त्यांनीं प्रसिद्ध केलें. दिवाणी कामकाज चालविण्याच्या कायद्यावरहि त्यांचें एक पुस्तक आहे.

ते अस्सल राष्ट्रीय वृत्तीचे असून लो. टिळकांच्या सार्वजनिक कार्यांत त्यांना मदत करीत. रायगडस्मारकाच्या वेळीं ते त्यांच्याबरोबर महाराष्ट्रांतील मुख्य किल्ले पाहून आले होते. ता. २५ जुलै १८९७ रोजीं ते वारले तेव्हा त्यांचे चिरंजीव ( आज महाराष्ट्रांत तत्त्वनिष्ठ व त्यागी म्हणून प्रसिद्ध असलेले सेवानंद बाळूकाका ) ११ वर्षांचे होते. त्यांचा प्रतिपाळ त्यांचे चुलते रा. ब. वा. बा. कानिटकर यांनी चांगल्या रीतीने केला.

आज नारायण बापूजी कानिटकर यांचें नांव मराठी साहित्यिकांना फारसें माहीत नसलें तरी जुने पद्धीचे सामाजिक नाटककार म्हणून त्यांना मानाचा मुजरा देणें अवश्य आहे.

## नाटकांतील उतारे

— १ —

### मस्तानीची पहिली भेट

मस्तानी :–( नम्रपणानें काशीबाईच्या पायां पडते व एकीकडे उभी राहून ) ही आपली दासी पायां पडते आहे. हिच्यावर मेहेरनजर असावी.

राधा :–या अशा बसा. दूर काय म्हणून ?

काशी :–अशा जवळ या. ह्या राधाबाई–भाऊसाहेब पुरंदऱ्यांच्या.

मस्तानी :–हो का ? भाऊसाहेब फार चांगले आहेत.

राधा :–बसा हो. आणखी ती पलीकडें कोंपऱ्यांत उभी आहे ती ह्या आत्मारामाची बायको.

मस्तानी :–( आत्मारामाकडे पाहून ) तुमच्या पट्टराणी वाटतं ?

आत्माराम :–( हात जोडून ) जी सरकार.

राधा :–( मनांत ) हा मेल्या ! कुणाला जी सरकार म्हणतोस ?

मस्तानी :–माझा मान या चरणांजवळ उभी राहून सेवाचाकरी करण्याचा आहे. या पायांची हो बटीक आहे. पदरांत घेतल्याप्रमाणें सेवाचाकरी जन्मभर घ्यावी, हेंच ह्या दासीचं हात जोडून पायां पडून मागणं आहे.

काशी :–बाई, तुमचं हें गोड बोलणं ऐकून मनाला फार संतोष वाटतो.

राधा :–आतां किती वेळ उभ्या राहाल ! बसा गडे.

मस्तानी :–( एका बाजूस बसून. मनांत ) मी धन्य धन्य आहें !

काशी :–प्रकृति बरी आहे ना ?

मस्तानी :–या पायांच्या कृपेनें बरी आहे. हा सुस्वभाव पाहून मला मोठी धन्यता वाटते.

राधा :–कुणकिडून येणं झालं ? आपल्या घरचीं माणसं कोण कोण आहेत ?

मस्तानी:-आम्ही हिंदुस्तानाकडून आलों, मी तिकडचीच राहणारीण आहें. माझ्या बाबांचं नांव छत्रसाल राजेसाहेब.

काशी:-हो का? ते बुंदेलखडांतले राजेसाहेब ना? ते जातीचे रजपूत आहेत.

मस्तानी:-जी, ते सरकारचे मोठे दोस्त आहेत, सरकारांनीं मला पदरांत घेतलीच आहे; त्याचप्रमाणें मजवर राणीसाहेबांची कृपादृष्टि असावी, हेंच माझं पदर पसरून मागणं आहे. मी सेवेंत अंतर करणार नाहीं.

काशी:-बाई, तुमचा आणि आमचा सहवास घडून यावा असं देवाजीच्याच मनांत आहे, तेव्हां उभयतां सुखासमाधानानं राहूं. अहो, तुम्ही पूर्वजन्मीं आमच्याच होता, म्हणूनच आमच्या घरीं चालत आलांत ना? तेव्हां आतां सुखानं असा. तुमच्या जिवाला तिळमात्र दुःख होईल अशा प्रकारचं वर्तन आमच्या हातून घडणार नाहीं बरं. तुम्ही कांहीं एक काळजी करूं नका.

राधा:-बाईसाहेबांचं म्हणणं खरंच आहे.

मस्तानी:-बाईसाहेब, उभयतांचेही हे असे उमदे स्वभाव आहेत हें पाहून मला मोठ्ठी धन्यता वाटते. आपण माझे धनी, आणि मी आपल्या उभयतांची बटीक, या नात्यानं मी आपला काळ आपल्याजवळ घालवायचा निर्धार केला आहे. माझा प्राण गेला तरी मी आपल्या आज्ञेबाहेर वागणार नाहीं.

राधा:-उभयतांनीं अशा सुखासमाधानानं राहण्यांतच मौज आहे. आमच्या बाईसाहेबांच्या स्वभावाला मोल नाहीं. फार उत्तम स्वभाव. सहवासानं कळणार आहे.

मस्तानी:-अहो, किती झालें तरी आम्ही उचललेल्याच आलेलों. सगळ्या राज्याच्या संपत्तीच्या धनीन बाईसाहेबच आहेत. आम्ही म्हणजे या पायाच्या बटकी.

राधा:-( मनांत ) यांत काय संशय? ( उघड ) तुमचं म्हणणं अगदीं खरं आहे.

काशी :-असं हो काय गडे तुम्ही बोलतां कोण जाणे. एव्हांपासूनच असा तुटकपणा आपण उभयतांनींही मनांत कशाकरितां बाळगावा? परस्परांनीं परस्परांचा मान राखावा, आणखी सुखासमाधानानें राहावं यांतच मौज. आतां माझी संध्याकाळच्या पूजेची वेळ झाली आहे. रोज दुपारीं घटकाभर बसायला आलं पाहिजे. मनांत परका भाव अगदीं ठेवूं नका बरं. आत्माराम, बाईची नीट तरतूद लागली आहेना? त्यांच्या बरदास्तींत कांहीं कमी पडलं तर सांगतें आहें— माझ्या कामास पडायचं नाहीं.

( बाजीराव-मस्तानी नाटक )

— २ —

## मल्हाररावाचा बडोद्यास रामराम

( मल्हारराव मद्रासेस जाण्यासाठीं गाडींतून निघतात त्यावेळचा—नाटकाचा अखेरचा प्रसंग )

लोक :-( सरकारास लवून मुजरे करितात; व डोळ्यांतून पाणी काढितात. )

आबाशास्त्री :-गेलें हो गेलें, बडोद्याचें जीवित्व गेलें! आतां दुसरें कसेंही झालें तरी पूर्वीचे दिवस खचित येणार नाहींत. आज एक आमच्यासारख्यांचा अन्नदाता नाहींसा झाला.

श्रीधरभट :-सरकार निघालेच ना. शेवटीं बडोद्यांतील धर्मराजा बडोदें सोडून चालला ना! शिव शिव! प्रभु म्हणजे केवळ धर्ममूर्ति होती. कोणीही जावो, त्याची आपली संभावना उत्तम प्रकारची व्हावयाचीच. अहो, काय बडोद्याचें नांव ऐकून काशीरामेश्वरापासून भिक्षुक धांवत येत होते. पुष्कळ राजे पाहिले; पण ब्राह्मणांचा समाचार घेणारा असा प्रभु पाहिला नव्हता!

दीपचंद :-गेली पहा, ती गाडी गेली, दूरवर गेली, आतां तर दिसेनाशी झाली. देवा! कठीण दिवस आले आतां! महाराज तर गेले. काय बरें ह्यांचे कारकीर्दींत आबादानी असे! इतके दिवस सुखानें काढले.

जनकोजी:-सरकार महाराज! गेलतना शेवटीं आमास्नी सोडून! राजा पण राजा होता, भारीच भोळा स्वभाव. बामणांच्या पायगुणांनीं हा प्रसंग आला. तरी आम्ही मराठे गडी सांगत होतों. पण महाराजांस आमचें म्हणणें गोड नाहीं लागलें. आणि आज आमास्नीहि टाकून गेले. ( रडतो ).

कृष्णाजीपंत:-चला, आतां काय, येथें जरी सहस्र वर्षे उभे राहिलों तरी गाडी पुनः परत येणार आहे काय, व पुनः महाराज भेटणार आहेत काय? नव्हतें ह्या राजाच्या प्रारब्धीं सुखानें राज्य करण्याचें! आतां पुढें कसेंहि होवो, पण ही घडी पुनः बसणें नाहीं. ह्या देशीं कायतें मोठें असें हिंदूंचें राज्य हेंच, त्याचाहि हा प्रकार! प्रारब्ध!! चला आतां!!! ( सर्व दुःखानें जातात )

( मल्हारराावमहाराज नाटक, अंक ७ वा, प्रवेश ५ वा )

— ३ —

## जुन्या काळचें स्त्रीस्वातंत्र्य

रंगू:-तुमच्या लेक्चरांचा कंटाळा आला बाई! एका शब्दावर किती तरी तुमचं बोलणं निघतं! पण काय हो चिमाबाई, पूर्वी बायका खऱ्याच काहो इतक्या स्वतंत्र होत्या?

चिमणी:-रंगूबाई, तुम्ही विचारतां मात्र, पण त्याचं उत्तर मी देऊं लागलें म्हणजे म्हणतां लेक्चर देतें. बायका स्वतंत्र होत्या यांत काय संशय? हे चावटपणे पुढें निघाले! हंः! बायकोनं नवऱ्याशीं दुसऱ्या-देखत बोलूं नये, नवऱ्याच्या शेजारीं जेवायला बसूं नये, एका सांदीं-कोपऱ्यांत सदा उभं असावं, काबाडकष्ट करावे; आणखी नवरोजींचा मात्र सदा टिकोजीपणा! अशी बायकांची स्थिति असून, पुन्हां पुरुषांचं आपलं त्यांच्याविषयीं, त्या साहसी, कपटी, मायावी, बेभरंवशाच्या, आणखी धर्माचा नाश करायला देवानं उत्पन्न केल्या आहेत असं म्हणणं आहेच! अहो, पूर्वी स्त्रियांना केवढा मान होता म्हणतां? प्रत्यक्ष रामचंद्राचीच गोष्ट घ्याना. त्यानं आपल्या सगळ्या भावांदेखत, हनु-मानादेखत, फार तर काय? प्रत्यक्ष गुरु वाल्मिकादेखत कीं हो आपल्या लाडक्या सीताबाईला आपल्या मांडीवर घेऊन तिच्या गळ्यांत हात

घालावा ! ह्या मुसलमान लोकांची जनानासिस्टम आली त्यामुळें आपला हा सर्वस्वी नाश झाला आहे..

ठकू:-भिंतीवर काढलेल्या रामचंद्राच्या चित्राची ही गोष्ट. ग्रंथांतरीं रामचंद्र सर्वोदेखत सीतेच्या गळ्यांत हात घालून बसत होते असं कुठें असेल तर निराळी गोष्ट. मला वाटतं असं कांहीं कुठें आढळणार नाहीं.

रंगू:-ही ठकू कांहीं तरी बोलते झालं. मोठी आली आहे पुरुषांची तरफदारी करायला ! चिमणे, म्हण तो श्लोक, ऐकूं दे तर खरा.

चिमणी:-कोणता बरं तो श्लोक? आठवितें अं, (डोक्याला हात लाविते) हं आठवला- यस्यां यक्षाः- (मेघदूतांतला श्लोक) आहाहा ! काय मौज आहे ?

रंगू:-बाई, तुला त्याचा अर्थ समजतो म्हणून तुला मौज. आम्हांला दगडाबाईंना काय त्याचं !

चिमणी:-कालिदासाच्या मेघदूत काव्यांत यक्षानें मेघाला आपल्या अलकानगरीची खूण पटण्याकरितां पुष्कळ खाणाखुणा सांगून वर्णन केलं आहे. त्यांतलाच हा श्लोक आहे. यक्ष म्हणतो, "मेघा, ज्या नगरीमध्यें यक्ष हे रूपयौवनसंपन्न स्त्रियांसहवर्तमान स्फटिकाच्या आणि म्हणूनच नक्षत्राच्या प्रतिबिंबरूप फुलांनीं बांधल्यासारखे वाटणाऱ्या वाड्यांत येऊन, तुझ्या गंभीर शब्दासारखा ज्यांचा शब्द आहे अशा पुष्कराचं म्हणजे जलतरंगाचं मंद वाजविणं होत असतां कल्पवृक्षापासून उत्पन्न झालेलं, आणखी विषयोपभोग हेंच ज्याचं मुख्य फळ असें मद्य पितात !" असा या श्लोकाचा अर्थ आहे. रंगूबाई, अशा प्रकारची प्राचीन काळीं गंमत असे बरं.

रंगू:-अग बाई ! जलतरंगाचं वाजविणं म्हणजे ? स्त्री-पुरुष एके ठिकाणीं असतां गाणंबजावणं होत असे ?

चिमणी:-अहो रंगूबाई, गाणंबजावणंचसं काय ? कालिदासाच्या तोंडच्या श्लोकांतून काढावं तेवढं थोडं !

रंगू:-आहाहा ! धन्य ते पुरुष आणखी धन्य त्या स्त्रिया ! नाहीं तर आम्ही पहा ! काय आमचं सौख्य !

(तरुणीशिक्षण, अं. २ प्र. ३)

* * *

: १० :

# महादेव बल्लाळ नामजोशी

येथें ज्यांचा अल्प परिचय करून देत आहे ते साहित्यसेवक म्हणून विशेषसे माहीत नसले तरी महाराष्ट्रांत साहित्य आणि शिक्षण यांच्या जोडीला व्यापार आणि उद्योगधंदे यांची वाढ व्हावी म्हणून अतिशय कष्ट घेतलेले व त्यासाठी आमरण दारिद्र्य पत्करलेले असे थोर लोकसेवक आहेत. या दिशेने त्यांची साहित्यसेवा अजमावावयाची आहे.

"सन १८८० सालीं ज्या पांचसात मंडळींनीं लोकसेवा करण्याचें काम पत्करलें त्यांच्यांत नामजोशी नसते तर त्यांचीं कामें इतक्या लवकर खचित भरभराटीस आलीं नसतीं. स्वतःच्या उद्योगानें, हिमतीनें आणि हुषारीनें अगदीं गरीब मनुष्यही किती लोकोपयोगी होऊं शकतो याचें माधवराव नामजोशी यांचें चरित्र हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांचा कित्ता जर लोक घेतील तर पुणें शहराची व महाराष्ट्राची सुधारणा होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं." हे कळकळीचे उद्गार लो. टिळक यांनी आपला उजवा हातच असा सहकारी ता. १३ जानेवारी १८९६ रोजीं अकालीं मृत्युमुखीं पडला असतांना त्यांच्या मृत्युलेखांत काढलेले आढळतात. चिपळूणकर, आपटे, आगरकर, धारप, केळकर व आतां नामजोशी हे सर्व पंधरासोळा वर्षांत आणि चाळीसपन्नाशीच्या आंत काळाच्या मुखीं पडल्याचें पाहून लोकमान्यांना फार लागून राहिलें होतें. त्यांची शाळा आणि कॉलेज, तसेंच केसरी आणि मराठा हीं जबाबदारीचीं आणि अतिशय खर्चाचीं कामें काढण्यांत आणि चालविण्यांत नामजोशांची सर्वस्वी मदत असे. किंबहुना त्यांना सार्वजनिक अशा बाहेरच्या जीवनांत ठाम उभें राहण्याच्या कामीं कोणीं आरंभीं टेका दिला असेल तर तो नामजोशांनी. वृत्तपत्रीय जीवनाचें बाळकडू तरी त्यांनी पाजलें असें म्हणावयास हरकत नाही. कारण केसरी-मराठा पत्रांपूर्वी नामजोशांनी चालविलेलीं किरण,

डेक्कन स्टार हीं ही पत्रें होतींच. तेव्हा या उपेक्षित साहित्य-समाजसेवकाला श्रद्धांजलि वाहण्याचें पुण्य घेणें अप्रस्तुत नाही.

माधवराव ( वास्तविक महादेवराव पाहिजे, पण संबोधण्यांत पहिलें तोंडांत बसतें. ) यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांतील बीरवाडी येथे १८५३ सालीं झाला. पुढे त्यांचे वडील पुण्यास येऊन राहिले व वकिलीच्या परीक्षेस बसले. पण ती उत्तीर्ण न झाल्याने हिराबागेचे मालक मोदीशेट यांच्याकडे नाममात्र पगारावर राहिले. दैवयोग असा की, याच हिराबागेचें चालकत्व पुढे माधवरावाकडे आलें. पुण्यांतील सुप्रसिद्ध अण्णासाहेब पटवर्धन यांच्या कुटुंबाची नामजोशी कुटुंबाला मदत नसती तर कोण हाल झाले असते ! सातव्या वर्षी वडील वारल्यावर थोरल्या भावाने माधवरावांचा चांगला सांभाळ, स्वतःच्या गरीब स्थितींतहि केला हें विशेष. माधवराव मॅट्रिक जे झाले त्याची एक गोष्ट दंतकथा वाटण्यासारखीच पण सत्यकथा आहे. पहिल्या वर्षी निकालांत नांव नाही म्हणून परगांवीं शिक्षकाची नोकरी पत्करून पुन्हा परीक्षेस बसण्याची तयारी केली; पण पुन्हाहि अपयश ! तेव्हा नाद सोडला. एकदा एका वाण्याच्या दुकानांत रद्दीच्या गळाठ्यांत त्यांना स्वतःचा गणिताचा पेपर अर्धवट तपासलेला आढळला. त्यांनी ती रद्दी विकत घेऊन त्या वेळचे मुंबई विद्यापीठाचे एक प्राध्यापक प्रसिद्ध केरूनाना छत्रे यांजकडे गेले व त्यांना आपला पेपर व इतर कागद दाखविले. नानांची या विद्यापीठाच्या अन्यायाबद्दल खात्री पटून त्यांनी तिकडे पत्रव्यवहार केला व याचा सुपरिणाम म्हणजे १८७५ सालच्या एका सरकारी गॅझेटांत महादेव बल्लाळ नामजोशी हा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याचें छापून आलें. याला म्हणतात दैवी चमत्कार ! पण नामजोशी यांना पुढचें शिक्षण चालविणें शक्य नसल्याने ते शिकवण्या करून आपला योगक्षेम चालवूं लागले. ते फार नाणावलेले शिक्षक होते. मोठमोठ्यांच्या शिकवण्या त्यांच्याकडे चालून येत. पण नुसतें पोट भरणें हें आयुष्याचें इतिकर्तव्य असें नामजोशी मानीत नव्हते. ते ज्या वाड्यांत राहत होते त्या वाड्याचे मालक महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लोकाग्रणी न्या. मू. माधवराव रानडे हे होते. त्यांच्या घरीं राजकारणी आणि समाजसेवक यांचा अड्डाच पडलेला असल्यास नवल नाही. या पडोशी मुत्सद्याकडून, एका माधवरावाकडून दुसऱ्या माधवरावाने देशसेवेचा वसा घेतला व तो पुढील काळांत इतका आचरणांत आणला कीं, Either

Madhavrao Ranade or Madhavrao Namjoshi must rule Poona ( माधवराव रानडे किंवा माधवराव नामजोशी यांपैकी एकाने पुण्यावर सत्ता गाजवावी ) असें म्हणण्याचा लोकांत परिपाठ पडून गेला होता.

नामजोशांना लहानपणापासून चांगलें लिहिण्याची संवय लागली होती. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यांनी संपादक होण्याचें ठरविलें. पुण्यांत त्या वेळीं ' ज्ञानप्रकाश ' आणि ' ज्ञानचक्षु ' हीं दोन वर्तमानपत्रें निघत, मुंबईस ' इंदुप्रकाश ' चें तेज पडे. तथापि महाराष्ट्राला उद्योगप्रियता व विचारस्वातंत्र्य यांचे धडे देणारें पत्र नव्हतें. विष्णुशास्त्र्यांची ' निबंधमाला ' तोकडी पडे. तिच्या जोडीला एक इंग्रजी–मराठी वृत्तपत्रच पाहिजे, अशा सार्वजनिक बुद्धीने नामजोशांनी जवळ पैसे नसतांना कर्जवाम करून नवें ' किरण ' पत्र सुरू केलें.

' किरणा ' चा पहिला अंक २६ मे १८७७ रोजीं बाहेर पडला. A Weekly Journal of Social and General News, Literature, Politics, Commerce, Science and Art असें सूर्यकिरणांच्या चित्राच्या ठशाखाली साप्ताहिकाचें विषयकथन होतें. पत्राची जुळवाजुळव – संपादन आणि मुद्रण यांची व्यवस्था स्वतः संपादकालाच करावी लागे. इतकेंच नव्हे तर अंक वाटण्याचें कामहि तेच करीत. तन–मन–धनाचे अपार कष्ट सहन करूनहि त्यांचा निर्भीड बाणा खालावला नाही. पण सरकारने पुढल्या सालीं देशी भाषांतील वृत्तपत्रांचें मुद्रणस्वातंत्र्य कायदा करून हिरावून घेतलें तेव्हा मात्र या संपादकापेक्षा त्याच्या सावकाराला चिंता वाटूं लागली. त्यांनी हळूहळू छापखान्यांतील माल आपल्या ताब्यांत घेण्यास सुरुवात केली. यामुळे नामजोशी यांना ' किरण ' पत्र व छापखाना विकणें भाग पडलें. याच वेळीं कांही आर्थिक अडचणींत सांपडून एक खोटा व्यवहार त्यांनी जो केला तो अंगाशीं आला. पण न्या. मू. रानडे यांनी नामजोशांची किंमत ओळखून त्यांना पैशांची मदत देऊन त्यांतून सोडविलें. रानडे हे फार थोर मनाचे व सहकाऱ्यांचे आणि विषेशतः सार्वजनिक कार्यांत अव्यवहारीपणाने पडणारांचे गुणदोष, अडीअडचणी चांगले ओळखत व निरपेक्ष साहाय्य देत. त्यांच्यामुळेच तर नामजोशांचें करपूं लागलेलें कर्तृत्व पुन्हा टवटवूं लागलें.

या ' किरण ' पत्राच्या ७ व्या अंकांत पुण्यांतील ' ज्ञानप्रकाशा 'वर ' दादांचा उपदेश व तत्संबंधी आमचे विचार ' असा अग्रलेख आहे. त्यांत शेवटीं

“ आमचा जन्म जरी नूतन आहे तरी लोकांची हांजीहांजी करून किंवा मर्जी संपादन करून वर्गणीदार मिळविण्याचा आमचा इरादा नाहीं, व खरें वर्तमानपत्र जें आहे त्यांस अशी जरूरही लागेल असें आम्हांस वाटत नाहीं. आम्हांकडून जेवढा लोकांस उपयोग होईल तेवढ्यापुरतीच आम्ही आमचे आश्रयदात्यांपासून अपेक्षा करितों. दादास नूतन स्थिति प्राप्त झाली त्या वेळचे अनुभवावरून ते आम्हांस सांगत असले तर आम्हीं त्यांस एवढेंच सुचवितों कीं, ते दिवस व हल्लींचे दिवस अगदीं निराळे आहेत. हल्लीं लोकांस पूर्वीपेक्षां वर्तमानपत्राची अभिरुचि विशेष लागली आहे, त्या अर्थीं आतां हांजीहांजी करण्याची मुळींच जरूर राहिली नाहीं एवढें म्हणून आम्ही हा लेख पुरा करितों. ” हा जो परिच्छेद आहे तो भावी ‘ केसरी ’च्या भाषेची आठवण करून देतो.

तुर्कस्थान आणि रशिया यांमधील त्या वेळच्या लढाईवर विवेचक लेख आहेत. सरकार इकडील संस्थानिकांचा रशियाशीं संबंध असल्याचा संशय घेत होतें तो खोडून काढला आहे. ‘ रिडाऊट ’ सारखे लष्करी डावपेचाचे लेख सांपडतात. ‘ आम्हांस इंग्रज सरकारचें राज्य किंवा राज्यपद्धति नको काय? ’ या अग्रलेखांत सरकारचा राज्य चालविण्याचा क्रम कां आवडत नाही याची शहानिशा केली आहे.

आपल्या किरण छापखान्यांत शंकराचार्यांच्या ‘ विवेक चूडामणी ’ वर एकनाथांनी केलेली प्राकृत टीका छापण्याचा उपक्रम केलेला ‘ किरण ’ पत्रांतील एका जाहितीवरून दिसतो. या पुस्तकाची ४००० ‘ ग्रंथसंख्या ’ होईल व किंमत आगाऊ १। रु. राहील, अशी सूचना दिलेली होती. पण हा ग्रंथ बाहेर पडला नसावा.

‘ पुणें हेरल्ड ’ हें अति स्वस्त ‘ इंग्रजी व मराठी भाषेंत टाइपावर प्रति बुधवारीं प्रातःकाळीं–’ ता. ६ मार्च १८७८ पासून काढण्यासंबंधी जाहिरात ‘ किरण ’च्या १८ व्या अंकांत आहे. वार्षिक वर्गणी १ रुपाया ठेविली होती. पण हें पत्र निघालेलें दिसत नाही.

चांगल्या ‘ रोजनिशी ’ चा उपक्रम नामजोशी यांनीच केला. १८७८ च्या रोजनिशींत किती तरी उपयुक्त माहिती भरली आहे. याचेच पुढे कित्येकांनी

अनुकरण करून फायदा मिळविला. ‘ किरण ’ पत्रांतील बाहेरगांवचीं पत्रें मोठीं चटकदार असत. ‘ तारायंत्र द्वारें आलेल्या बातम्यां ’त परदेशांतील निवडक बातम्या येत. ‘ वर्तमानसार ’ व ‘ पुणें Local ’ यांतील लहान बातम्या आजहि मोठ्या बोधप्रद व मनोरंजक वाटतील. इंग्रजी मजकूर देखील ‘ अमृत-बझारपत्रिका ’ हिच्या तोडीचा सडेतोड व प्रौढ भाषेंत असे. यावरून नामजोशानी भावी ‘ केसरी ’, ‘ मराठा ’ पत्रांना कशी पार्श्वभूमि तयार करून ठेवली होती याची कल्पना येते.

सरकारने देशी भाषांतील वृत्तपत्रांवर गदा आणली त्याला ‘ किरण ’ बळी पडलें तरी तेवढ्याने नाउमेद न होतां नामजोशांनी १८७९ सालीं ‘ Deccan Star ’ या नांवाने एक इंग्रजी दैनिक सुरू केलें; तें १८८१ सालपर्यंत चालवून, नंतर न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी केसरी-मराठा हीं दोन मराठी-इंग्रजी पत्रें काढण्याचें ठरविल्यावर, ‘ मराठा ’ या इंग्रजी पत्रांत ‘ डेक्कन स्टार ’ विलीन केलें. अशा रीतीनें या जातिवंत संपादकाने आपलें व्यक्तित्व समष्टींत जिवंत राखलें. ते ‘ केसरी ’ आणि ‘ मराठा ’ पत्रांतून स्थानिक स्वराज्य, व्यापार-उद्योगधंदे, आर्थिक विषय यांवर चांगलें लिहीत. त्यांचें इंग्रजी भाषे-वरचें प्रभुत्व इंग्रजीच्या चांगल्या प्राध्यापकाहून कमी नसे. साधा मॅट्रिक झालेला माणूस पण त्याने इंग्रजी वृत्तपत्र चालविलें होतें, हें आजच्या तुटपुंज्या इंग्रजी किंवा इतर विद्येवर कसेबसे जगणाऱ्या पदवीधराला लाजवील यांत शंका नाही. नामजोशांचा इंग्रजी पत्रव्यवहार, सरकारदरबारीं केलेला पाहिला म्हणजे या पुरुषाचें कौतुक वाटतें. धडाडी व हरहुन्नरीपणा, जो संस्थाचालकांत लागतो तो त्यांच्याजवळ भरपूर असल्याने न्या. मू. रानडे यांच्या शिफारशी-वरूनच न्यू इंग्लिश स्कूल काढतांना विष्णुशास्त्री व टिळक यांनी त्यांना प्रथमच आपल्यांत घेतलें.

ते नाणावलेले शिक्षक होतेच. शाळेंत ते इतिहास, भूगोल, इंग्रजी हे विषय शिकवीत. पण त्यांचा उपयोग बाहेरच्याच कामाला फार होई. त्यांनीच शाळा आणि पुढे निघालेलें फर्ग्यूसन कॉलेज यांच्या व्यवस्थित मांडणीला सर्वस्वीं मदत केली. १८८४ सालीं ‘ डेक्कन एज्युकेशन सोसायटी ’ स्थापन झाली तींत पहिल्या सात आजीव सेवकांत ते एक होते. पदवीधर नसल्याने कॉलेजांत तें

शिकवीत नसत. पण सोसायटीचे ' फारिन मिनिस्टर ' असें त्यांना जें म्हणण्यांत येई, त्यांत विशेष अर्थ होता. मुंबई सरकारांत त्यांचें वजन असे व विशेषतः गव्हर्नर त्यांना फार चाहत. यामुळे डे. ए. सोसायटीची तिच्या बाल्यावस्थेंत जी व्यवस्थित घडी बसली तिला बहुंशीं कारण नामजोशी होत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. त्यांनी संस्थेसाठी पन्नास हजारांवर पैसे सरकार आणि संस्थानिक, व्यापारी आणि धनिक यांच्याकडून गोळा करून दिलेले आहेत. १८८९ सालीं टिळकांनी सोसायटीचा राजीनामा दिल्यावर नामजोशांचें लक्ष लागेना. इतर सहकाऱ्यांशीं त्यांचें पटेना; पण त्यांनीं १८९४ सालपर्यंत राजीनामा दिला नाही. संस्थेच्या संस्थापकांविषयीं पुढील सभासदांना विशेष कांही वाटत नाही हा अनुभव नवा नाही.

यापूर्वीच १८८७ सालीं, महाराष्ट्राच्या औद्योगिक शिक्षणाचा एक भाग म्हणून त्यांनी ' शिल्पकला विज्ञान ' नांवाचें एक भारदस्त मासिक सुरू केलें होतें. याची वार्षिक वर्गणी टपालहशिलासुद्धा पांच रुपये ठेवली होती; पण जास्त प्रसार व्हावा म्हणून १८९४ सालीं वर्गणी निम्मी केली. या मासिकांतील शास्त्रीय औद्योगिक विषयांवरचे विविध लेख तज्ज्ञांकडून लिहून घेतले असल्याने आजहि, मराठी माध्यमाच्या काळांत, ते वाचनीय वाटतील. ' इंडस्ट्रियल रिव्ह्यू ' हें इंग्रजी मासिकहि त्यांनी वरील मासिकाबरोबर चालविलें होतें. औद्योगिक उत्कर्षाच्या बाबतींत आजचा महाराष्ट्र नामजोशांच्या काळाहून फारसा पुढे गेला नाही, ही गोष्ट मोठ्या खेदाने मान्य करावी लागते. ही टोचणी लावणारा त्यांच्यासारखा पुढे झाला नाही ही गोष्ट तितकीच खरी आहे. आजचें ' उद्यम ' हें मासिक नामजोशांच्या ' शिल्पकलाविज्ञाना 'च्या कुळींतलें असलें तरी ही कुळी मोठीशी प्रतिष्ठा किंवा विस्तार पावली नाही. असो.

शाळांतून शास्त्रीय व औद्योगिक शिक्षण देण्यांत यावें म्हणून त्यांनी खटपट करून आपल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें तसें शिक्षण सुरूहि केलें. पुण्यास म्युनिसिपालिटीला एक तांत्रिक (टेक्निकल) शिक्षणाची स्वतंत्र शाळा काढण्यास त्यांनी भाग पाडलें. ही शाळा ' व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल ' या नांवाने आजहि अस्तित्वांत आहे. १८८० सालीं त्यांनी पुण्यास एक औद्योगिक प्रदर्शन भरविलें. पण तें लहान म्हणून आठ वर्षांनी पुन्हा एक प्रदर्शन हिरा-

बागेंत भरविलें व त्याच्या जोडीला औद्योगिक परिषदहि घेतली. हीं प्रदर्शनें व परिषदा पुढे कित्येक वर्षें निरनिराळ्या ठिकाणीं भरत असत. पुण्याच्या प्रदर्शनांतील वस्तूंतूनच 'रे इंडस्ट्रियल म्युझियम्' ही कायम संस्था निघून आज ती चांगली प्रगतिपथावर आहे. या म्युझियमासाठी जागा घेण्याबद्दल त्यांनी सरकारशीं मोठा पत्रव्यवहार केलेला होता. तो अद्यापहि उपलब्ध आहे.

पुणें स्टेशनाजवळची रेशमाची गिरणी व डेक्कन पेपर मिल हा कागदाचा कारखाना हीं त्यांच्या प्रयत्नामुळेच अस्तित्वांत आलीं. त्यांनी स्वतः 'दि पूना मेटूल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड' शनवार पेठेंत काढून भांडीं, टाचण्या, सुया, खिळे वगैरे वस्तू तयार करण्याचा उद्योग १८९२ सालीं आरंभला; पण पुरेसें भांडवल न जमल्याने ही गिरणी नामशेष झाली.

उद्योगधंद्यांवरचीं लहानलहान पुस्तकें, वाचनपाठमाला तयार करवून घेण्याच्या मागेहि ते होतेच. आपले मित्र बा. आ. गुप्ते यांच्या मागे लागून १८८९ सालीं 'देशी हुन्नर अथवा हिंदुस्थान देशांतील कारागिरीचें वर्णन' हें सव्वा दोनशे पानांचें अपूर्व पुस्तक लिहून घेतलें. मराठींत या तोडीचें दुसरें पुस्तक अद्यापि नाही. नामजोशी यांनी स्वतः एक व्यापारी भूगोल लिहिला होता, पण तो अमुद्रितच राहिला. त्यांचा आणखी एक मोठा उद्योग म्हणजे मराठी भाषेचा बृहत्कोश काढणें. यासाठीं त्यांनी प्रथम मोलस्वर्थचा मराठी-इंग्रजी कोश भाषांतरून घेतला व त्यांत इतर कोश व पुस्तकें यांतील शब्दांची भर टाकण्यास सुरुवात केली होती. या कोशाला मुंबई विद्याखात्याने पांच हजार रुपये देणगी देऊं केली होती. पण त्यांच्या अकाली मृत्यूमुळे हा कोश अपुराच राहिला व आम्हां शब्दकोशकारांना त्यांचा वेळेवर उपयोग न झाल्याने दुबार-तिबार काम करावें लागलें. आधी कळता व मिळता तर केवढे श्रम व पैसा वांचला असता !

त्यांची व्यापारी वर्गात चांगली वग व पत होती. त्यामुळे ते व्यापारी पेठांतून म्युनिसिपालिटींत सहज निवडून येत. ते सतत दहा वर्षें म्यु. सभासद होते व या काळांत त्यांनी नागरिकांची मोठी सेवा केलेली त्या वेळीं इतकी स्पष्ट होती की, ते रानडे व टिळक यांच्या बरोबरीने प्रथम श्रेणीचे पुढारी म्हणून पुण्यांत

ओळखले जात. लो. टिळकांना त्यांचा राजकारणांत व समाजकारणांतहि फार मोठा आधार होता. तो तुटल्यावेळचे त्यांचे दुःखाचे उद्गार आरंभीं दिलेच आहेत.

नामजोशांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाचा भार टिळकांनी वाहिला हें सांगणें नकोच.

## ग्रंथांतील उतारे

— १ —

### मिठावरील नवीन जकात

हल्लीं आम्हांवर करांचा बोजा तर विशेष वाढला आहेच. परंतु मिठावरील कराबद्दलच आम्हांस विशेष वाईट वाटतें. यांचीं कारणें दोन आहेत: पहिलें कारण असें कीं, मीठ ही जिन्नस सर्व अवश्य असल्यामुळें तिजवर बसलेल्या जकातीचा बोजा आम्हांवर बसल्याचें स्मरण हरवक्त होऊन इंग्रज सरकारचें हितचिंतनच करावेंसें वाटतें व दुसरें असें कीं, या जिनसेसाठीं आम्हांस इतकीं दुःखें भोगावयास लावून स्वजातबांधवांचीं पोटें × × × × ! हें आम्हांस वाईट कसें वाटणार नाहीं.

जे अग्री लोक मीठ पिकवितात त्यांस दरमणीं दोन आणे मिळतात व सरकारास त्याच मणाबद्दल पूर्वी १८१३ मिळत होते व ते हल्लीं २॥ रुपये मिळतात. ही गोष्ट किती दुःसह आहे हें सांगणें नको. एका सासूची व सुनेची गोष्ट प्रसिद्ध आहे ती अशी कीं, 'गृहप्रपंचाचे कामाबद्दल सासूसुनेचा हमेष तंटा होऊं लागला. तेव्हां आपसांत समज करून दोघींनीं प्रकरण निकालास लावण्याकरितां सर्व कामें निमेनीम वांटून घेण्याचें ठरविलें व ठरावाप्रमाणें दोधी वर्तन करूं लागल्या व कामाची वांटणी होऊं लागली. अन्न सिद्ध करण्याचें काम सुनेकडे सोपवून खाण्याचें काम सासूनें पत्करिलें. एके दिवशीं कांहीं कारणानिमित्त खारका विकत घेतल्या व निमे वांटणी केली ती वरील न्यायानेंच; म्हणजे खारकांवरील मगज सासूनें घेऊन आंतील बिया सुनेचे स्वाधीन केल्या.' तद्वतच हा इंग्रज सरकारचा न्याय आहे.

—किरण (ता. २७ जानेवारी १८७८)

— २ —

## पाश्चात्य देशांच्या बरोबरीनें कसे येऊं

ज्या परदेशास आमचे कारखानदार, व्यापारी व कारागीर विलायत असें म्हणतात तो एकच देश नसून ते अनेक देश आहेत; व त्यांतला एकहि देश आमच्या हिंदुस्थानाएवढा नाहीं. त्यांतले बरेच देश आमच्या मुंबई इलाख्याहूनही लहान आहेत आणि त्यांत एकही असा देश नाहीं कीं जो आपला सर्व पराक्रम शेतकीवर खर्च करून वस्त्रपात्राकरतां इतर देशांच्या तोंडाकडे पाहात बसला. बेल्जम, स्वित्झरलंड वगैरे देश आमच्या एखाद्या जिल्ह्याएवढेही नसून इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका यांशीं कांहीं व्यापारांत व उद्योगधंद्यांत टक्कर मारीत आहेत. आमच्या पूर्वेकडील जपानही पाश्चिमात्य ज्ञानाचा व यंत्रसाधनांचा उपयोग करून उद्योग व व्यापार यांत उत्कर्षास व स्वातंत्र्यदशेस येत आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत आणिल्या असतां उद्योगधंद्यांत ज्यांची बरोबरी करण्याची आम्ही आकांक्षा बाळगीत आहोंत ते कोणी अमानुष पुरुष आहेत असें मानण्याचें कोणत्याही प्रकारचें कारण नाहीं. आपणांस त्यांचें ज्ञान, त्यांचें शिल्प, त्यांच्या कला व त्यांचें कौशल्य हीं मिळविलीं पाहिजेत. कारण या त्यांच्या साधनांशिवाय त्यांच्या बरोबरीस येणें हें आम्हांस शक्य होणारें नाहीं. पाश्चात्य पद्धतीनें कारखाने चालण्यास या सर्व साधनांखेरीज आणखी एक साधन म्हणजे भांडवल लागतें हें खरें आहे. आजपर्यंत उद्योगधंद्यांत आपण अज्ञानी व स्तब्ध राहून दारिद्र्यांत येऊन पोहोंचलों व आतां भांडवल पुष्कळ अंशीं नाहींसें झाल्यावर आपण सावध होत आहों हेंही खरें आहे; पण याप्रमाणें सावध होऊन आपले उद्योगधंदे पुन्हां सावरण्याची अद्यापि संधि गेलेली नाहीं व जें थोडें भांडवल अद्यापि शिल्लक राहिलें आहे तेंच जर अर्थशास्त्राच्या ज्ञानाच्या विशेष प्रसारानें प्रसंगीं बेतावेतानें एकवट होत जाईल तर कोणत्याही प्रकारें निराश होण्याचें कारण नाहीं.

—शिल्पकला विज्ञान, अंक १.

* * *

: ११ :

# महादेव शिवराम गोळे

प्रि. गोळे हे १९ व्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रांत आपल्या विद्वत्तेने आणि सूक्ष्म समाजनिरीक्षणाने प्रसिद्धीस आलेले सद्‌गृहस्थ होते. आज त्यांचें नांव सुशिक्षितांनाहि जरा अपरिचित असलें तरी 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' व 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हीं त्यांचीं दोन पुस्तकें समाज-शिक्षणशास्त्रज्ञांनी मनन करण्याच्या योग्यतेचीं आहेत यांत शंका नाही. महाराष्ट्राचा साठ वर्षांपूर्वीचा इतिहास विशेषतः त्यांत पाहावयास मिळेल.

गोळे हे सातारा जिल्ह्यांतील मढें गांवचे. माधवरावांचा जन्म तेथेंच १८५८ सालीं झाला. त्यांचे वडील शिवरामपंत यांना इंदूर संस्थानांत खानगी खात्यांत नोकरी होती. ते १८६८ मध्ये वारल्यावर माधवरावांची आई त्यांना व त्यांचे लहान बंधु गोपाळराव यांना घेऊन पुण्यास माहेरीं येऊन राहिली. मढें हें गोळ्यांचें इनामी गांव. गोविंद मोरेश्वर गोळे (माधवरावांचे खापरपणजे) हे बाळाजी बाजीराव पेशव्यांचे मावसभाऊ असून त्यांची नेमणूक साताऱ्यास राणी ताराबाई यांजकडे केलेली होती. पण माधवरावांना आजोळचाच आश्रय करावा लागला. त्यांचे आजोबा (आईचे वडील) कृष्णभट्ट गोखले हे चांगले हरिभक्त असून त्यांचें पुण्यास शनिवार पेठेंत गोवर्धनेश्वराचें मंदिर होतें.

माधवरावांचा इंग्रजी पांचवीपर्यंतचा अभ्यास घरींच झाला. ते शाळेंत प्रथम सहाव्या यत्तेंत जाऊन बसले. त्या वेळीं त्यांचा विवाह होऊन पांच सहा वर्षेंहि झालीं होतीं. तथापि, माधवराव १८७७ मध्ये मॅट्रिक होऊन डेक्कन कॉलेजांत गेले. तेथे टिळक, आगरकर, आपटे यांच्याशीं मैत्री झाली हें सांगणें नकोच. १८८१ सालीं ते संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. झाले. नंतर डेक्कन कॉलेजांत फेलो होते. १८८२ सालीं ते चिपळूणकरादि मंडळींनी काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. ते कांही काळ शाळेचे सुपरिंटें-डेंटहि होते. 'शाळेचा अभिमान', 'आपल्या संस्थांचा अभिमान' यांसारखीं

विद्यार्थ्यांना दसरादि सणांच्या समारंभांत उपदेश म्हणून लिहिलेलीं त्यांचीं छोटीं पुस्तकें छापलेलीं आढळतात. हे उपदेश आजच्या विद्यार्थ्यांना तर फारच उपयुक्त आहेत. गोळे यांनी, नवीन क्रमिक पुस्तकें स्वतःच शिक्षकांनी अनुभवानुसार लिहून काढावींत असा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पायंडा पाडला. त्यांनी स्वतः 'संस्कृत कोर्स', 'अमरसार', 'इंग्रजी कवितेचें पुस्तक' हीं पुस्तकें तयार केलीं. तसेंच शाळेंत शिक्षकांनी कोणत्या पद्धतीनें शिकवावें यासंबंधी एक नवीन योजना तयार केली. विद्यार्थ्यांचें शील आणि आरोग्य तयार करण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

शाळेचें उत्कृष्ट वसतिगृह असावें म्हणून त्यांनी १८८७ सालीं जी योजना केली होती ती पुढे सात वर्षांनी अंमलांत आली. संस्थेचें कॉलेज काढण्याची जेव्हा या मंडळींनी तयारी केली तेव्हां त्यांच्यांत कोणी शास्त्र (सायन्स) विषय शिकविणारा नव्हता. तेव्हा गोळे यांनी सायन्स विषय एम्. ए. ला घेऊन ती परीक्षा दिली व कॉलेजांत १८८४ सालीं ते तो विषय शिकवूं लागले. मराठी सातव्या पुस्तकांतील सायन्स विषयांतील धडे त्यांनी सरकारच्या सांगण्यावरून लिहून दिले. 'हवा' या विषयावर त्यांनी सोपपत्तिक व सप्रयोग दिलेलीं व्याख्यानें १८९१ सालीं आर्यभूषण प्रेसमध्ये छापलीं असून, पुण्यास जेव्हा प्लेगचा भयंकर कहर झाला तेव्हा 'ब्युबॉनिक प्लेग व त्यासंबंधाने लोकांचीं कर्तव्यें' हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें.

सुधारकाग्रणी गोपाळराव आगरकर १८९५ सालीं अकाली वारले तेव्हा फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपलची जबाबदारी माधवराव गोळे यांच्यावर पडली. याच सालच्या अखेरीस त्यांचें 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' हें समाजांत खळबळ उडवून देणारें पुस्तक बाहेर पडलें. "हें पुस्तक दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाच्या आधारें लिहिलेलें नाहीं" असें लेखकाने आरंभींच सांगून टाकले आहे. यांतील अभिप्राय किंवा सिद्धांत व्यासंगानुरूप त्यांच्या वाचनांत आलेले व कित्येक वर्षांच्या अवलोकनाने अनुभवास उतरलेले असेच आहेत.

केवळ ब्राह्मणांचाच प्रश्न हाताळला म्हणून जातीय वादाचा आरोप त्यांच्यावर आज कोणी सहज करील. पण त्यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ब्राह्मणाची व्यापक व्याख्या दिली आहे :

" कदाचित् कोणी येथें असा प्रश्न करील कीं, पुस्तक वाचतांना ब्राह्मण म्हणजे कोण समजावे व अन्य जातीय कोण समजावे. या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. तथापि साधारणपणें ब्राह्मण हा शब्द सर्व पांढरपेशे लोकांचा थोडक्यांत उल्लेख व्हावा म्हणून योजिला आहे. देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे आणि सारस्वत ब्राह्मण, कायस्थ आणि पाठारे परभू व ज्या दुसऱ्या शुद्ध व्यासंगी जाती असतील, त्या सर्वांचा या शब्दांत समाहार केलेला आहे असें समजून पुस्तक वाचावें. " आधुनिक सुशिक्षितांस अप्रिय परंतु पथ्य सांगण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. " निबंधमालाकारांनीं पुष्कळ ब्राह्मण तरुणांच्या विचारांस जी पद्धत कांहीं वर्षांपूर्वीं एकदां लावून दिली तीमुळें ( ब्राह्मणांत कांहीं दोष आहेत असें परस्थ लोक खुशाल समजोत ! ) स्वतः ब्राह्मण आपणांत कांहीं दोष असतील असें मनांत आणण्यास देखील नाकबूल झाले आहेत; परंतु अशा तरुणांसच त्यांच्या चालू वर्तनामुळें पुढें जी निश्चितपणें विपत्ति येणार, तिचें चित्र हुबेहूब दाखविण्याच्या हेतूनें हा ग्रंथ लिहिला आहे. " डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा एक सदस्य या नात्याने मीं हा ग्रंथ प्रसिद्ध केलेला नाही, हें गोळे यांस आवर्जून सांगावें लागलें याचें कारण, सोसायटींतील प्रतिष्ठित व सहकारी सदस्यांशीं त्यांचीं पुष्कळशीं मतें जुळणारीं नव्हतीं.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक शक्तींचा झपाट्याने जो ऱ्हास होत आहे त्यांचीं कारणें लेखकाने आपल्या मताप्रमाणें स्पष्ट शब्दांत विवेचिलीं. त्या काळीं बरेच पदवीधर अकालीं मृत्युमुखीं पडूं लागल्याचें भयंकर दृश्य लोकांपुढे होतें. याची कारणमीमांसा न्या. मू. रानडे, डॉ. भांडारकर, लो. टिळकप्रभृति पुढाऱ्यांनी आपआपल्या कल्पनेप्रमाणें केली. कोणीं अभ्यासाचा बोजा, तर कोणीं बालविवाह, तर कोणीं राजकीय परिस्थिति यांकडे दोष दिला. गोळे यांनी प्रचलित शिक्षणपद्धति हीच या ऱ्हासाच्या मुळाशीं आहे असें सप्रमाण दाखवून दिलें. ' उपायचिंतन ' या भागांत नवीन शिक्षणक्रमाचे हेतु व दिशा दाखवून, शिक्षणाचे विषय आणि पद्धति यांविषयी सविस्तर विवेचन दिलें आहे. स्त्रियांची दुःखमय स्थिति पालटण्यासाठी ' प्रमदावनें ' तयार करण्याची त्यांची ' सुधारकी ' गणली जाणारी सूचना महत्त्वाची आहे. पुस्तकाच्या शेवटीं त्यांनी आशावंत आणि अनुभविक यांचा संवादरूपाने दृष्टिकोन दाखविला आहे. या दोघांतील भेद स्वाभाविक आहे, तो शुद्ध हट्टाचा किंवा

मूर्खपणाचा नाही ही गोष्ट ध्यानांत घेतल्यास दोन पक्षांतील भांडणें मिटतील व सुधारणेचा गाडा पुढे चालूं लागेल, असा समारोप केला आहे.

या पुस्तकाचें विचारवंतांना इतकें महत्त्व वाटलें की, लो. टिळकांनीच 'केसरी'तून सात लेखांक लिहून यावर साधकबाधक टीका केली. 'विविधज्ञान-विस्तारा'च्या आठ अंकांत परीक्षण आलेलें आहे (वर्ष २८ अंक १-८). हें पुस्तक मुंबई विद्यापीठाने बी. ए. परीक्षेस नेमलें तेव्हा याची १९३२ सालीं दुसरी आवृत्ति निघाली.

गोळे यांचें दुसरें प्रसिद्ध पुस्तक म्हणजे 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हें असून १८९८ सालीं जगत् हितेच्छू छापखान्यांत छापलें आहे. लेखकाचा मित्र विद्याधर हा महाराष्ट्राबाहेर दूर राहात असल्याने मित्रकार्य म्हणून त्याचा ग्रंथ अप्रसिद्ध राहणें बरें न वाटून लेखकाने प्रकाशित केला आहे–ही गोळे यांनी घेतलेली काल्पनिक भूमिका स्वतंत्र विवेचनाला फार पोषक ठरली.

"उत्कृष्ट विद्वान् सुधारक आपलीं मतें कशीं मंडन करितात, तें अनेक पुस्तकांच्या आणि वर्तमानपत्रांच्या द्वारें सर्वांस नित्य कळत आहेच. परंतु जुन्या चालीच्या धर्मसंरक्षक मंडळींस काय वाटतें, ते धर्माभिमान कां बाळगतात, त्यांची श्रद्धा या इंग्रजी विद्येच्या काळांतदेखील कोणत्या कारणांनीं कायम रहाते, त्यांमध्यें कोणत्या उत्कृष्ट प्रेरणा व मनोवृत्ति आहेत, त्यास सुधारणेची भीति कां वाटते, व सुधारणेपासून कोणतें नुकसान, कोणते दुष्परिणाम घडतील असें वाटतें—या सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केलेला फार थोड्या ठिकाणीं दृष्टीस पडतो...ही उणीव विद्याधराच्या ग्रंथानें दूर होण्यासारखी आहे...स्वधर्माच्या संरक्षणाची महत्त्वाकांक्षा ज्यांमध्यें आहे, त्यांस हा ग्रंथ मनोरंजकच नव्हे तर उत्कृष्ट उपदेशपर होईल, असें प्रकाशकास वाटत आहे." असा निर्वाळा सनातन्यांस प्रस्तावनेंत देऊन, सुधारकांसहि या ग्रंथाचें मनन करावयास सांगितलें आहे. कारण विद्याधराने सुधारकांस शत्रूचें बळ व मर्म दाखवून आणि वेळींच इशारा देऊन त्यांचीहि सेवा केली आहे. या उलट "जर विद्वान् सुधारकांस धर्मसंरक्षक पंथाकडे ओढावयाचें असलें तर त्यास उपाय कोणता, हें जुन्या चालीच्या लोकांस या ग्रंथावरून कळून येईल." म्हणजे हा ग्रंथ दुधारी शस्त्रासारखा आहे म्हणाना !

आरंभीं बडा सुधारक असलेला विद्याधर पुढे अनुभवाने व विचाराने हिंदुधर्मांचा कट्टा पुरस्कर्ता बनतो; त्यांतील सुधारकांस अनिष्ट वाटणाऱ्या कांही चालींचें समर्थन करतो; सुधारणा सुचविण्यांत फार सावधगिरी राखण्याचा इशारा देतो. त्याचें हें आत्मचरित्र ( विचारविकासाचें ) म्हणजे त्यानेच शेवटीं म्हटल्याप्रमाणे 'चित्तशोधनाचा खरा वृत्तांत' आहे. प्रकाशकाने ग्रंथांतील विषयांचा तात्काळ बोध होण्यासाठी तें नांव बदललें.

हें पुस्तक गोळे लिहीत होते तेव्हा कॉलेजांतून बाहेर पडणारे सुधारकांच्या हिंदुधर्माच्या कुचेष्टेने भारलेले दिसत व वेळीं अवेळीं स्वधर्माची मनसोक्त टर उडवीत. हें पाहून कोणा स्वधर्माभिमान्याला चीड येणार नाही? केवळ बुद्धिप्रामाण्यावर भिस्त ठेवून धर्माकडे पाहिल्यास जगांतील कोणताहि धर्म आदरार्ह वाटणार नाही. श्रेष्ठ मनोवृत्ति किंवा सद्वासना यांवर तो आधारलेला असून त्यांतील मूलभूत कल्पना व त्यांच्या आधारें सांगितलेले आचार यांचा विचार करणें अवश्य आहे. गोळे यांनी याच दृष्टिकोनांतून हिंदुधर्मांतील जातिभेद, विधवाविवाहनिषेध, बालविवाह इत्यादि सुधारणावाद्यांनी त्याज्य ठरविलेले आचार कसे योग्य आहेत हें पटवून दिलें आहे. बुद्धिश्रमातिरेकाचे दुष्परिणाम दाखवून दिले आहेत. पढतमूर्खांचा जुन्या पिढीविषयी अनादर कसा असंस्कृत मनोवृत्तीचा द्योतक आहे हें संवादांतून स्पष्ट केलें आहे. पण हें प्रि. गोळे यांचें हिंदु आचारविचारांचें समर्थन आज नवमतवाद्यांना मुळीच पटणार नाही यांत संशय नाही. हिंदुधर्माच्या सुधारणेची जर प्रामाणिक इच्छा असेल तर यांतील विचारसरणीला मान द्यावा लागेल. बदलापूरचे अतिवृद्ध व गाढे पंडित श्री. ना. गो. चापेकर यांनी या दोन्ही पुस्तकांच्या द्वितीय आवृत्तीला जे पुरस्कार लिहिलेले आहेत ते अत्यंत मननीय वाटतील. "'हिंदुधर्म आणि सुधारणा' हें पुस्तक म्हणजे विद्यार्थ्यांची भगवत् गीताच होय." हें त्यांचें विधान अति धाष्ट्यांचें वाटेल, पण सारासार विचार करतां गैर नाही हें कळून येईल. हेंहि पुस्तक मुंबई विद्यापीठाने परीक्षेसाठी नेमलें म्हणून तरी याची दुसरी आवृत्ति निघण्याचा सुयोग आला. लेखकाने समाजहितदृष्टीने ( व्यक्तिस्वातंत्र्याच्या उलट ) बालविवाह, पातिव्रत्य यांसारख्या आचारांकडे पाहिलें आहे. समाजशास्त्राप्रमाणेच नीतिशास्त्राचाहि खोल अभ्यास त्यांचा होता. त्यांची विवेचनपद्धति अगदी सुगम असल्याने हे ग्रंथ वाचतांना वाचक तल्लीन होऊन जातो.

त्यांचें सूक्ष्म अवलोकन, दीर्घ अनुभव, चलाख बुद्धि व तडफदार भाषाशैली यांच्यामुळे त्यांचें लेखन उठावदार दिसतें. गेल्या शतकाच्या अखेरीस जे थोर लोकहितैषी व विचारवंत पंडित होऊन गेले त्यांत प्रि. गोळे यांना अवश्य घालावें लागेल. त्यांचे आधुनिक शिक्षणसंबंधीचे विचार आजहि ग्राह्य व मननीय वाटतील. सामाजिक मतांविषयी मात्र मतभेद होणें साहाजिक आहे. टिळक आणि आगरकर या सहकाऱ्यांच्या मधोमध सर्व गोष्टींत त्यांना स्थान द्यावें लागेल.

ते जानेवारी १९०२ सालीं सेवानिवृत्त झाले. पेन्शन उपभोगणारे ते पहिलेच डे. ए. सोसायटीचे आजीव सेवक म्हणतां येतील. नंतर ते पूर्वयोजनेप्रमाणे मध्यप्रातांत हर्द्याजवळ पिरगांव या खेडयांत जाऊन शेतीचा उद्योग करूं लागले. आपल्या वडील मुलाचें शिक्षण बंद करून त्यालाहि शेतीच्या कामास लावलें. पण त्यांना दुर्दैवाने गांठलें. कुटुंब व हा वडील मुलगा अकालीं वारला ( १९०६ ). शेतींत नुकसानी आली. दम्याचा विकार सुरू झाला. शेवटीं नाशकास येऊन राहिले व तेथेच त्यांचा १९०६ सालच्या डिसेंबरांत अंत झाला. त्यांचे दुसरे चिरंजीव मध्यप्रांतांत इलेक्ट्रिकल इंजिनियर आहेत.

प्रि. गोळे यांचा स्वभाव फार उमदा असे. त्यांना विद्यार्थिजीवनाविषयी फार आस्था वाटे व आपला हिंदुधर्म शुद्ध स्वरूपांत कसा राष्ट्रप्रगतीला उपयुक्त ठरेल याची विवंचना असे.

## ग्रंथांतील उतारे

— १ —

### अवस्थांतराचा काळ

हल्लींचा अवस्थांतराचा काळ ब्राह्मणांच्या भावी उत्कर्षाचा निदर्शक आहे कीं अपकर्षाचा आहे हें ठरविलें पाहिजे. ज्या देशास किंवा ज्ञातीस पुढें ऊर्जित दशा आली त्या देशांत किंवा ज्ञातींत आधीं अवस्थांतराच्या काळांत ज्या चळवळी सुरू झाल्या त्या उत्पन्न होण्याचीं कारणें पाहतां नवीन सामर्थ्याचा अवतार, नवीन कल्पनांचा उद्भव व नवीन निश्चयाचें बळ, अशीं तीं कारणें होतीं. एकामागून एक ज्या व्यक्ति समाजांत निपजत, त्यांचें स्वरूप पूर्वीच्याहून उग्र, त्यांच्या कल्पना पूर्वींच्यांच्या

पुढेंच, त्यांचें धैर्यबळ प्राणांतानेंच शांत व्हावयाचें, त्यांच्या तेजानें दिपून त्यांच्या प्रभावास मोहून, महाजनांचा मोठा ओघही त्यांचा अनुचर बनला. मराठ्यांच्या उदयापूर्वीं महाराष्ट्रास असाच अवस्थांतराचा काळ येऊन गेला असावा. परंतु सांप्रतच्या काळाचें स्वरूप फार भिन्न आहे. गेल्या वीस वर्षांच्या अवधींत ब्राह्मण विद्वानांची उंची दर दहा वर्षांस दोन इंच या प्रमाणानें कमी झाली आहे. स्त्रियांमध्येंहि असाच व याहून अधिक ऱ्हास झाला आहे. शरीरसामर्थ्य तृतीयांशानें तरी कमी झालें आहे. समाजास कशी वृद्धावस्था आली आहे हें दाखविलेंच आहे. करारी, निश्चयी, दीर्घोद्योगी, पौरुषगुणी माणसें नष्ट होत आहेत व नवीं पैदा होत नाहींत हें सांगितलें म्हणजेच प्रत्ययास येईल. लहानापासून थोरापर्यंत आत्मावलंबन नाहीं; विद्या आणि दारिद्र्य यांनीं परस्परांस जोरानें कवटाळिलें आहे; व जेवढा हा देश विस्तीर्ण आहे, तेवढीच शिक्षितांच्या कर्तबगारीची मर्यादा आकुंचित झाली आहे. हें अवस्थांतर भावी ऊर्जित काळाचें निदर्शक आहे असें म्हणावें तरी कसें? निकृष्ट दशेचें द्योतक आहे असें म्हणणें रास्त नाहीं काय? या अवस्थांतरांत शुभचिन्हें तरी सुजाण लोकांस कोणतीं दिसतात असा त्यांस माझा प्रश्न आहे.

—'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' (भाग १० वा).

— २ —

## बुद्धिशिक्षण एकपक्षीय आहे

सौंदर्याचें महत्त्व पूर्वीं माझ्या कधींच ध्यानांत आलेलें नव्हतें. मीं त्याचा विचारच केलेला नव्हता. मी शुद्ध बुद्धीचा भक्त होतों. सृष्टीचें सौंदर्य पाहून माझ्या मनाचा ओघ तत्त्वज्ञानाकडे वाहूं लागे, व मग मला आनंद होई. गायन, वादन, चित्रकला वगैरे ललित कलांमध्यें मला फारसें गम्य नव्हतें. कवितेंतही अर्थाशीं तात्पर्य, सहृदयता नव्हती. हा माझ्या शिक्षणांत मोठा ढोबळ दोष राहिला असें आतां मला वाटूं लागलें. मनोवृत्ति जागृत होऊन आनंद होण्यास काव्य आणि कला यांची अभिरुचि अवश्य आहे; ती नसल्यामुळें, मीं स्वतःच्या कपड्यालत्त्यांचा फारसा विचार केला नाहीं, दुसऱ्यांच्या पोशाखाकडे लक्ष दिलें

नाहीं, घरांत व्यवस्था आहे कीं अव्यवस्था आहे हा विचार मनांत बहुधा येत नसे; व घर सुंदर, शोभिवंत करण्याचें माझ्या डोक्यांत मुळींच येण्यासारखें नव्हतें. आपणांस कोणी सुंदर समजून भुलून जाईल ही शंका माझ्या मनांत कधींच आली नव्हती; व आपल्या पत्नीचें रूप दुसऱ्या स्त्रियांशीं ताडून पाहण्याचें माझ्या स्वप्नींही नव्हतें. सौंदर्यांत काय आहे? बुद्धि पाहिजे—विचार पाहिजेत, अशी माझी समजूत होती. तीमुळें मला अंधत्व आलें, व त्यानें केवढा हा अनर्थ झाला! पत्नीस किती तरी व्यर्थ दुःख सोसावें लागलें? विद्यादानांत असल्या मोठ्या उणीवी राहिल्यानें विचार एकपक्षीय होतात यांत बिलकुल शंका नाहीं. दुःखाच्या मोठमोठ्या राशि समोर असून त्या मुळींच दिसत नाहींत; तशाच पण सुखाच्याही राशि समजण्यांत येत नाहींत व आपण शुद्ध बुद्धीचे भक्त असतां, लोकांस कां तसें दिसत नाहीं असें मनांत येऊन आश्चर्य मात्र वाटतें. बुद्धिशिक्षण हें एकपक्षीय शिक्षण होय, ही गोष्ट आतां माझ्या मनांत पक्की भरली व सर्व बाजूंनीं मनास पूर्णता कशी आणावी या विचारांत मी पडलों.

—'हिंदुधर्म आणि सुधारणा' (भाग ११ वा)

— ३ —

## प्रथम आपलें कुटुंब सुखी करावें

कुटुंबाच्या सुस्थितीवर देशाची किंवा राष्ट्राची सुस्थिति अवलंबून असते. जर कुटुंबाची अंतःस्थ व्यवस्था दोषी असेल तर ती सर्व राष्ट्रास बाधक होते. याकरितां कुटुंबाची व्यवस्था व त्यांत मिळणारें शिक्षण उत्कृष्ट असावें याविषयीं आपणांस किती काळजी बाळगिली पाहिजे? व आपल्या कुटुंबाचा ज्यास अभिमान असेल, त्यानें ती व्यवस्था व तें शिक्षण उत्तरोत्तर अधिक निर्दोष व अधिक श्रेयस्कर होत आहे अशाविषयीं जपलें पाहिजे.

दुसरें असें कीं, कोणासही स्वभावतः दुःख प्रिय नाहीं, मग तें दुःख स्वतःचें असो किंवा दुसऱ्याचें असो. जर आपल्या व दुसऱ्याच्या दुःखाचें मनुष्यास निवारण करतां येईल तर मनुष्य साहजिकपणें तसें

करण्यास प्रवृत्त होईल. इतकेंच नव्हे तर ज्याप्रमाणें मनुष्यास स्वतःचें सुख वाढविण्याची इच्छा असते, त्याप्रमाणेंच इतरांचेंहि सुख वाढविण्याची त्याच्या अंतर्यामीं थोडीबहुत तरी प्रेरणा होतेच. सामान्य जनांची स्थिति पाहिल्यास प्रथम आपलें कुटुंब सुखी करावें, मग आपल्या आप्तमित्रांस सुखी होण्यास मदत करावी, नंतर होईल तर आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या थोडेंबहुत उपयोगी पडावें, अशी त्यांची प्रवृत्ति असते. या स्थितीस अपवाद म्हटला तर तो लोभ, मोह, मत्सर, द्वेष वगैरे अविचारजन्य दुर्विकारांस वश झालेल्या लोकांचा मात्र होय; परंतु तेही आपल्या कुटुंबांतील माणसांस सुखी करण्याची मनांत ईर्षा बाळगितात. सामान्य जनांची जी ही स्थिति सांगितली तीच देशाच्या खऱ्या कल्याणास कारणीभूत होते.

—'कुटुंबाचा अभिमान व आपले दुराग्रह'
(उपदेश दुसरा)

* * *

: १२ :

# गंगाधर वामन लेले

गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत आपल्या प्राचीन वैदिक आणि पौराणिक वाङ्मयाचा मराठींत परिचय करून देणाऱ्या विद्वान मंडळीमध्ये महादेव मोरेश्वर कुंटे, न्या. मू. तेलंग, रा. ब. पंडित, डॉ. भांडारकर, लो. टिळक, राजारामशास्त्री भागवत प्रभृतींचीं नांवें जशीं परिचित आहेत तशीं कांही इतरांचीं परिचित व्हावयास पाहिजेत. उदाहरणार्थ, एका लेले घराण्यांतच सोमयाजी वेणीमाधवशास्त्री, महामहोपाध्याय त्र्यंबकशास्त्री, वांईचे प्रसिद्ध भाऊशास्त्री, गंगाधर वामन ऊर्फ भाऊसाहेब, धारचे काशीनाथ कृष्ण, वैयाकरण रामशास्त्री, इंजिनियर माधव व्यंकटेश, गणेशशास्त्री त्र्यंबककर यांसारख्या कित्येक संस्कृत-साहित्यिक व्यक्ती निर्माण झालेल्या दिसतील. अशा उपेक्षितांची माहिती संशोधून ती पुढे मांडणें वाङ्मयेतिहासकारांचें कर्तव्य आहे. अशाच एका विद्वानाचा या लेखांत परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

गंगाधरपंत ऊर्फ भाऊसाहेब यांचें घराणें मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील बसणी गांवचें. त्यांचे एक पूर्वज विश्वनाथ केशव हे पेशवाईत पराक्रम करून गेले. वसई प्रांताची सुव्यवस्था लावून दिल्यावरून यांना हा बसणी गांव इनाम मिळाला होता. भाऊसाहेबांचे वडील पुण्यास सुपरिंटेंडिंग इंजिनियर (मध्यभाग) यांचे हेडक्लार्क असून निवृत्तीनंतर त्यांनी बऱ्याच सार्वजनिक कामांत लक्ष घातलें. पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे कांही काळ ते सेक्रेटरी होते. तसेंच तेव्हा नुकत्याच स्थापन झालेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विनावेतन हिशेब पाहात. त्यांनी शेतीहि घेतली होती. धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे घरीं स्मार्ताग्नि ठेवला होता. यांचे वडील चिरंजीव देखील इंजिनियरिंग खात्यांत नोकरीला होते. दुसरे चिरंजीव गंगाधरपंत यांचा जन्म १० मार्च १८५९ रोजीं झाल्याचें त्यांच्या उपलब्ध कुंडलीवरून दिसतें.

यांचें शिक्षण पुण्यास प्रथम सरकारी हायस्कुलांत व नंतर डेक्कन कॉलेजांत झालें. संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे ऐच्छिक विषय घेऊन ते बी. ए. झाले ( १८८७ ) व कोठे सरकारी नोकरी न पाहतां, त्या वेळीं कांहीं स्वार्थत्यागी तरुण सुशिक्षितांनी चांगल्या प्रकारें चालविलेल्या डे. ए. सोसायटींत शिक्षक म्हणून राहिले. त्यांच्या वडिलांचा या संस्थेशीं चांगला संबंध होताच. तेव्हा आजीव सेवक म्हणून मान्यता मिळण्यास वेळ लागला नाही. शिवाय भाऊसाहेबांच्या अंगीं धीमेपणाने व हुषारीने कामें करण्याची लकब होती. सोसायटींतील त्यांची बरीचशी नोकरी न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट म्हणून झाली.

साताऱ्यास द. कृ. जोशी यांनी चालविलेलें एक हायस्कूल होतें. तें सोसायटी-कडे घेण्यासंबंधीं १८९६ सालीं जी वाटाघाट चालली होती ती प्रामुख्याने भाऊसाहेबच करीत होते. त्याला यश येऊन सातारा न्यू इंग्लिश स्कूल कायमचें सोसायटीकडे आलें ( १८९९ ) व आज तें चांगलें चाललेलें आहे. सोसायटीच्या नवीन मराठी शाळेचेहि ते दोन वर्षें ( १९०७–०९ ) सुपरिंटेंडेंट होते. विद्यार्थी वसतिगृहावरदेखील त्यांना अधूनमधून देखरेख ठेवावी लागे. सुप्रसिद्ध ‘ त्राटिका ’ नाटकाचे कर्ते प्रो. वा. बा. केळकर हे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये मोठे नाणावलेले इंग्रजीचे प्राध्यापक असून त्यांच्या अनेक नाट्यलेखन–संपादनादि व्यवसायामुळे वक्तशीरपणा त्यांच्यांत मुळीच नव्हता. तेव्हा साहजिकच इतर आजीव सेवकांत कुरबूर चाले. एकदा रागावून केळकरांनी कॉलेज सोडलेंहि होतें. पण भाऊसाहेबांनी त्यांची समजूत घालून त्यांना परत आणलें. मध्यं-तरींच्या थोड्या काळांत भाऊसाहेबच स्वतः कॉलेजांत इंग्रजीचे तास घेत. ते १८९९ ते १९०२ या सालांत पुणें म्युनिसिपालिटींत सभासद होते. इंग्रजी व मराठी नियतकालिकांतूनहि ते लिहीत. १९१२ सालीं सोसायटींतून निवृत्त झाल्यावर त्यांनी आपलें सर्व लक्ष उच्च संस्कृत साहित्याकडे वळविलें. हें साहित्य सुबोध रीतीने मराठींत आणण्याची त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे.

पुढे विख्यात इतिहास संशोधक म्हणून नांवाजलेले वि. का. राजवाडे यांनी गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकांत ‘ भाषांतर ’ नांवाचें एक नियतकालिक पुण्यास चालविलें होतें. इंग्रजींतील उत्कृष्ट ग्रंथाचीं भाषांतरें विद्वानांकडून करवून घेऊन तीं यांत क्रमशः देण्यांत येत असत. भाऊसाहेबांनी जॉन स्टुअर्ट मिल

याच्या 'युटिलिटेरियानिझम्' या पुस्तकाचें 'जनपदहितवाद' या नांवाने भाषांतर केलेलें यांत छापलें आहे. त्यांच्या वेदांच्या अभ्यासाचें पहिलें फळ 'त्रिसुपर्ण' असून, तें सार्थ, सभाष्य व इंग्रजी आणि मराठी अर्थासह १९०० सालीं बाहेर पडलें. हें पुस्तक त्यांनीं आपल्या वडिलांस अर्पण केलें आहे.

"आपले हातून पातकें घडतात. हीं पातकें तत्त्वज्ञानास प्रतिबंधक होतात; कारण, तत्त्वज्ञानाची प्राप्ति होण्यास अंतःकरण शुद्ध असावें लागतें. पातकांचें क्षालन झाल्याशिवाय अंतःकरणास शुद्धता येत नाहीं. तेव्हां ह्या पातकांचें निरसन होण्यास ह्या त्रिसुर्ण मंत्रांची योजना केली आहे." असें हेतुस्पष्टीकरण करून ब्रह्महत्या, भ्रूणहत्या व वीरहत्या या तीन पातकांचा अर्थ वेगळ्या रीतीने लावून दाखविला आहे. यज्ञीय कर्मांत सांगितलेल्या प्रार्थना करण्यांत कांही चूक झाली तर ब्रह्महत्या होते; यज्ञीय दीक्षा घेतल्या अवधींत रेतःस्खलन झालें तर ती भ्रूणहत्या होते व अग्निसेवेंत कांही अंतर पडलें तर ती वीरहत्या होते. तेव्हा, तैत्तिरीय आरण्यकाच्या नारायणीय उपनिषदांतील हें त्रिसुपर्ण प्रत्यवायनिरसनासाठीच आहे असें सांगून, भोजनकालींच याचा पाठ म्हणण्याचा प्रघात कां पडला याचें विवरण केलें आहे. तत्त्वज्ञानी विद्वान पुरुषाची योग्यता विद्यार्थ्याने प्राप्त करून घेण्यासाठी हे रूपकात्मक मंत्र आहेत. यांतील "मधु वाता ऋतायते, मधु क्षरन्ति सिन्धवः" यासारखे मधुमधुर मंत्र खरोखर कानांनाच नव्हे तर मनालाहि गोड लागतात, असा पाश्चात्य पंडितांचा अनुभव आहे. यांतील शेवटचें 'सहनाववतु। सहनौ भुनक्तु।' इत्यादि मंत्रोच्चार तर आजहि नेहमी ऐकूं येतात.

यानंतरचा छापील ग्रंथ म्हणजे 'लिंगपुराण'. पुण्यास हरि नारायण गोखले यांनी आपल्या छापखान्यांत 'पुराण-मालिका' प्रसिद्ध करण्यास जी सुरुवात केली ती त्यांच्या चिरंजीवांनी पुढे चालविली. प्रस्तुत 'लिंगपुराण' तिसऱ्या क्रमांकाचें आहे. व्यासरचित १८ महापुराणांपैकीं हें शिवपुराण असून, भाऊसाहेब हे शंकरभक्त असल्याने त्यांनीं या पुराणाचें मराठी सार-रूपांतर करणें योग्यच होतें. "अमुक गोष्ट बरी किंवा वाईट हें ठरविण्यापूर्वी त्या गोष्टीचें वस्तुगत्या ज्ञान करून घेणें, हें इष्ट आहे. या दृष्टीनें पुराणाविषयीं कोणतें तरी मत ठाम करण्यापूर्वी त्यांत काय आहे हें समजून घेणें, सर्व मतांचे लोकांस आवश्यक आहे," असें प्रस्तावनेंत ते जें सांगतात त्यासाठीच त्यांची ही रचना

आहे. शिवलिंगाची उपपत्ति त्यांनी जी दिली आहे व ' जननेंद्रियांचें अर्चन ' ही पाश्चात्य कल्पना खोडून काढली आहे, तो उतारा या लेखाच्या शेवटीं आम्ही देणार आहों.

या लिंगपुराणाप्रमाणेच त्यांनी गणेशपुराण, मत्स्यपुराण व स्कंदपुराण यांचीं मराठी रूपांतरें मिरजेचे संस्थानिक बाळासाहेब पटवर्धन यांच्यासाठी केलीं होतीं. पण तीं अप्रकाशितच राहिलीं. आता तीं कोठे असतील कोणास ठाऊक ! त्यांचें असेंच बरेंच अप्रकाशित वैदिक वाङ्मय आहे. चित्रशाळेचे कै. वासुकाका जोशी यांनी सांगितल्यावरून श्रौतवाङ्मयांतील आख्यायिका त्यांनी लिहून काढल्या होत्या. पण त्याहि तशाच मागे राहिल्या. चारहि वेद, त्यांचीं ब्राह्मणें व उपनिषदें, शिक्षा, देवीभागवत, चरणव्यूह, अग्निपुराण, मीमांसा यांसारख्या उच्च साहित्याचें वाचन करून त्यांनी काढलेलीं टिपणें आमच्या पाहण्यांत आहेत. यावरून भाऊसाहेबांच्या चौफेर विद्वत्तेची कल्पना येते. प्रो. एन्. बी. रानडे यांचा मोठा इंग्रजी–मराठी कोश होण्यापूर्वी, अहमदाबादचे गुजराती भाषेचे तज्ज्ञ माधवराव बेलसरे यांच्या सांगण्यावरून भाऊसाहेबांनी इंग्रजी–मराठी कोशाची वेब्स्टरच्या कोशावरून बहुतेक कच्ची प्रत तयार केली होती. पण हें काम अर्धवटच राहिलें. नाही म्हणावयास पुढे कृष्णाजी गोविंद किन्रे यांनी ' Students' English and Marathi Dictionary ' जी प्रसिद्ध केली तिचे साहाय्यक म्हणून त्यांचें नांव घातलेलें आढळतें.

' मॅक्बेथ ' या शेक्सपीयरच्या नाटकाचें त्यांनी केलेलें भाषांतर असेंच अप्रसिद्ध आहे. ( त्यांतील उतारा शेवटीं देत आहों. ) शि. म. परांजपे यांनी ' मानाजीराव ' नांवाचें केलेलें मॅक्बेथचें रूपांतर प्रसिद्धच आहे. पण भाषांतर म्हणून हेंच एक दिसतें. ल. ना. जोशी यांचें ' डाकिनीविलास ' हेंहि रूपांतरच आहे.

त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ' प्रस्थानभेद ' अथवा ' प्राचीन चवदा विद्यांचें दिग्दर्शन ' हा होय. हा १९१४ सालीं छापला. याला त्यांचे कॉलेजांतील सहकारी व मित्र प्रो. चिं. गं. भानू यांची प्रस्तावना आहे. या ग्रंथाच्या निर्मितीविषयी भाऊसाहेब म्हणतात, " वे. शा. सं. रा. वासुदेवशास्त्री अभ्यंकर फर्ग्युसन् कॉलेजांतील गुरु, यांच्या जवळ माझे कांही मित्र सर्वदर्शनसंग्रहाचें

अध्ययन करीत होते. त्या प्रवचनांचे श्रवणाचा लाभ मला कांहीं दिवस मिळाला. त्या वेळीं मधुसूदनसरस्वतीकृत 'प्रस्थानभेद' ह्या नांवाचा लहानसा संस्कृत ग्रंथ माझ्या पाहाण्यांत आला. ह्या ग्रंथांत दिलेली माहिती लिहून प्रसिद्ध केली तर त्यापासून आपल्या समाजांतील पुष्कळ जिज्ञासु लोकांस फायदा होईल असें वाटून, हें पुस्तक लिहिण्यास मीं आरंभ केला. मूळ ग्रंथ अगदीं लहान असल्यामुळें त्याचें भाषांतर केलें असतें, तर हवी तितकी माहिती देतां आली नसती म्हणून प्रस्थानभेदांतील माहितीहून अधिक माहिती मिळविण्यासाठीं मला अनेक मराठी, संस्कृत व इंग्लिश पुस्तकें धुंडाळावीं लागलीं आणि माझ्या विद्वान् मित्रांपासून वारंवार माहिती मिळवावी लागली."

या ग्रंथात. वेद, वेदांगें, वेदांचीं उपांगें (पुराणें, दर्शनें, मीमांसा), धर्मशास्त्रें, चौदा विद्या व चौसष्ट कला इ. बहुतेक प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा चांगला परिचय करून दिला आहे. "आपल्या पूर्वजांची जीवंत कार्यक्षमता व बुद्धिकुशाग्रता किती प्रचंड होती याची अल्प स्वल्प तरी कल्पना करतां येण्याची सवड या 'प्रस्थानभेदानें' प्राप्त होणार आहे," हे प्रो. भानूंचे उद्‌गार यथार्थ वाटतात.

भाऊसाहेब २६ जानेवारी १९२६ रोजीं पुण्यास वारले. त्यांचे थोरले चिरंजीव महादेवराव जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलर होते व धाकटे यशवंतराव हे जर्मन विश्वविद्यालयाचे डी. एस्सी. आहेत. यांचाहि मराठीचा व्यासंग चांगला असून विशेषतः नाट्यवाङ्मयावर चांगला संशोधनपर अभ्यास आहे. भाऊसाहेब हे सनातनी वृत्तीचे असले तरी सामाजिक सुधारणेच्या ते विरुद्ध नव्हते. डॉ. अण्णासाहेब कर्वे यांना सामाजिक कार्यांत त्यांची सहानुभूति असे.

## ग्रंथांतील उतारे

— १ —

### शिवलिंगाची उपपत्ति

लिंग म्हणजे अव्यक्त, प्रकृति, पुरुष इत्यादि जीं पंचवीस सांख्य तत्त्वें आहेत, तींच लिंग होत. समष्टिव्यष्टिरूप हें जें ब्रह्मांड हेंच लिंग.

ह्याची अर्चा करावी. पूर्ण ज्ञानी किंवा पूर्ण योगी जे झाले नाहींत त्यांनीं हें शिवस्वरूप मानून त्याची अर्चा करावी, असें येथें सांगितलें आहे. बहुतेक सामान्य मनुष्यांची व पाश्चिमात्य पंडितांची समजूत अशी झालेली दिसते कीं, शिवलिंगपूजा म्हणजे केवळ जननेंद्रियाचें अर्चन आहे. असा ग्रह होण्यास अगदीं कारण नाहीं असें नाहीं. अलंकारिक भाषेचा हा परिणाम असावा असें वाटतें. लिंग शब्दाचा वास्तविक मूळ अर्थ चिन्ह असा आहे. हें सर्व ब्रह्मांड, त्याची सृष्टि, स्थिति व लय हीं सर्व परमात्म्याच्या शक्तीचें द्योतक चिन्ह आहेत ; म्हणून त्यास लिंग असें म्हटलें आहे. सामान्यतः आतां जो अर्थ लिंग शब्दाचा जाणला जातो, तो अर्थ पूर्वींच्या लोकांचा नव्हता, असें या पुराणावरून दिसतें. कारण मुख्य लिंगार्चन जें सांगितलें आहे, तें अभ्यंतरींचें आहे. म्हणजे ज्ञान व योग यांच्या बलानें हृत्कमलाच्या ठिकाणीं महेश्वराची व त्याच्या सर्व देवतांची भावना करून, तेथें त्यांचें ध्यान करावें, हीच शिवलिंगाची पूजा होय. पार्थिवादि जीं लिंगें करतात, त्यांची योजना फक्त अज्ञान्यांकरितां आहे. शिवाय लिंगाकृति ही केवळ जननेंद्रियासारखी नसून त्याच्याबरोबर स्कंद, देवी, नंदी व त्याची बायको आणि कधीं कधीं विष्णु, ब्रह्मदेव यांची स्थापना त्या लिंगावर करावी लागते, म्हणून या पुराणावरून तरी असें दिसतें कीं, ही पूजा आर्य लोकांनीं येथील रहिवासी रानटी लोकांपासून घेतली आहे असें नाहीं.

— लिंगपुराण ( प्रस्तावना )

— २ —

## खुनानंतर मॅक्बेथची मनःस्थिति

लेडी म्याक्बेथ :–ह्या कृत्याविषयीं असल्या तऱ्हेनें विचार कधीं चालवूं नये.

म्याक्बेथ :–मला वाटतें कोणीतरी बोलत आहे. "निजूं नका, म्याक्बेथ झोपेचा नाश करून टाकतो आहे," असे शब्द मीं ऐकले. अरेरे, गरीब बिचारी झोप ! ही कशी आहे ? चिंताजालाचे गुंतागुंत झालेल्या तंतूंस

सोडवून नीट करणारी ; प्रत्यह जीविताचें मरण ; काबाडकष्टी लोकांस स्नानविधि ; विपन्न मनाचीं रसायनं ; अपरिमित सृष्टिचक्राची पुनःप्रवर्तक ; ह्या जीवितोपभोगाची भर्त्री—

लेडी म्या. :–म्हणणें तरी काय आपलें !

म्या. :–घरांतील सर्व लोकांस त्या शब्दानें पुनः पुनः ओरडून सांगितलेन् कीं, अतःपर निजूं नका. ग्लानिस्नें झोपेचा नाश केला, म्हणून कॉडरला कधींहि झोंप येणार नाहीं, म्याक्बेथला कधींहि झोंप येणार नाहीं !

लेडी म्या. :–असें सांगणार तरी कोण आहे तें ? आपण शूर आहांत, तर आपलें शौर्य असल्या गोष्टींचा वेड्यासारखा विचार करण्यांत वश कां होऊं देतां ? जा, थोडेंसें पाणी घ्या आणि हातावरचा हा घाणेरडा पुरावा धुवून टाका. त्या खोलींतून इकडे कशाला ह्या कट्यारी आणल्यात ? ह्या तिथेंच पडल्या पाहिजेत. जा, घेऊन जा तिकडे, आणि हुजरे तिथें निजले आहेत त्यांच्या अंगाला रक्त पुसून शिंपडा त्यांच्यावर.

म्या. :–छे ! छे ! तिकडे आतां पुनः म्हणून जाणार नाहीं. मीं जें कर्म केलें त्याचा नुसता विचार मनांत आला कीं माझी गाळण होते. नाहीं, नाहीं ! त्या कृत्याकडे माझ्याच्यानें पहावणारसुद्धां नाहीं !

लेडी म्या. :–अहाहा ! ! ! भित्रे न् अधीर कुठचे ! हातीं घेतलेलें काम पुरतें म्हणून व्हायचेंच नाहीं. आणा त्या कट्यारी इकडे. निजलेले किंवा मेलेले सारखेच ! दोन्ही चित्रेंच ! चित्रांतील राक्षसास पोरं भितात. राजाच्या जखमांतून रक्त वाहत असलें तर मी त्या हुजऱ्यांच्या तोंडाला तें माखून टाकतें. हा गुन्हा त्यांचा आहे असा वहीम आला पाहिजे. ( निघून जाते )

— म्याक्बेथ ( भाषांतर. अप्रसिद्ध )

— ३ —

## विद्याहंकाराचा पाणउतारा

एकदां पूर्वी मैत्रेय ग्लाव ऋषि हा एकादशाक्ष मौद्गल्य विद्वान ऋषीकडे गेला. मौद्गल्य ब्रह्मचर्यांत राहून ब्रह्मचाऱ्यांस शिकवीत होता हें पाहून मैत्रेयानें विचारिलें कीं, मौद्गल्य ब्रह्मचारी राहून ब्रह्मचाऱ्यांस शिकवितो हो ह्या शिक्षणाची मर्यादा आहे कीं काय ? मौद्गल्याचे

अन्तेवास्यानें ( शिष्यानें ) हा प्रश्न ऐकला. त्यानें गुरूकडे जाऊन त्यांस सांगितलें कीं, आज जो अतिथि आला आहे तो आपणास दुरधीयान ( शिकवितां न येणारा ) म्हणतो. यावर मौद्‌गल्यानें शिष्यास विचारिलें, " अतिथि विद्‌वान आहेत काय ? "

" होय, ते तीन वेद शिकवितात, " असें शिष्याचें उत्तर ऐकून त्यास मौद्‌गल्य म्हणाले, " अतिथीचा अन्तेवासी असेल त्याला माझेकडे बोलावून आण. "

विस्पष्ट विजिगोष, मैत्रेयाचा शिष्य मौद्‌गल्याकडे गेल्यावर त्याला मौद्‌गल्य म्हणाले, " तुमचे आचार्य काय शिकवितात ? " तो म्हणाला, " तीन वेद. " यावर मौद्‌गल्य म्हणाले, " आम्हांस सर्व वेद मुखोद्‌गत आहेत असें असून तुम्हीं शिष्टांनीं शिष्टांस असें ( उद्दामपणाचें ) बोलूं नये...त्यांस मी जो प्रश्न विचारीन त्याचें उत्तर मैत्रेयास देतां येणार नाहीं. "असें म्हणून मौद्‌गल्य आपल्या शिष्यांस म्हणाले, " सौम्या ! तूं ग्लाव मैत्रेयाकडे जा. आणि त्यांचे जवळ बसून, ' महाराज, मला शिकवा ' असें त्यांस म्हण. 'चोवीस योनी व बारा मिथुनें अशी असणारी सावित्री गायत्री, अथर्वांगिरस हे जिचे डोळा होत आणि जी सर्वांचा आश्रय झालेली आहे, अशी ती सावित्री मला शिकवा. ' सौम्या ! त्यांना ती सावित्री शिकवितां आली नाहीं ( दुरधीयान ) तर ते तुला म्हणतील, ' ब्रह्मचारी ब्रह्मचाऱ्यास सावित्री शिकवितात. ' मग तूं त्यांस म्हण कीं, ' तुम्ही मौद्‌गल्यास दुरधीयान म्हणालात, आणि त्यांचे प्रश्नास आपणास उत्तर देतां आलें नाहीं. ' इत्यादि. "

यानंतर मैत्रेय इतराकडे गेला. ( हा ऋग्वेदाचे-ऐतरेय ब्राह्मणाचा ऋषि ) इतरांनींहि मैत्रेयाचें उत्तर दिलें नाहीं. आणि ते मैत्रेयास म्हणाले, " तुम्ही मौद्‌गल्यास दुरधीयान असें म्हणाला, आणि त्यांच्या प्रश्नाचें तुम्हांस उत्तर देतां आलें नाहीं ! "

मैत्रेय आपल्या शिष्यांस म्हणाले, " मी मौद्‌गल्यास, दुरधीयान असें म्हटलें ; त्यांचे प्रश्नाचें उत्तर मला देतां आलें नाहीं, म्हणून मी त्यांचेकडे

जातों आणि शांति करून घेतों. यासाठीं तुम्ही सर्व आतां वाटेल तिकडे किंवा आपापले घरीं जा."

प्रातःकाळीं मैत्रेय समित्पाणि होऊन म्हणजे हातांत समिधा घेऊन, शिष्यत्व पत्करून मौद्गल्याकडे गेले आणि त्यांस म्हणाले, "मी आपल्याजवळ ( शिकण्यास ) आलों आहे. सर्व शांति करावी."

—गोपथब्राह्मण ( आख्यायिका. अप्रसिद्ध )

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७३८२९ दि: निबंध
९८०४ दि: ८-३-७१
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ८२८५

: १३ :

# लक्ष्मण नारायण जोशी

पुढील आत्मचरित्र मीं माझे वृद्ध मित्र श्री. लक्ष्मणराव जोशी यांच्याकडून मरणापूर्वी थोडेच दिवस लिहून घेतलें. त्यांच्या पाठीस मी कित्येक दिवस लागलों होतों की, तुमच्या आठवणी, आख्यायिका, विस्तृत चरित्र इत्यादि लिहून द्या. त्यांनाहि इच्छा होती, पण मरणाआधी २।३ वर्षांपासून ते थकत चालले होते. पुन्हा पुन्हा उसना जोर धरून लिहावयास बसत, पण लवकरच दमत. त्यांनी पेशवाईतील आख्यायिका बऱ्याच लिहून पुऱ्या केल्या. त्यापैकी कांही भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पाक्षिक सभांतून वाचून कांही प्रसिद्धहि केल्या आहेत. नंतर कांही मीं ध्रुव मासिकांत दिल्या.

श्री. जोशी यांच्याजवळ चौफेर माहितीचा मोठा सांठा असे. ते आठवणीने कित्येक प्रसंग रंगवून सांगत. त्यांचें मूळचें घराणें रत्नागिरी जिल्ह्यांतील वरवंड गांवचें. पूर्वज गोविंद हरि जोशी हे महादजी शिंदे यांच्या पदरीं राहिले व चढत चढत फडणीस व कोतवाल झाले. ग्वाल्हेरीस अद्यापि फडणिसांचा गोट म्हणून प्रसिद्ध आहे. पण पुढे वृद्धापकाळीं गोविंद हरि पुण्यास येऊन राहिले. (पुणें नगर सं. वृ. खं. २·८९;). श्री. लक्ष्मणरावांच्या आजोबांनी पेशवाईअखेर पाहिलेली असल्याने त्यांच्या तोंडून लक्ष्मणरावांना पेशवाईसंबंधी बरीच अंतःस्थ व नवी माहिती ऐकावयास मिळे. त्यांचें शिक्षण कशा पद्धतीने झालें हें त्यांनी स्वतःच दिलें आहे व त्यांच्या आयुष्याला वाङ्मयीन वळण कसें लागलें याचेंहि वर्णन केलें आहे.

वाङ्मयक्षेत्रांतील मोठमोठे टापू त्यांनी बुद्धिबलाने आक्रमिले होते, इतकेंच नव्हे तर कानेकोपरेहि सोडले नव्हते. ऋग्वेदादि संहिता, धर्मसिंधु, अध्यात्म रामायण, स्तोत्रें वगैरे सटीप भाषांतरले आहेत. कपिध्वज (किंग जॉन), डाकिनीविलास (मॅक्बेथ), पाटीलबोवा, दामाजी (संगीत) रामदास इत्यादि नाटकें लिहिलीं. गणपतराव जोशी, एकनाथ, तुकाराम, ज्ञानेश्वर, बाजीराव


इत्यादि चरित्रें; लंघन-चिकित्सा, रंगारी शिक्षक, जलतत्त्वचिकित्सा, टेलिपथी, पाकसिद्धि इत्यादि शास्त्रीय माहितीचीं पुस्तकें; इंग्रजी शिक्षक, लेटर रायटर, बूट पॉलिश इन्स्ट्रक्टर, महिलाजीवन इत्यादि उपयुक्त लहान ग्रंथ; याप्रमाणे त्यांचें विविध व उपयुक्त लेखन होतें. पं. सातवळेकर यांच्या वैदिक वाङ्मय प्रकाशनांत त्यांचें संपादकीय साहाय्य असे. ते कवीहि होते. प्रकाशकांनी त्यांच्या लेखनावर चांगलाच पैसा मिळविला. शीघ्र लेखनावर शीघ्र पण अत्यल्प मोबदला ! यामुळे त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक व्हावा तसा झाला नाही व त्यांचा उपयोग समाजाला पद्धतशीरपणें करून घेतां आला नाही. सरकारची, धनिकांची व समाजाची अनास्था अशा प्रासादिक लेखकांची कार्यक्षमता मारून टाकून राष्ट्राचें अंतिम नुकसान करण्यास कारण होते, हा अनुभव सर्वत्र येतोच. असो. लक्ष्मणराव ता. १ जुलै १९४७ रोजीं वारले.

## ल. ना. जोशी यांचें आत्मचरित्र

माझ्या पूर्वजांची माहिती 'पुणें नगर संशोधनवृत्त', खंड दुसरा याच्या १०० ते १११ पर्यंतच्या अकरा पानांत 'गोविंद हरि जोशी यांचा वाडा व वंश' या मथळ्याखालीं छापली आहे.

सदाशिव पेठ, पुणें येथील खुन्या मुरलीधराच्या देवळाचे मालक रा. खरे हें माझें मातुलगृह. तेथें माझा जन्म शके १७९४ फाल्गुन शु॥ सप्तमी बुधवार ता. ५ मार्च सन १८७३ रोजीं पहांटे सूर्योदयापूर्वी दोन घटका कृत्तिका नक्षत्रावर झाला. त्या वेळची माझी जन्मकुंडली पुढीलप्रमाणें —

जन्मकुंडली




माझ्या वयाच्या पांचव्या वर्षी मला तात्या पंतोजींच्या शाळेंत घालण्यांत आलें. तेथें धूळपाटीवर प्राथमिक उजळणी, बाराखड्या व तोंडचे हिशेब

इतकें शिक्षण झाल्यावर मला खड्यांवर बसविण्यांत आलें. मोडी अक्षर लिहितां व वाचतां येऊं लागल्यावर सातव्या वर्षी सरकारी शाळेंत घातलें. तेथें तिसरी मराठी इयत्ता झाल्यावर प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें सहाव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण झालें व नंतर वयाच्या अकराव्या वर्षी पूना हायस्कूलमध्यें इंग्रजी शिकण्यासाठीं विश्रामबागेंत मी जाऊं लागलों. मराठी शाळेंत जसें आम्हांला लोकमान्य टिळकांचे चुलते रा. गोविंदराव टिळक हे हेडमास्तर होते, तसेंच हायस्कूलचे हेडमास्तर रा. महादेवराव कुंटे हे होते. हायस्कूलमध्यें सातव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण वयाच्या सोळाव्या वर्षी पूर्ण होऊन मी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसलों.

माझी मुंज माझ्या वयाला आठवें वर्ष लागतांच झाली. तोंपर्यंत मला माझ्या आजोबांकडून घरींच गृहस्थाश्रमाला योग्य असें दोन्ही वेळच्या संध्या, पूजा, वैश्वदेव, पवमान, सौर, पांच देवतांचीं स्तोत्रें, त्रिसुपर्ण आणि यज्ञोपवीत-मंत्र इत्यादि धार्मिक गोष्टी शिकविण्यांत आल्या होत्या. बाळपणापासूनच रात्रीं साडेनवाची तोफ झाली कीं निजायचें व पहांटे चार वाजतां आजीनें हांक मारली कीं, उठून शौचविधि मुखमार्जनादि करून वडिलांपाशीं संस्कृत शिक्षण घ्यायला सकाळीं सहा वाजेपर्यंत जाऊन बसायचें, असा जो ठराविक कार्यक्रम आंखलेला होता तो वयाच्या पंधरा सोळा वर्षांपर्यंत चालू होता. ती पहांटे उठण्याची संवय अद्यापि कायम आहे.

माझे धार्मिक आणि संस्कृत अभ्यास मी स्वतः घोकंपट्टी करीत न बसतांच माझ्या हस्तगत केवळ श्रवणानें झाले. माझ्या वडील बंधूंना माझे आजोबा आणि माझे वडील हे जेव्हां शिक्षण देत तेव्हां तें ऐकण्यास तेथें बसण्याचें मला काम दिलेलें होतें. पंचमहाकाव्यांतले थोडे थोडे भाग, थोडी कौमुदी, एक दोन नाटकें, चंपू आणि सबंध अमरकोश इतका अभ्यास त्या वेळीं जो माझ्या बंधूंना शिकविण्यांत आला तो सर्व मला घोकंपट्टी न करतांच, बंधूंनीं केलेल्या घोकंपट्टीमुळेंच अवगत झाला. हायस्कूलमध्यें आमच्या वर्गांत, डॉ. भांडारकरांचे कनिष्ठ चिरंजीव मित्रवर्य देवदत्त भांडारकर हे असत. संस्कृतमध्यें माझा नंबर नेहमीं त्यांच्या वर असे. आम्हांला संस्कृताला बोपर्डीकरशास्त्री आणि गणेश जनार्दन आगाशे असे नेहमीं दोन शिक्षक असत. व्याकरणाचा भाग शास्त्रीबोवा शिकवीत आणि भाषांतरादिक भाग आगाशे शिकवीत.

आगाशे हे स्वतः कविता रचीत असत. मला अमरकोश पाठ येत असल्यानें ते मजकडून वर्गांत एका शब्दाला अनेक शब्द नेहमीं म्हणून घेत. त्यामुळें देवदत्त भांडारकर फिका पडे. मला बाळपणासूनच मराठींत कविता रचण्याचा नाद असल्यानें आगाशांच्या शिक्षणाच्या सहवासानें तो माझा नाद पुढें बराच वाढविला गेला.

मला बाळपणापासून पोहणें आणि घोड्यावर बसणें यांची फार आवड असे. पोहण्याची हौस आजोबांकडून जशी पुरविण्यांत आली तशीच घोड्यावर बसण्याची हौस आमच्या घराण्याशीं ओळख असलेल्या पुण्यांतील खासगीवाले, रास्ते, फडणवीस, पुरंदरे, नातू इत्यादि सरदारांच्यामुळें पूर्ण झाली. त्या वेळीं सरदारांच्या घरीं घोडे असत. सध्यांप्रमाणें त्या वेळीं मोटारी व सायकली नव्हत्या. यानंतर निशाण मारणें आणि तलवार चालविणें ही हौसहि पूर्ण व्हावी अशी इच्छा उत्पन्न झाली. ती हौस पूर्ण करून घेण्याकरितां रा. ब. नारायणभाई दांडेकर यांचा धाकटा मुलगा पलटणींत होता, त्याच्याबरोबर मी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर घोडेस्वारांत राहाण्याकरितां काठेवाडांतील डीसा नांवाच्या गांवीं गेलों. तेथें ड्यूक ऑफ कॅनॉट्स ओन लान्सर्स ही घोडेस्वारांची पलटण होती व तिच्यांतच दांडेकर हे नोकर होते.

पूना हायस्कूलमध्यें विद्यार्थिदशेंत असतांना मला तालमीचा नाद लागलेला होता व त्यामुळें कुस्ती, मल्लखांब, हॉरिझांटल आणि पॅरलल बार यांचें उत्तम शिक्षण मिळालेलें होतें. लहानपणापासूनच प्रकृति निकोप होती. या सर्व कारणांनीं व घोड्यावर उत्तम बसतां येत असल्यानें वर सांगितलेल्या. डी. सी. ओ. लान्सर्समध्यें माझा प्रवेश होण्यास अवधि लागला नाहीं. मी परीक्षेंत पास होऊन माझें नांवहि घातलें गेलें; परंतु पलटणीच्या सरकारी नियमाप्रमाणें दक्षिणी कोंकणस्थ ब्राह्मणाला, धार्मिक अडचणीमुळें एन्‌लिस्ट करूं नये असा जो नवाच नियम झाला होता त्याला अनुसरून पांच महिन्यांनीं मला घोडेस्वारांत रुजूं करून घेतां येत नाहीं, असें उत्तर मिळालें व निराशेचें माप पदरीं घेऊन परत यावें लागलें.

परत आल्यावर पुण्यास शाहूनगरवासी नाटक मंडळीचीं वीररसोत्पादक नाटकें पाहून आपणहि पुण्याच्या रंगभूमीवर वीररसाचीं सोंगें करून शूरत्वाची

हौस फेडून घ्यावी असा विचार केला. मंडळी जमविली. सर वुइल्यम वॉलेसच्या चरित्रावर ‘ विजयसिंह ’ नांवाचें नाटक लिहिलें आणि तेंच सोंग स्वतः घेऊन रंगभूमीवर दोन तीन प्रयोग केले. प्रयोग उत्तम वठले; परंतु त्यांतहि एक नवेंच लचांड उत्पन्न झालें. नाटकास लागणारे कपडे तयार करण्याकरितां आमच्या ‘ डेक्कन थिएट्रिकल सोसायटी ’ नांवाच्या नाटक मंडळीच्या गोगटे नांवाच्या सेक्रेटरीनें आम्हांस फशीं पाडलें. नाटकी कपडेलत्ते तयार करण्याकरितां रा. ब. बाबूराव ओंकार यांचें आम्हीं दोनशें रुपये कर्ज काढलें होतें तें परत करण्याचें आश्वासन गोगटे यांनीं पूर्ण केलें नाहीं. नाटकाचे तीन प्रयोग झाले. त्याचें उत्पन्न गोगटे खाऊन गेला व आम्हां प्रोनोटवर सह्या देणाऱ्या सात जणांवर फिर्याद लागली. रुपयांची फेड अर्थात् माझ्या हिस्स्याची माझ्या वडिलांना करावी लागली. नामुष्की पदरीं आली. तेव्हां तोंड काळें करावें असें वाटलें. इतक्यांत परांजपे, टिळक व सहस्रबुद्धे यांनीं मोंगलाईंत लातूर येथें जिनिंग फॅक्टरी काढल्याची खबर मिळाली व तींत माझे मित्र रा. धोंडोपंत विद्वांस हे टिळकांच्या मार्फतीनें मेकॅनिकल एंजिनियरिंगचें काम शिकण्यास जात असल्याची बातमी समजली. तेव्हां टिळकांना भेटून त्यांचे भाचे धोंडोपंत यांच्याबरोबर मला शिकायला धाडा अशी त्यांच्यापाशीं मीं विनंति केली व तिला अनुसरून त्यांनीं रुकार दिल्यामुळें मी लातूरच्या त्यांच्या गिरणींत जिन फिटरचें काम शिकण्यास गेलों. परंतु तेथें आम्हां दोघांचेंहि मन लागेना. धोंडोपंताला टिळकांनीं ‘ केसरी ’ ऑफिसच्या कामासाठीं घरीं ठेवून घेतल्यामुळें दुसऱ्या वर्षी ते आले नाहींत. मी गेलों होतों, परंतु गिरणींत एंजिन एकाएकीं फुटल्यामुळें व पुण्यास घरीं धाकट्या बहिणीचें लग्न असल्यामुळें जो परत आलों तो पुन्हां कधींच गिरणीकडे गेलों नाहीं.

त्यानंतर माझ्या वडिलांची पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजवरून धुळ्याच्या ट्रेनिंग-कॉलेजवर बदली झाल्यामुळें मी त्यांच्याबरोबर धुळ्यास न जातां मुंबईस व्हेटरनरी कॉलेजमध्यें शिकायला गेलों. तेथें शिक्षण व्यवस्थित चाललें होतें. पहिलें वर्ष संपून दुसरेंहि संपत आलें होतें. परंतु मध्येंच जो एक बखेडा झाला त्यानें माझ्या आयुष्यक्रमाची क्रांति करून टाकली. त्या बखेड्याचें वर्णन पुढीलप्रमाणें:—

मुंबईस व्हेटरनरी कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतां माझे वडील मला दरमहा वीस रुपये धाडीत असत. तेथील स्नेह्या-सोबत्यांचा जसजसा व्याप वाढत

चालला तसतसा खर्चहि वाढत गेला. त्यामुळें वडिलांकडून येणारे रुपये पुरेनासे झाले, म्हणून स्वतः स्वतंत्रपणें कमाई करून खर्च भागविणें भाग पडूं लागलें. लहानपणापासून वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याची संवय झाली होती. त्यामुळें अधिक खर्च भागविण्यास वर्तमानपत्रीं लेख लिहिण्याचें काम सुरू केलें. 'इंदुप्रकाश' त्या वेळीं बायं-वुइकली असे, त्यांत दर अंकास एक कॉलम लेख लिहूं लागलों. त्याबद्दल मला दरमहा वीस रुपये मिळूं लागले. 'गुराखी' नांवाचें एक तेथें दैनिक निघत असे. त्यांतहि लेख लिहूं लागलों. त्याच्या मालकाकडून मला दरमहा तीस रुपये मिळूं लागले. याप्रमाणें दरमहा एकंदर सत्तर रुपये हातांत येऊं लागल्यानें मुंबईच्या सोकाजीच्या भपकेबाज राहणीनें मला राहतां येऊं लागलें. कॉलेजांत मी दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असतांना पुण्यास रँड व आयर्स्ट यांचे जे खून झाले त्याबद्दल टिळकांना 'केसरी'तील लेखाबद्दल दीड वर्षांची शिक्षा झाली. ते जूनमध्यें सुटले आणि लगेच मुंबईच्या 'गुराखी' वर्तमानपत्रावर जुलै महिन्यांत लेखाबद्दल हायकोर्टामध्यें खटला सुरू झाला. वास्तविक तो खटला 'गुराखी'चे मालक भाटे यांजवरच व्हायचा, परंतु त्यांनीं स्वतः सुटण्यासाठीं माझें नांव आणि माझें हस्तलेख पोलिसपुढें मांडल्यानें ते तर सुटले नाहींतच; पण मलाहि त्यांच्याबरोबर पोलिसमध्यें राजद्रोही लेखक म्हणून अडकून पडावें लागलें. माझें हस्तलेखच पुढें आल्यानें मला सुटून जाण्यास मार्ग राहिला नाहीं. पुढें खटला चालून भाट्यांना एक वर्षाची व मला सहा महिन्यांची, अशा शिक्षा १८९९ सालीं झाल्या. 'केसरी–प्रबोध' म्हणून जें 'केसरी'कर्त्यांनीं एक पुस्तक काढलें आहे, त्यांत आमच्या ह्या बंदिवासाची हकीकत आलेली आहे. झालें. एथेंच आमच्या शिक्षणाला पूर्ण-विराम मिळाला. कारण तुरुंगांतून सुटून आल्यावर पुन्हां कॉलेजांत शिक्षण घेण्यास जाण्याची सरकारकडून बंदी करण्यांत आली आणि त्यामुळें एकोणिसशें सालापासूनच्या माझ्या आयुःक्रमांत क्रांति झाली. कारागृहवासांतून मुक्तता झाल्यावर सहा महिनेपर्यंत, माझे बाळपणचे पुण्यांतील स्नेही श्रीमंत भास्करराव हरि पटवर्धन ऊर्फ आप्पासाहेब सांगलीकर यांच्याबरोबर दक्षिण हिंदुस्थानची सफर केली. वयाच्या चौदाव्या वर्षीं उत्तर हिंदुस्थानची तीर्थयात्रा वडिलांच्या बरोबर आधींच झालेली होती. माझे वडील १९०५ सालीं कैलासवासी झाले. मातोश्री त्या वेळीं हयात होत्या. माझ्या जन्मलग्नकुंडलीचा योग असा कीं,

दर सहाव्या वर्षी माझें कुटुंब निवर्तायचें आणि पुन्हां सहा महिन्यांत नवें कुटुंब, लग्न होऊन घरीं यायचें. याप्रमाणें माझ्या वडिलांनीं माझीं तीन लग्नें केलीं व चौथें लग्न माझ्या मातोश्रींनीं केलें. त्या लग्नाचीहि अशीच हकीकत आहे. तें लग्न माझ्या वयाच्या छत्तिसाव्या वर्षी झालें व बेचाळिसाव्या वर्षी कुटुंब निवर्तलें. त्या कुटुंबापासून मला जी संतति झाली त्यांपैकीं एक मुलगा सध्यां हयात असून त्याचें वय पस्तीस वर्षांचें आहे. तो सुविद्य असून सरकारी नोकरींत आहे. बी. ए. झाल्यानंतर त्यानें अभ्यास सोडला व माझी वृद्धावस्था झाली असल्यानें गृहप्रपंच चालवणें मजकडून अशक्य होऊं लागलें म्हणून त्यानें नोकरी धरली व आपल्या संसाराचा भार संभाळून माझें उत्तम प्रकारें पालनपोषण करण्याचें व्रत त्यानें चालविलें आहे. एथपर्यंत माझ्या गृह, प्रपंचादिकाची त्रोटक हकीकत सांगणें झाल्यावर आतां यापुढें माझ्या आयुष्याचें श्रेय ज्यामध्यें सर्वस्वीं सांठवलें गेलें आहे, त्या वाङ्मयसेवेसंबंधानें थोडक्यांत माझी हकीकत निवेदन करतों.

कविता करणें व गद्य लेख लिहिणें या दोन्ही गोष्टींची मला बाळपणापासूनच आवड आणि हौस वाटत असे. माझे वडील माझ्या बाळपणीं ‘ अरुणोदय ’, ‘ इंदुप्रकाश ’, ‘ ज्ञानप्रकाश ’, ‘ पुणें हेरल्ड ’, आणि मद्रासचे इंग्रजी ‘ स्पेक्टेटर ’ हीं वर्तमानपत्रें घेत असत. त्या पत्रांतून प्रसिद्ध झालेला मजकूर ते माझ्याकडून रोज नियमानें अर्धा तासपर्यंत वाचून घेत असत. ठसकेबाज कसें वाचावें हें त्यांनींच मला शिकविलें. त्या वेळीं कांहीं वर्तमानपत्रांतून माझे लेखहि ‘ लक्ष्मण ’ किंवा ‘ सौमित्र ’ या सहीखालीं प्रसिद्ध होऊं लागले होते. पण पुढें हें सर्व वातावरण बदललें जाऊन माझ्या आयुष्याला निराळेंच वळण कसें लागलें तें वर सांगितलेंच आहे. असो.

वर सांगितल्याप्रमाणें तुरुंगांतून माझी मुक्तता झाल्यावर आणि कॉलेजचें अपुरें राहिलेलें शिक्षण पुरें करण्याचा मार्ग बंद पडल्यावर, पुढचें आयुष्य कोणत्या मार्गाला लावावें हा प्रश्न मजपुढें उभा राहिला. विचारांतीं असें ठरविलें कीं, आपल्याला तीर्थरूपांनीं वाङ्मयाचें बरेंच शिक्षण दिलें आहे. त्याचा कांहीं स्वतंत्रपणें उपयोग करून घेतां आला तर पहावें. दैवयोगानें तोच मार्ग पुढें फळाला आला आणि त्याच मार्गाचें अवलंबन केल्यानें प्रभुकृपेनें माझ्या हातून, माझ्या समजुतीप्रमाणें बरीच वाङ्मयसेवा आजपर्यंत

घडली. मला माझ्या वडिलांच्या कृपेनें, त्यांच्यापासून अनेक विषयांचें तात्त्विक ज्ञान प्राप्त झालेलें होतें; त्याचें साहाय्य माझ्या इच्छित हेतूंना होण्यासारखें असल्यानें, अखेरीस वाङ्मयसेवाच करण्याचा मनाशीं निश्चय करून, त्या मार्गांत प्रविष्ट झालों व तोच मार्ग मला चांगला फलदायी झाला.

वाङ्मयसेवेंत मीं आतांपर्यंत सुमारें पन्नास वर्षें मानसिक श्रम करून जवळ-जवळ पावणेदोनशें, निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ लिहिले. त्यांपैकीं अद्यापि पंचवीस ग्रंथ कागदाच्या दुष्काळामुळें, कांहीं प्रकाशकांकडे व कांहीं माझ्या घरींच हस्तलिखितांत पडून राहिले आहेत. कागद भरपूर मिळूं लागतांच ते छापले जातील यांत मला संशय वाटत नाहीं.

माझें पहिलें पुस्तक नाटकरूपानें जगापुढें आलें व आतां अखेरचें वेद-रूपानें* जगापुढें येण्याचा पूर्ण संभव वाटूं लागला आहे. ऋग्वेद व अथर्ववेद हीं दोन पुस्तकें मीं गेल्या सात वर्षांत लिहून तयार केलीं आहेत. पैकीं ऋग्वेद कविताबद्ध केला असून अथर्ववेदाचें सान्वय गद्य भाषांतर केलें आहे. ऋग्वेदाच्या दहा हजार पांचशें पन्नास एकंदर ऋचा आहेत. प्रत्येक ऋचा एकाच श्लोकांत मराठी भाषेंत आणायची असा मानसिक संकल्प झाला असल्यानें, रचनेला जरा अधिक वेळ लागला. त्या रचनेंत सुमारें ब्यायशी वृत्तें उपयोगांत आणिलीं असून वर सांगितलेल्या ऋचांच्या इतकेच श्लोक ऋग्वेदाचे तयार केले आहेत व त्या ग्रंथाचें नांव ‘सुश्लोक ऋग्वेद’ असें ठेविलें आहे. या ग्रंथाची रचना ‘दैवतसंहिता’ रूपाची केली आहे. याचा अर्थ असा कीं, सर्व ऋग्वेदभर जे देवतांचे मंत्र इतस्ततः विखुरले गेले आहेत ते एकत्र आणून देवतांवर त्यांची कविताबद्ध रचना केली आहे. × अथर्ववेदाचें मात्र तसें केलें नाहीं. त्याचीं मूळचीं जशीं वीस कांडें आहेत तशींच तीं भाषांतरित केलीं

---

* हा ‘सुश्लोक ऋग्वेद’ श्री. जोशी यांनीं पं. सातवळेकर यांच्याकडे प्रसिद्धीसाठीं दिल्याचें ते सांगत. याचा विनियोग पंडितजींनीं कसा केला समजत नाहीं. —संग्राहक

× श्री. जोशी यांनीं अथर्ववेदाचें भाष्य-भाषांतर पुन्हां लिहावयास घेतलें होतें व त्याचीं वीस कांडें प्रस्तुत लेखकाकडे पुढील व्यवस्थेसाठीं दिलीं.

असून, प्रत्येक सूक्ताच्या व कांडाच्या शेवटीं त्यांतील विषयाची चिकित्सा केली आहे. हे दोन्ही ग्रंथ मित्रसाहाय्यानें थोडक्याच अवधींत वाचकांच्या हातीं पडण्याचा योग येणार असल्याचीं जागृतींतील स्वप्नें स्पष्ट होऊं लागलीं आहेत.ऽ

मीं आजपर्यंत विभिन्न अशा एकंदर एकवीस विषयांवर ग्रंथरचना केली असून, ते विषय पुढीलप्रमाणें आहेत :—

( १ ) इतिहास, ( २ ) कविता, ( ३ ) कादंबरी, ( ४ ) खेळ, ( ५ ) गणित, ( ६ ) चरित्र, ( ७ ) ज्योतिप, ( ८ ) धर्म, ( ९ ) नाटक, ( १० ) पाकशास्त्र, ( ११ ) पौराणिक कथा, ( १२ ) भाषांतर, ( १३ ) मंत्रशास्त्र व तंत्रशास्त्र, ( १४ ) वेद, ( १५ ) वैद्यक, ( १६ ) वीरकथा, ( १७ ) रंगकला, ( १८ ) शास्त्रीय निसर्ग तत्त्वें, ( १९ ) शालोपयोगी, ( २० ) संभोगशास्त्र, आणि ( २१ ) सुभाषित.

मी स्वतः गणेशभक्त असल्यानें हें एक प्रकारें विभिन्न प्रकारच्या एकवीस विषयांच्या वाङ्मयविषयाचें मोदकांचें वायनच माझ्याकडून सरस्वतीदेवीनें जगापुढें मांडविलें आहे, असें मी समजतों, आणि म्हणूनच ऋग्वेद मं. १, सू. १६४, ऋचा ४९ वी मध्यें दीर्घतमा औचथ्य नांवाच्या ऋषिवर्यानें सरस्वतीदेवीची जशी प्रार्थना केली आहे तशीच तिची प्रार्थना पद्यरूपानें यापुढें करून, हें माझें त्रोटक चरित्र चिंतामणि विघ्नेशाच्या स्वाधीन करतों.

[ शा. वि. ]

**रत्नांचा निधि चारुता फुलविता ज्ञाता महात्मा ध्रुवें।**
**पूर्णत्वेंच मनोरथा पुरविता कल्पद्रु जो वास्तवें ॥**
**देवी तोच सरस्वती स्तन तुझा प्यायास द्यावा मला।**
**प्रार्थी बालक अंबिके ! सुत तुझा सौमित्र सूरी भला ॥**

— ल. ना. जोशी ( १९ जून १९४७ )

---

ऽ प्रस्तुत लेखकानें बदलापूरचे श्री. ना. गो. चापेकर यांच्या साहाय्यानें श्री. जोशी यांचें हें हस्तलिखित प्रसिद्ध करविण्याची योजना करून, तसें श्री. जोशी यांना आश्वासन दिलें होतें. अथर्ववेदाचें त्यांचें भाष्य सायणभाष्याहून निराळें व स्वतंत्र आहे व यावरून जोशी यांची वेदपारंगतता दिसून येते, असें श्री. चापेकर यांचें मत आहे.

# ग्रंथांतील उतारे

— १ —

## महते रणाय।

वेदांत 'महते रणाय' हे शब्द वारंवार येतात. 'मोठें युद्ध चालू आहे, सावध राहून आपलें कर्तव्यकर्म करा' हा वेदोपदेश जीवन-संग्रामांत वाहात जाणाऱ्या मनुष्यमात्राला मार्गदर्शक आहे. प्रत्येक माणूस युद्धभूमीवर उभा आहे. कोणच्या ना कोणच्या तरी प्रकारानें तो युद्धांत गुरफटला गेला आहे; त्याची इच्छा असो वा नसो, त्याला युद्धांत रहावेंच लागतें. अन्यथा त्याचा जन्म निरर्थक होतो. तो युद्ध सोडून कोठें पळून जाणार? युद्धांत हिंसा अथवा अहिंसा यांची पाळणूक ज्याच्या त्याच्या मर्जीवर अवलंबून राहणारी आहे. ही गोष्ट साधारण माणसाची झाली. क्षत्रियाबद्दल तर विचारायलाच नको. त्याची युद्धावांचून स्थिति नाहीं, आणि विजयावांचून उन्नति नाहीं. त्याला युद्ध अनिवार्य आहे.

—(अथर्ववेद, कांड दुसरें, सूक्त पांचवें, स्पष्टीकरण — अथर्ववेदावरचें अप्रसिद्ध भाष्य).

— २ —

(मुजूमदार दाढी लावून भिक्षुकाच्या सोंगांत येतो)

**वजरबट्टू** —अहो-अहो दाढीकाका, जरा थांबा! मला तुमच्याशीं थोडं काम आहे.

**मुजूमदार** — परमेश्वरभक्तीशिवाय मी कोणाचीं कामं बिमं करीत नसतों.

**वजर०** — माझं काम कांहींएक करूं नका. फक्त मंगळवेढ्याचे मुजूमदार ह्या रस्त्यानें गेलेले जर तुम्हीं बघितले असतील तर बोला.

**मुजूम०** — मुजूमदार बिजूमदार मला कांहीं एक माहीत नाहीं.

**वजर०** — बिजूमदारांशीं मला काय करायचं आहे? मुजूमदारांबद्दल सांगा. तुम्हीं त्यांना बघितलें असावें असं वाटतं. कारण, मी तुम्हाला बघतों आहे.

**मुजूम०** — वा ; हा सिद्धांत फारच नामी ! पण ते कसे आहेत ते तुम्हीच सांगा ना !

**बजर०** — ते चांगले निरोगी, सुरेख अगदीं तुमच्यासारखे—

**मुजूम०** — ( दचकून ) म्हणजे ?

**बजर०** — दचकायचं कांहीं कारण नाहीं. अगदीं हुबेहुबच तुमच्यासारखे ते आहेत.

**मुजूम०** — अहो, म्हणजे काय ?

**बजर०** — ह्याचा अर्थ इतकाच कीं, तुम्हाला दाढी आहे आणि त्यांना ती नव्हती. आठदहा दिवसांत जर त्यांची दाढी एवढी वाढली असेल तर निराळी गोष्ट.

— ( संगीत दामाजी, अं. ४, प्र. २ ).

— ३ —

## भूपृष्ठावरील प्रकार

चालत असतां वसुंधरेवर दृष्टी लावून ।
अस्तगिरीच्या दरींत पडला रवि तो अडखळुन ॥ १ ॥
पहावया तें जमले अवचित किती नभीं तारे ।
थोर जनांचा पात पाहुनी कोण न हंसणारे ? ॥ २ ॥
परी पांखरें मात्र बिचारीं कष्टी होऊन ।
घरट्यांमध्यें बसती अगदीं किलबिल सोडून ॥ ३ ॥
मित्रवियोगें फिका होउनी कसा तरी आला ।
नभीं चंद्र परि घनपटलानें झांकी वदनाला ॥ ४ ॥
असो किती तो दुःखी किम्मत सृष्टिला न त्याची ।
गाढ नभींही मुखीं कळा ती खुलली हास्याची ॥ ५ ॥

( अस्तोदय कादंबरी, प्रकरण १० वें )

— ४ —

## थोरांचीं चरित्रें कशीं लिहावींत

ज्यांचें चरित्र लिहावयाचें त्यांचा निवळ स्तुतिपाठ करायचा नाहीं

किंवा केवळ दोषाविष्करण करीत बसायचें नाहीं, हा जो खऱ्या चरित्र-लेखकाचा मूळधर्म त्याचा मीं पूर्ण अवलंब केला आहे. मृताबद्दल अप्रिय अथवा प्रतिकूल बोलूं नये या सामान्य शिष्टाचाराला इतिहासासारख्या विषयांत स्थान नसल्यानें मीं तो प्रस्तुत पुस्तकांतून वगळला आहे. मृताचे नुसते गुण गावयाचे व त्याच्या अवगुणांवर पांघरूण घालावयाचें हा जरी अंधभक्तांचा न्याय असला, तरी प्रेम आणि द्रोह या दोहोंना फांटा देऊन, यापुढें गणपतरावांच्या आयुष्यक्रमाचें सत्यान्वेषक दृष्टीनेंच विवेचन केलें आहे. याचें कारण इतकेंच कीं, थोर माणसांचीं जीं चरित्रें जनतेपुढें मांडावयाचीं त्यांत दोन हेतू असतात. एक त्यांनीं ज्या गुणांच्या प्रतिभांवर थोरपणा संपादन केला, त्या गुणांचें अनुकरण करण्याची जनतेंत उत्कट लालसा उत्पन्न होईल अशा रीतीनें मृतांच्या अंगच्या गुणांचें यथार्थ आविष्करण करणें, व दुसरा—ज्या अवगुणांच्या योगानें मृताची कर्तृत्वशक्ति साधारणपणें कमजोर झाली, ते अवगुण टाळण्याचा लोकांना बोध मिळेल अशा प्रकारें त्या अवगुणांचें सहृदयतेनें पण स्पष्टपणें स्पष्टीकरण करणें. त्रयस्थ आणि निःपक्षपाती दृष्टीनें जें चरित्र लिहिलें जातें तेंच खरें बोधप्रद होतें.

—गद्यनाट्याचार्य गणपतरावांचें चरित्र
(प्रास्ताविक विषयप्रवेश)

* * *

पुरवणी :

# : १४ :

# महादेव गोविंद कोल्हटकर

प्रस्तुत उपेक्षित मानकऱ्याचें स्थान केरूनाना छत्रे यांच्या पूर्वीचें आहे. पण त्यावेळीं पुरेशा माहितीच्या अभावीं तेथे येऊं न शकल्याने आता पुरवणींत देत आहों. गेल्या शतकाच्या पूर्वार्धांत ज्या थोर व्यक्ती महाराष्ट्रांत चमकून गेल्या, पण ज्यांचा प्रकाश पुढे साहित्यलेखकांच्या नजरेंतून निसटला अशांपैकी महादेव-शास्त्री कोल्हटकर एक असल्याने त्यांना या चरित्रसंग्रहांत वगळून चालणार नाही.

कोल्हटकरांचें घराणें वांईचें. त्यांचे वडील गोविंदशास्त्री हे तेथील प्रसिद्ध ऐतिहासिक वैद्य कुटुंबाचे आश्रित. श्रीमंत नारायणराव वैद्य यांच्याकडे ते विष्णूची पूजा करून राहात. नंतर शके १७४२ त वैद्यांनी गोविंदशास्त्र्यांना एक स्वतंत्र घर राहण्यास करून दिलें. शास्त्रीबोवांना पांच मुलगे; त्यांत चरित्रनायक हे सर्वांत धाकटे होते.

महादेवाचा जन्म सन १८२२ च्या सुमाराचा. त्यांचें प्राथमिक शिक्षण वांईस झाल्यावर, पुण्याच्या संस्कृत पाटशाळेंत ज्योतिष व व्याकरण शिकले व नंतर १८४२ सालीं इंग्रजी शिकविण्याची सोय करण्यांत आल्यामुळे त्या वर्गांत ते दाखल झाले. त्यांचे सहाध्यायी कृष्णशास्त्री चिपळोणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, नानाशास्त्री आपटे, विष्णुशास्त्री पंडित यांसारखी पुढे प्रसिद्धीस आलेली मंडळी होती. या वर्गांत व मुंबईस एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट मध्ये इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर ते मुंबई प्रांताचे शिक्षणाधिकारी थॉमस कँडी यांना साहाय्यक म्हणून निरनिराळ्या कामांवर होते. मुंबईस १८४८ सालीं स्टूडण्टस लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी या नांवाने दादाभाई नवरोजींसारख्या कांही विद्याव्यासंगी व जनहितैषी सद्गृहस्थांनी एक संस्था काढली. या संस्थेची मराठी शाखा ‘ उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा ’ नांवाची जी होती तिचे पहिले

अध्यक्ष व्याकरणकार दादोबा पांडुरंग असून, उपाध्यक्ष आणि चिटणीस म्हणून महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर मोठ्या उत्साहाने काम करीत. या सभेच्या विद्यमाने त्यांनी पदार्थविज्ञानशास्त्रावर ६ व्याख्यानें दिलीं व तीं सभेच्या ‘ ज्ञान-प्रसारक ’ या मासिकांत पुढे क्रमशः प्रसिद्ध केलीं.

मुंबई सरकारच्या शिक्षामंडळाने १८५१ सालीं विश्रामबागवाड्यांतील पाठशाळा व बुधवारवाड्यांतील इंग्रजी वर्ग एक करण्याचें ठरविलें व ता. २ जून १८५१ रोजीं सदर अदालतीचे जज्ज वार्डनसाहेब यांच्या हस्तें या नव्या शाळेचा ( ‘ व्हर्न्याक्युलर कॉलेजचा ’ ) उद्घाटन समारंभ झाला. त्या वेळीं वार्डनसाहेबांनी कोल्हटकर यांच्यासंबंधी काढलेले गौरवाचे उद्गार मननीय वाटतील :

“ आज पहा, एथें एक गृहस्थ आहे त्याचें नांव महादेव गोविंदशास्त्री. यांस या शाळेचे मराठी भाषेचे प्रोफेसर नेमलें आहे. त्यांच्याप्रमाणें आज जें नवीन विद्यालय आपण स्थापीत आहों त्यामध्यें पुढें विद्यार्थी तयार होतील अशी आशा आहे.

यांनीं संस्कृत पाठशाळेंत संस्कृत विद्येचा अभ्यास केला, नंतर मुंबईस जाऊन तेथें अलफिनष्टन विद्यालयांत इंग्रजी विद्येचा अभ्यास केला. या योगानें साधारण शास्त्रीलोकांपेक्षां यांची योग्यता इतकी वाढली कीं अदालतींत शास्त्री यांची जागा मिळविण्याविषयीं जे उमेदवार मुंबईस परीक्षा द्यावयास येतात त्यांच्या परीक्षा घ्यावयाकरितां सरकारनें यांस नेमलें. व या खात्यांतील फार मोठी सदर अदालतींतील शास्त्र्याची जागा नुकतीच रिकामी झाली होती ती मिळण्याविषयीं महादेव गोविंदशास्त्री यांनीं अर्ज केला. परंतु एकाएकीं असें काम करण्याचा सरकारचा मनोदय नव्हता म्हणून ( म्हणजे जुने कामदारांची प्रतिष्ठा राखण्याकरितां ) ती जागा जुने शास्त्र्यांपैकीं शास्त्र्यास दिली. यावरून हें लक्षांत आणावें कीं दुसरे उमेदवाराप्रमाणें महादेवशास्त्री नव्हते. ज्या इंग्रेजी पुस्तकांत धर्मशास्त्रप्रकरण लिहिलें आहे त्या पुस्तकांतून इंग्रजी वकील जे शास्त्रार्थ बोलतात ते यांस समजतात. सबब ती जागा देण्याविषयीं सरकारास शिफारस झाली व जो स्वविद्या शिकून इंग्रजी अभ्यास चांगला करील तो कधीं पाठीमागें पडणार नाहीं. त्याचें उदाहरण हेंच आहे कीं महादेव गोविंद-

शास्त्री यांची या नवीन विद्यालयांत प्रोफेसरच्या प्रतिष्ठित जाग्यावर नेमणूक झाली आहे."

[ना. वि. जोशीकृत पुण्याचें वर्णन, १८६८]

या नव्या पुणें कॉलेजांत मेजर कँडी हे प्रिन्सिपाल होते. कॉलेजांतील वात्रट विद्यार्थ्यांनीं शिक्षकांवर पुढील संस्कृत श्लोक रचिला होता —

तत्रैव मेजरः क्यांडी प्रिन्सिपालो बहुवहाः ॥
प्रोफेसरो महादेवो शुध्याशुध्धौविवेचकाः ॥ १ ॥
सखारामौ च गौंडी च इदं मानेटरौ कृता ॥
नवीनायां व्यवस्थायां स्थापितौ ग्रीनमेगडुगलौ ॥ २ ॥

यांत प्रो. कोल्हटकरांचा शुद्धाशुद्धविवेचक हा गुण वर्णिला आहे. विद्याखात्यांत ते नंतर डेप्युटी इन्स्पेक्टर झाले व त्याच अधिकारावर असतांना त्यांचा अकालीं अंत झाला (१८६५).

शास्त्रीबोवांना संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांचें ज्ञान चांगलें होतें. "त्यांची शिकविण्याची शैली फार चांगली असे. त्यांची मराठी भाषा मला फार गोड लागे," असें बाबा पदमनजी आपल्या 'अरुणोदय' या आत्मचरित्रांत आपला इ. स. १८४७ सालचा एलफिन्स्टन स्कूलमधील अभ्यासाचा वृत्तांत देतांना सांगतात. त्या वेळीं कोल्हटकर त्या शाळेंत शिक्षक होते. त्यांनी १८४९ सालीं 'कोलंबसाचा वृत्तांत' मुंबईच्या अमेरिकन प्रेस-मार्फत प्रसिद्ध केला. रॉबर्टसनकृत 'हिस्टरी ऑफ अमेरिका'— पुस्तक दुसरें याचें हें भाषांतर आहे. हा कोलंबसाचा वृत्तांत शाळांतून क्रमिक पुस्तक म्हणून लागला असल्याने त्याच्या १८७३ सालापर्यंत चार आवृत्ती निघाल्या.

मूळ इंग्रजी ग्रंथावरून मराठींत तंतोतंत रसाळ भाषांतर करण्याचें कसब कृष्णशास्त्री चिपळोणकरांप्रमाणेच महादेवशास्त्री कोल्हटकर यांचें होतें. याचें प्रत्यंतर म्हणजे त्यांचें 'अथेल्लो' नाटकाचें भाषांतर. इंग्रजी ललित वाङ्मयावर 'धाडसाचा मराठी हल्ला' चढविणारे पहिले तेच होत. यापूर्वीं परशुरामतात्या गोडबोले यांनी संस्कृत नाटकांचीं भाषांतरें करण्याचा चांगला उपक्रम केला होता. पण संस्कृत भाषांतरापेक्षा इंग्रजी पुस्तकाचें व तेंहि शेक्सपीयरसारख्या जातिवंत आंग्ल नाटककाराच्या एका अत्यंत हृत्क्षोभकारक नाटकाचें मराठी धाटणीला साजेसें भाषांतर करणें फार कठिण काम. तथापि महादेवशास्त्री यांनी

त्यांत यश मिळविलें. दुर्दैवाने हें नाटक प्रसिद्ध होण्यापूर्वीच ते वारले. त्यामुळे त्यावरून त्यांचाच शेवटचा सफाईचा हात फिरण्याचें राहिलें. तरी पण त्यांचे भाचे – पुढे सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून प्रसिद्धीस आलेले – जनार्दन सखाराम गाडगीळ यांनी १८६७ सालीं इंदुप्रकाश छापखान्यांत तें छापून आपल्या मातुलाचें ऋण फेडलें.

निबंधमालाकार विष्णुशास्त्र्यांसारख्या थोर चिकित्सक व स्पष्टवक्त्या टीकाकारानेंहि इतकें सरस भाषांतर इंग्रजी अथेल्लाचें उतरेल असें आम्हांस वाटलें नव्हतें, असें प्रांजलपणें म्हटलें आहे. भाषांतर - प्रकाराचा हा एक आदर्शच मानला गेला हें योग्यच होतें.

कोल्हटकरांनी १८६२ सालीं लक्ष्मणशास्त्री हळबे, केशवशास्त्री गाडगीळ वगैरे सहकाऱ्यांच्या मदतीने 'इंदुप्रकाश' हें वर्तमानपत्र मुंबईस सुरू केलें होतें.

इंग्रजी अमदानीच्या अर्धशतकांत मराठी गद्यावर जसा इंग्रजीचा ठसा पडला त्याचप्रमाणे पद्यप्रकरणावरहि साहजिक पडला. सरकारी विद्याखात्याने मराठी क्रमिक पुस्तकांत घालण्यासाठी लहान लहान चुटकेवजा कविता लेखकांकडून करवून घेतल्या व त्यांचीं पुस्तकेंहि काढलीं. महादेवशास्त्री यांनी तयार केलेलें 'प्राकृत कवितेचें पहिलें पुस्तक' पुण्यास १८६० सालीं ज्ञानप्रकाश छापखान्यांत शिळाछापावर काढलेलें होतें. दुसरें पुस्तक पुढील सालीं मुंबईस गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत निघालें. यांत इंग्रजी कवितांचीं भाषांतरें–रूपांतरें दिसल्यास नवल नाही. या नवकवितांची जुन्या वळणाच्या लेखकांनी बरीच चेष्टाहि केली. 'अर्वाचीन मराठी साहित्य' ग्रंथांत माडखोलकर लिहितात, "इंग्रजी शिक्षणानें ज्याप्रमाणें बहुजनसमाजापासून अगदीं भिन्न असा सुशिक्षितांचा वर्ग निर्माण केला, त्याप्रमाणें त्यानें बहुजनसमाजाच्या परंपरागत वाङ्मयापासून अगदीं विसदृश अशी नवीन कविता निर्माण केली." तथापि कोल्हटकरांची काव्यरचना सुबोध व रसाळ आहे हें "कज्जेकफावती होवोत रस्त्यांत । असावी घरांत शांति मोठी ॥" यासारखा अभंग किंवा "एका लहान काळ्या मुंगीला गवसला बहु थोर । दाणा गोधूमाचा, परि उचलेना जरी करी जोर ॥" ही मुंगीची आर्या वाचल्यास पटेल. 'मराठी कवितेचें दुसरें पुस्तक' याचे ३ भाग १८६१ सालींच निघाले.

नाटक आणि काव्य याप्रमाणेंच शास्त्रीय विषयहि त्यांनी चांगला हाताळला आहे. चेंबर्सकृत Matter and motion यावरून 'पदार्थविज्ञानशास्त्र पुस्तक १ लें ( पदार्थ आणि चलन ह्याविषयीं )' याच वर्षी प्रसिद्ध झालें आहे.

महादेवशास्त्री यांच्या लेखनाप्रमाणेच त्यांचें वक्तृत्वहि विशेष शैलीचें होतें. त्यांचे समकालीन 'पुण्याचें वर्णन' कार श्री. जोशी या शैलीचें पुढील शब्दांत वर्णन करतात. "त्यांची लिहिण्याची शैली अजून कोणीं उचलली नाहीं. त्यांचें वक्तृत्व फारच सुरस असे; जसा नाग गारोड्याच्या पुंगीस भुलून त्याकडे सर्व तनमन लावून तल्लीन होतो त्याप्रमाणें यांचे श्रोते भुलत असत." ( पृ. ८० ).

हे गुण त्यांचे नातू अच्युत बळवंत ( वामन ) कोल्हटकर यांनी उचलले, तर दुसरे नातू नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांनी रंगेल नाटकी गुण उचलला. महादेवशास्त्र्यांचें अर्थल्लोचें भाषांतर इतकें उत्कृष्ट कां उतरलें याचें कारण निबंधमालाकार असें देतात कीं, "भाषांतरकर्त्याचा रंगेल स्वभाव हें एक; आणि दुसरें त्या नाटकाची निवड." तेव्हां आजोबांचा गुण नातवांत उतरावा हें क्रमप्राप्त म्हणतां येईल. तिसरे ( चुलत ) नातू श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी सर्वच साहित्यप्रकारांत आघाडी मारली. एवढेंच वाईट वाटतें की, या सर्व गुणी नातवांचा परिचय करून घेतांना महादेव गोविंद कोल्हटकर यांचें नांवहि आधुनिक साहित्यसेवकांना माहीत नसतें.

## ग्रंथांतील उतारे

— १ —

### कोलंबसाची निराशा

कोलंबसाचे आजपर्यंत जितके हिरमोड झाले त्यांमध्यें या हिरमोडापासून त्यास फारच दुःख झालें. तें असें कीं, प्रकाशाच्या अकल्पित किरणाप्रमाणें इसाबेल्ला राणीकडून कोलंबसास जें आमंत्रण आलें होतें, तेणेंकरून सिद्धि होण्याचे असे रंग दिसून आले कीं, त्यावरून कोलंबसास आतां आपले श्रमाची परिसमाप्तीच झाली अशी आशा धरायास उमेद आली होती; परंतु आतां अंधकार आणि अनिश्चय यांचें पुनः परावर्तन झालें तेणेंकरून, कोलंबसाचें मन दृढ निश्चयाचें असतांही, याच्यानें जें हें अकल्पित संकट प्राप्त झालें त्याचा धक्का सोसवेनासा झाला. इंग्लंदास जाण्याचा

एक शेवटचा उपाय राहिला होता तो करावा या बेतानें कोलंबस त्या दरबारांतून परम संतापानें बाहेर पडला.

—( कोलंबसाचा वृत्तान्त )

— २ —

## तारुण्य दशेंतील उमेदी ( ओंव्या )

[ प्रस्तावनेंतील उतारा :—"...इंग्रेजी कवितेंतील मासला एतद्देशीय लोकांस अद्यापि कळला नाहीं तो कळावा ह्या हेतूनें हें इंग्रेजी कवितेचें पद्यात्मक भाषांतर केलें आहे." ]

ज्ञानाच्या खाणी खणीत । जाऊन शिरावें विद्यादरींत ।
हिरून घ्यावें आदिशक्तीचें वित्त । ज्ञानभांडार लुटावें ॥ १ ॥
मग त्याच्या गर्भीं प्रवेशुनी । रत्नें काढावीं निवडुनी ।
राजमुकुटींच्या रत्नाहुनी । ज्याचें मोल आगळें ॥ २ ॥
धरूनि धर्मपथ अति उत्तम । सुरळीत चालवावा पुढील क्रम ।
सदाचार पूर्णसुखाचें धाम । आहे निश्चयें जाण पां ॥ ३ ॥
सद्बुद्धि धरूनि जाण । प्रगट करावें चांगुलपण ।
तेंचि आहे खरें भूषण । मनुष्याचें निश्चयें ॥ ४ ॥
आपुल्या मनाचें जाण । स्वर्गीच आहे मुख्य स्थान ।
यालागीं पृथ्वीच करावी सुखभुवन । स्वर्गापरी ॥ ५ ॥

—( प्राकृत कवितेचें पहिलें पुस्तक )

— ३ —

## लाप्लंदांतून आलेला प्रवासी ( ओंव्या )

थंड आणि नीलवर्ण नासिका । कपाळावरी सुरकुत्या देखा ।
आलां कोठून या कथानका । सांगा तुम्ही पांथस्थ हो ॥ १ ॥
रानें आणि हिममय पर्वत । लाप्लंद येथें असती बहुत ।
ज्यांतून रेन्दीअर धांवती त्वरित । तेथून आलों जाण पां ॥ २ ॥
जेथें श्यामवर्ण देवदार । सुरूसारखे वाढती सुंदर ।
आणि लहान लहान झुडपें फार । चोहींकडे दिसताती ॥ ३ ॥

रानससे आणि कावळे सारे । होऊन जातात अगदीं पांढरे ।
कारण भोंतीं वर्फाचि वारे । असतें त्यांच्या म्हणूनी ॥ ४ ॥
पारधी थंडीनें कुडकुडून । आस्वलांचीं सलोम चर्में फाडून ।
त्यांचे अंगरखे करून । हिमनिवारणा घालिती ॥ ५ ॥

— ( प्राकृत कवितेचें दुसरें पुस्तक )

— ४ —

## पदार्थांच्या औपाधिक धर्मांविषयीं

अप्रवाही, प्रवाही आणि वायुरूप अशा पदार्थांचीं जीं नानाप्रकारचीं सुंदर स्वरूपें या सृष्टींत आपल्या दृष्टीस पडतात त्यांस मुख्यत्वेंकरून दोन कारणें आहेत, एक आकर्षण आणि दुसरें अभिसरण. या दोन व इतर कारणांनीं जे पदार्थांच्या ठायीं चमत्कारिक धर्म उत्पन्न होतात त्यांस औपाधिक धर्म असें म्हणतात; कारण या धर्मांत उपाधीच्या योगानें फेरफार करितां येतात. औपाधिक धर्मांचीं नांवें – दार्ढ्य, सछिद्रता अथवा वैरल्य, संकोच्यता, स्थितिस्थापकता, प्रसरणशीलता, काठिन्य, भंगशीलता अथवा ठिसूळपणा, घनवर्धिष्णुता, तंतुभवनार्हता, आणि प्रकुट्यता अथवा चिंवटपणा.

—( पदार्थविज्ञानशास्त्र, १८६१ )

— ५ —

## पृथ्वीच्या ऐश्वर्याच्या मोबदल्यांत व्यभिचार

**देस्दिमोना :** — एमिलिये, सांग बरें तुझ्या मनाची खात्री आहे कीं अशा घाणेरड्या रीतीनें आपल्या नवऱ्यास फसविणाऱ्या नायका आहेत ?

**एमिलिया :** — कांहीं स्त्रिया अशा आहेत याविषयीं संशय नाहीं.

**देस्दिमोना :** — या सर्व पृथ्वीचें ऐश्वर्य जरी मिळत आहे तरी तूं हें असलें काम करशील का ?

**एमिलिया :** — कां, तुम्ही नाहीं करणार ?

**देस्दिमोना :** — मी तारांगणाच्या देखत सांगत्यें कीं करणार नाहीं.

**एमिलिया :** — मीदेखील तसेंच सांगत्यें कीं तारांगणाच्या देखत नाहीं करणार. अंधारांत केलें तर करीन.

**देस्दिमोना :**— काय, ही सर्व पृथ्वी मिळाली तर तूं असें काम करशील ?

**एमिलिया :**— पृथ्वी म्हटली म्हणजे फारच मोठी वस्तु. अशा अल्प स्वल्प दुराचरणाला मोठेंच मोल.

**देस्दिमोना :**— मला तर वास्तविक असें वाटतें कीं, तूं करणार नाहींस.

**एमिलिया :**— वास्तविकच मला असें वाटतें कीं मी करीन, आणि केल्यावर तें न केल्यासारखेंही करून टाकीन. पण मी ही गोष्ट एकादी अंगठी किंवा मलमलीचें वस्त्र किंवा पेहेरायाचा झगा किंवा आंगांतल्या बंड्या किंवा टोप्या किंवा अशाच कांहीं क्षुल्लक टुमदार वस्तु या मिळण्याकरितां करणार नाहीं, जर सगळी पृथ्वी मिळते आहे तर करीन. जर आपल्या नवऱ्याला राज्य मिळतें आहे तर व्यभिचार कोण नाहीं करणार ? मी तर करीन. याकरितां मी नर्कवास-देखील भोगीन.

**देस्दिमोना :**— समग्र जगाच्या प्रातीकरितां जरी मीं असें केलें तरी मला धिःकार असो.

**एमिलिया :**— कां बरें. आपल्या हातून जें पातक घडणार.तें या जगां-तलें पातक, आणि आपल्या श्रमाबद्दल आपल्याला जगच मिळालें म्हणजे तें आपल्याच जगांतलें पातक झालें. मग त्या पातकाचें पुण्य करायास उशीर किती ?

**देस्दिमोना :**— मला नाहीं वाटत कीं, अशी एखादी बायको असेल.

**एमिलिया :**— एकशी काय, अशा खंडीभर आहेत.

—( अथेल्लो नाटक, अं. ४, प्र. ३ )

* * *

## परिशिष्ट

# १८५७ पर्यंतची प्रसिद्ध झालेली उपेक्षित ग्रंथसंपत्ति

## कथात्मक वाङ्मय

### १. गोष्टी व कथा—

( १ ) बालबोध मुक्तावलि ( इसापनीति )-सखखन पंडित, तंजावर, १८०६. ( २ ) सिंहासनबत्तिशी–वैजनाथ शर्मा, श्रीरामपूर, १८१४. ( ३ ) पंचतंत्र–श्रीरामपूर, वैजनाथ शर्मा, १८१५. ( ४ ) हितोपदेश–वैजनाथ शर्मा, १८१५. ( ५ ) बाळमित्र, भाग १–२ — स. का. छत्रे, १८२८–१८३३. ( ६ ) इसापनीति कथा–स. का. छत्रे, १८२८. ( ७ ) वेताळपंचविशी–स. का. छत्रे, १८३०. ( ८ ) बोधकथा ( आ. २ री )–१८३१. ( ९ ) नवीन पंचोपाख्यान–ला. र. ओक, १८३६. ( १० ) नीतिदर्पण ( आ. २ री )–विष्णुशास्त्री बापट, १८३७. ( ११ ) नीतिकथा ( आ. ३ री )–१८३८. ( १२ ) बालोपदेश कथा ( आ. २ री )–विष्णुशास्त्री, १८३८. ( १३ ) शालोपयोगी नीतिग्रंथ–ह. के. पाठारे, १८४६. ( १४ ) बालोपदेश कथा–इंदूर, १८४९. ( १५ ) इसापनीति कथा–कँडी, १८५१. ( १६ ) शुकबहात्तरी–१८५२. ( १७ ) नीतिबोधकथा ( आ. ४ थी )–१८५६. ( १८ ) पन्दनामा–१८५८.

### २. आख्यानें व बखरी—

( १ ) बकासुराची बखर–रामचन्द्र शास्त्री, १८४५. ( २ ) चन्द्रहास्य बखर–१८४६. ( ३ ) भागवताची बखर–१८४७. ( ४ ) शालिवाहनाची बखर–१८४९. ( ५ ) नंदराजाची बखर–१८५१. ( ६ ) नलराजाची बखर – रामचन्द्र शास्त्री, १८५७.

### ३. फारसी गोष्टी व इतर—

( १ ) हातिमताई–कृष्णराव माधवराव, १८५४. ( २ ) बखत्यारनामा–नारायण केशव प्रभु, १८५५.

### ४. स्त्रीविषयक गोष्टी—

( १ ) स्त्रीचरित्र ( भाग १–४ )—रामजी गणोजी, १८५४.

**५. इंग्रजी गोष्टी—**

( १ ) बर्थोल्ड–भवानी विश्वनाथ कानविंदे आणि इतर, १८५४.

**६. कादंबरी—**

( १ ) यमुनापर्यटण–बाबा पदमनजी, १८५७.

**७. संकीर्ण गोष्टी—**

( १ ) चमत्कारिक गोष्टी–मिसेस फरार, १८३५. ( २ ) सदाचाराच्या गोष्टी–१८३५. ( ३ ) हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू ह्यांची गोष्ट–मिसेस फरार, १८३५. ( ४ ) बालमोतांतले शाळेचें वर्णन–१८३७. ( ५ ) बालबोध गोष्टी–मिसेस फरार ( आ. २ री )–१८३८. ( ६ ) वाटसराची गोष्ट–राघो नारायण देवळे, १८५३. ( ७ ) हत्तीच्या गोष्टी–कोंडो अमृत, १८५३.

## नाटकें

**संस्कृत—**

( १ ) प्रबोध चंद्रोदय–अमरापूरकर व बापट, १८५१. ( २ ) वेणीसंहार–परशुरामपंत गोडबोले, १८५७.

## निबंध–भाषणें–संवाद

( १ ) कुटुंबप्रवर्तननीति–मिसेसफारार, १८३५. ( २ ) मद्यादि पदार्थांपासून शरीर-बुद्धीस विकार होतात ते–१८३६. ( ३ ) मातृबोध–बाँबे ट्रॅक्ट सोसायटी, १८५२. ( ४ ) कुटुंबसुधारणा–बाबा पदमनजी, १८५५. ( ५ ) हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति–रामकृष्ण विश्वनाथ, १८४३. ( ६ ) दारू पिणाऱ्यास सुबोध–१८४६. ( ७ ) अम्मल करण्यापासून नाश–काशीनाथ थत्ते, १८५५. ( ८ ) अम्मल करणें वाईट–शि. स. खरे, १८५५. ( ९ ) दारूपासून अनर्थ–गोविंद नारायण माडगांवकर, १८५५. ( १० ) दारूपासून अनर्थ–भवानी विश्वनाथ कानविंदे, १८५५. ( ११ ) दारू व इतर कैफी पदार्थ निषेधक बोध–विष्णु घनःशाम, १८५५. ( १२ ) दुर्व्यसननिषेधक बोध–गंगाधरशास्त्री सहस्रबुद्धे, १८५५. ( १३ ) दारूपासून अनर्थ ( Evils of Intemperance )–जनार्दन रामचंद्रजी, १८५६.

## सत्य-नीतिपर ग्रंथ

( १ ) नीतिसंग्रह–ब. र. छत्रे, १८४५. ( २ ) चेंबर्सकृत शालोपयोगी नीतिग्रंथ–हरि केशवजी, १८४६. ( ३ ) सत्यनिरूपण–गोविंद नारायण माडगांवकर, १८५२. ( ४ ) व्यभिचारनिषेधक बोध–बाबा पदमनजी, १८५४. ( ५ ) नीतिसंवाद–गोविंद नारायण माडगांवकर, १८५७.

## राजकीय

( १ ) महाराष्ट्र देशांतील थोर लोक ह्यांशीं भाषण–१८४८. ( २ ) कामगार लोकांशीं संभाषण–गो. ह. देशमुख, १८५३. ( ३ ) हिंदुस्थानांत ब्रिटिश लोकांचें राज्य व पूर्वीचीं राज्यें यांचीं तुलना आणि हल्लीं उद्भवलेल्या बंडापासून होणारे फायदे-तोटे —( डोसाभाई फ्रामजीकृत गुजराथीवरून भाषांतर )— केशव सखारामशास्त्री, १८५७.

## संकीर्ण निबंध

( १ ) होळीविषयीं उपदेश–' निःपक्षपाती हिंदु ', १८४७. ( २ ) आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश ( आ. ३ री ), १८४७. ( ३ ) नामदार सर आर्स्किन पेरीसाहेब यांचें शिक्षामंडळीच्या शाळेंत भाषण ( भाषांतर ), १८४८. ( ४ ) शुचिर्भूतपणा–गोविंद नारायण माडगांवकर, १८४९. ( ५ ) सर पेरी व डॉ. जेम्स बर्नस यांचीं ग्रांट मेडिकल कॉलेजांतील व्याख्यानें ( मराठी तर्जुमा )– १८४९. ( ६ ) ऋणनिषेध बोध–गोविंद नारायण माडगांवकर, १८५०. ( ७ ) सरकारचे चाकर आणि सुखवस्तू हिंदुस्थानांतील साहेब लोकांशीं संभाषण, १८५०. ( ८ ) कामगार लोकांशीं संभाषण–गोपाळ हरि देशमुख, १८५३. ( ९ ) हिंदु लोकांच्या सणांविषयीं निबंध–बाबा पदमनजी, १८५३. ( १० ) विद्याभ्यास केलेल्या तरुणांस व्याख्यान–शा. दा. कुकडे, १८५५. ( ११ ) संवयी आणि अभ्यास–वि. ना. मंडलिक, १८५७.

## सामाजिक वाङ्मय

**१ स्त्री-शिक्षण—**

( १ ) स्त्रीविद्याभ्यास प्रकरण–१८४१. ( २ ) स्त्रीविद्याभ्यास–बाबा पदमनजी, १८५२. ( ३ ) स्त्रीविद्याभ्यासापासून लाभ–रामजी गणोजी, १८५२.

**२. विधवाविवाह—**

(१) पुनर्विवाहप्रकरण–१८४१. (२) विधवाश्रुमार्जन–दादोबा पांडुरंग, १८५७.

**३. संकीर्ण—**

(१) हिंदु लोकांच्या रीतिसुधारणाविषयीं बोध–गोविंद नारायण, १८५१.

## इतिहास

**१. मराठ्यांचा इतिहास—**

(१) रघूजी भोंसल्याची वंशावळ, श्रीरामपूर, १८१६. (२) मराठ्यांची बखर–कॅ. केपन, १८५१. (३) महाराष्ट्र देशाचें वर्णन–कुशाबा लिमये, १८४०. (४) रंगोबापूजी याची राजे प्रतापसिंह यांचेतर्फे कैफीयत–लंडन, १८४६. (५) नारायणराव याची बखर–१८६४.

**२. हिंदुस्थानचा इतिहास—**

(१) हिंदुस्थानचा इतिहास–बाळशास्त्री जांभेकर (एल्फिन्स्टनचें भाषांतर), १८४६. (२) हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास–बाळशास्त्री जांभेकर, १८४९. (३) भरतखंड पर्व–लोकहितवादी, १८५१.

**३. किरकोळ ग्रंथ—**

(१) श्रीक्षात्रियवंशोद्गममाला–शामराव मोरोजी, १८५५.

**४. अन्यप्रांत व संस्थानें—**

(१) गुजराथ देशाचा इतिहास–मॅकडोनल्ड, १८५०. (२) टिपू सुलतानची पदच्युति–चन्नपट्टण, मद्रास, १८५०. (३) कोल्हापूर प्रांताचें वर्णन–विश्वनाथ कृष्णनाथ, १८५७.

**५. इंग्लंडचा इतिहास—**

(१) इंग्लंड देशाची बखर, (भा. २)–१८३२–३४. (२) इंग्लंड देशाचें वर्णन–नाना नारायण, १८३५. (३) इंग्लंडचा वृत्तांत–हरि केशवजी, १८३८.

**६. परराष्ट्रांचा इतिहास—**

(१) आशुरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांतकथन–मॅडम विल्सन, १८३५. (२) मेदी आणि पार्शी लोकांचें वृत्तांतकथन–१८३८. (३) ग्रेकी लोकांचें

वृत्तांतकथन, १८३८. (४) प्राचीन मिस्री लोकांचें वृत्तांतकथन–मॅ. विल्सन, १८३९. (५) रोम शहराचा संक्षित इतिहास–त्रा. कृ. म्हाले, १८५७.

**७. जगाचा इतिहास—**

(१) जगाचा संक्षित इतिहास (भाग २)–ह. र. गाडगीळ, १८५२–५७.

**८. चरित्रें—**

(१) राजा प्रतापादित्याचें चरित्र–वैजनाथ शर्मा, श्रीरामपूर, १८१६. (२) शालिवाहन चरित्र–रघुनाथशास्त्री दात्ये, १८४०. (३) विक्रम चरित्र–हरिदास, १८४१. (४) कोलंबसाचा वृत्तांत–महादेव गोविंदशास्त्री, १८४९. (५) रोम बादशहाचा वृत्तांत, १८५१ (६) साक्रेतिसाचा इतिहास-कृष्णशास्त्री चिपळूणकर, १८५२. (७) नाना फडनवीस यांची बखर–ए. मॅकडोनल्ड, १८५२. (८) लुथराचा इतिहास, १८५२. (९) खुसरू राजाचा इतिहास–वि. मो. भिडे, १८५२. (१०) तेलेमेकस् ह्याचा वृत्तांत–ग. स. लेले, १८५३. (११) महमदाचा वृत्तांत १८५३.

## व्याकरण–भाषाशास्त्र

**१. मराठी व्याकरणें—**

(१) बालव्याकरण–बाळशास्त्री जांभेकर, १८३६. (२) महाराष्ट्र भाषेचें व्याकरण–गंगाधरशास्त्री फडके, १८३६. (३) मराठी भाषेचें व्याकरण–दा. पां. तर्खडकर, १८३६. (४) मराठी आणि इंग्रजी क्रियापदांच्या काळांचा परिपाठ-१८४०. (५) मराठी भाषेचें व्याकरण, अमेरिकन मिशन, अहमदनगर, १८४८.

**२. व्युत्पत्ति—**

(१) शब्दसिद्धिनिबंध–दिवेकर–महाजन, १८४३.

**३. इंग्रजी भाषा व्याकरणें—**

(१) इंग्रजी भाषणाचें ज्ञान मिळवावयासाठीं साह्यकारी–१८३१. (२) इंग्लिश भाषेच्या व्याकरणाची मूळपीठिका–रे. स्टीव्हेन्सन, १८३३. (३) वाक्यावली (इंग्रेजी आणि मराठी)–जॉन विल्सन, १८३३. (४) मरे याच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप–ग. ज. वसईकर, १८३७. (५) इंग्लिश व्याकरण आणि भाषण–सांप्रदायिक वाक्यें, १८५१.

**४. संस्कृत भाषा व्याकरण—**

(१) भाषामंजरी, १८४० (२) संस्कृत वाक्यरत्नावलि–स. अ. लेले, १८४५.

**५. हिब्रू व्याकरण—**

(१) इब्री भाषेचें व्याकरण–जॉन विल्सन, १८३२.

**६. कोश—**

(१) महाराष्ट्र भाषेचा कोश—शास्त्री मंडळी, १८२९. (२) महाराष्ट्र भाषेचा कोश–पुरवणी, १८३१. (३) मराठी इंग्रजी कोश–डॉ. करे, १८१०. (४) मराठी इंग्रजी कोश–केनेडी, १८२४. (५) मराठी इंग्रजी कोश–मोलस्वर्थ, १८३१. (६) मराठी इंग्रजी कोश, संक्षिप्त, १८५१. (७) इंग्रजी मराठी कोश–केनेडी, १८२४. (८) इंग्रजी मराठी कोश–कँडी व मोलस्वर्थ, १८४७. (९) संस्कृत–प्राकृत शब्दकोश–अनंतशास्त्री तळेकर, १८५३.

**७. म्हणी-पत्रलेखन—**

(१) फर्दुकवही, पुणें, १८४२. (२) लेखनपद्धतीचें बुक, पुणें, १८५०. (३) हेमाद्रीकृत लेखनकल्पतरु–सावरकर, १८५३.

**८. काव्य—**

(१) रुक्मिणी सैंवर–१८३६. (२) दुर्गास्तोत्र–१८४०. (४) लावण्या रागदारीच्या आणि साध्या–१८४८. (४) केकावलि–१८५१. (५) गंगालहरी–१८५१. (६) लावण्या, भाग १–रा. ब. कापडी, १८५४.

**९. अलंकारशास्त्र—**

(१) शब्दालंकार–गोपाळ हरि देशमुख, १८५१. (२) अलंकारविवेक–कृष्णशास्त्री राजवाडे, १८५३.

## धर्म–नीति–तत्त्वज्ञान

१. **श्रुति**—(१) त्रिविद्या त्रिगुणात्मिका – रे. स्टीव्हेन्सन, १८३३. २. **पुराणें**—(१) काशीखंड–गो. ह. केतकर, १८४५–४६. (२) विराटपर्व–१८५२. (३) श्रीमद्भागवताची संक्षित बखर–१८५४. ३. **धर्म**–(१) आशौचविचार–बा. भि. राजवाडे, १८४१. (२) हिंदुधर्मतत्त्व–गंगाधरशास्त्री फडके, १८५२. (३) आशौचगंगाधरी (प्राकृत)–गोपाळ, १८५४.

**४. ईश्वरज्ञान—**

(१) सृष्टिजन्य ईश्वरज्ञान–पांडुरंग गणोबा, १८४२.

**५. नीतिविषयक—**

(१) विदुरनीति–१८२३. (२) मराठी बोधवचनें (आ. ३ री)–१८३१. (३) नीतिज्ञान परिभाषा–कँडी (आ. २ री), १८३१. (४) नवीन लघु-हितोपदेश–१८४७. (५) वैराग्यशतक–१८४३.

**६. राजनीति—**

(१) वृक्षचाणाख्य–रानड्ये, भावळंकर व सबनीस, १८४७.

**७. तत्त्वज्ञान—**

(१) भगवद्गीतेचें सार–रॉबर्ट निज्बिट, १८३२. (२) गीताभावचंद्रिका (भगवद्गीता)–बाळजी सुंदरजी, १८३९. (३) गीतार्थबोधिनी–१८४२. (४) वामकृत ब्रह्मस्तुतीची टीका–१८४२. (५) आत्म्याचे अमरत्वाविषयीं–गोविंद गंगाधर, १८४६. (६) पदबोधिनी गीता–बा. श्री. क्षत्री, १८५३.

**८. सामान्य ग्रंथ—**

(१) काल्पनिक विज्ञानाविषयींचें संक्षेपेंकरून कथन—रे. स्टीव्हेन्सन. १८५२.

## शास्त्रीय व कलाविषयक वाङ्मय

**१. वैद्यक—**

(१) औषधकल्पनाविधि–जॉन मॅकलेनान्, १८२८. (२) निदान–जॉन मॅकलेनान्, १८२८. (३) निघंटप्रकाश–बापू गंगाधर जोशी, १८३९. (४) शारीर–जॉन मॅकलेनान्, १८५२. (५) विषविद्या–मॅकलेनान्–१८५२. (६) घातादिजन्यास्थिविकार–मॅकलेनान्, १८५३. (७) त्र्यंबकी–कृष्णशास्त्री भाटवडेकर, १८५४. (८) शार्ङ्गधर वैद्यक ग्रंथ–नागांवकर, १८५४.

**२. ज्योतिःशास्त्र—**

(१) भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद, १८३२. (२) भूगोलशास्त्र (गणितभाग भास्कराचार्यकृत)–बाळशास्त्री जांभेकर, १८३६. (३) सिद्धांतशिरोमणिप्रकाश–सुबाजी बापु, १८३६. (४) वीस वर्षांचें पंचांग–

वि. स. अग्निहोत्री, १८४५. (५) खगोलविद्या–अमेरिकन मिशन, १८४६. (६) ज्योतिषसार–ज. भा. क्रमवंत, १८४८. (७) ज्योतिषरत्न–वि. स. अग्निहोत्री, १८५३. (८) ग्रहलाघव–वा. कृ. जोशी व कृष्णशास्त्री गोडबोले, १८५६. (९) स्फुट ज्योतिष (आ. ४ थी)–१८५६. (१०) स्फुट ज्योतिष–रत्नागिरी, १८५७.

**२. हिंदुधर्मशास्त्र—**

(१) मिताक्षरा व्यवहाराध्याय व मयूखदायभाग–रघुनाथशास्त्री दांत्ये, १८४४.

**संकीर्ण कायदे—**

(१) पोलिस कायदा–जेम्स स्पीअर्स, १८५५. (२) गांवचे वहिवाटीविषयीं वही–ग. बा. माटे, १८५६. (३) न्यायाब्धिसेतु, भाग २–चितळे व आठल्ये, १८५६–५७.

**३. अर्थशास्त्र—**

(१) व्याज–बाळ रघुनाथ, १८४३. (२) लक्ष्मीज्ञान–गोपाळ हरि देशमुख, १८४९. (३) संपत्तिविवेचन–ना. बा. पटवर्धन, १८५३. (४) देशव्यवहार-व्यवस्था–पाठारे व मंडलीक, १८५४. (५) अर्थशास्त्र परिभाषा–कृष्णशास्त्री चिपळूणकर, १८५५.

**४. पदार्थविज्ञान—**

(१) सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद–हरि केशवजी, १८३३. (२) पदार्थविज्ञानशास्त्रांतील कितीएक विषयांवर व्याख्यानें–केरो लक्ष्मण छत्रे, १८५२. (३) पदार्थविज्ञानशास्त्र–के. ल. छत्रे, १८५५.

**५. रसायनशास्त्र—**

(१) रसायनशास्त्रविषयक संवाद–हरि केशवजी, १८३७.

**६. यंत्रशास्त्र—**

(१) शिल्पविद्या याविषयींचे निबंध–बेल आणि जोशी, १८३५. (२) पदार्थविद्या (शिल्पविद्या)–१८४६. (३) यंत्रज्ञान–१८५०. (४) यंत्रशास्त्राचीं मूळें– गो. गं. फडके, १८५३.

**७. शेतकी व बागाईत—**

(१) दाक्षिण देशांत तुतीचें झाड करण्याची व रेशमाचे किडे पाळण्याची व रेशीम उत्पन्न करण्याची रीति–जी. मट्टी, १८३८. (२) जागती ज्योत किंवा शेतपोत रीतभात याविषयीं वाद–रा. अ. दुगल, १८३८. (३) शेतकी आणि घरगुती व्यवस्था–गिबसन, १८४६. (४) व्यवहारदर्पण (शेतकी बागाईत)–शंकरशास्त्री गोखले, १८५२. (५) पश्वादि भूतदया–१८५३. (६) उद्भिज्जन्य-पदार्थ–गोविंद नारायण माडगांवकर, १८५६. (७) वृक्षवर्णन–गोविंद नारायण मांडगांवकर, १८५७.

**८. संगीत—**

(१) गायनप्रकाश–भाऊशास्त्री अष्टपुत्रे, १८५०.

**९. तर्कशास्त्र—**

(१) तर्कशास्त्र–अमेरिकन मिशन प्रेस, मुंबई, १८४६.

**१०. प्राणिशास्त्र—**

(१) कित्येक जनावरांचें वर्णन–१८३९. (२) जनावरांच्या गोष्टी–नारो रामचंद्र, १८५६.

**११. सृष्टिशास्त्र—**

(१) सृष्टींतील चमत्कार–गो. ना. माडगांवकर, १८५३.

**१२. भूप्रकृतिविद्या—**

(१) वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार–भाऊशास्त्री थेऊरकर, १८५७.

**१३. गणितशास्त्र—**

(१) गणितमार्ग (भाग २ रा)–जॉर्ज जर्विस, १८२६. (२) शिक्षामाला (भा. १-२)–जर्विस, १८२७–२८. (३) गणितशास्त्राच्या उपयोगाविषयीं संवाद–१८३५. (४) डमार्गन याचा बीजगणित मूळपीठिका–जर्विस, १८४८. (५) डमार्गन याचा अंकगणित मूळपीठिका याचें मराठी भाषांतर–जर्विस, १८५०. (६) सरळ रेघ आणि गोलीय त्रिकोणमिति–१८५४. (७) शंकुच्छेद–दा. नी. नगरकर, १८५६.

**१४. संकीर्ण ग्रंथ—**

(१) विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष या विषयांचे वाद–जॉर्ज जर्व्हिस, १८२९. (२) सारसंग्रह–१८३१. (३) शास्त्रीय ज्ञानदर्शन–स. रा. दीक्षित व विष्णु अमृतराव, १८५६.

## ख्रिस्ती वाङ्मय

[१८०७ सालापासून श्रीरामपूर येथें हें वाङ्मय निघत होतें]

(१) धर्मग्रंथ व प्रार्थना–४२ पुस्तकें. (२) हिंदु धर्मावर टीका–९ पुस्तकें. (३) बोधपर गोष्टी–संवाद–१२ पुस्तकें. (४) संकीर्ण–१५ पुस्तकें.

## संकीर्ण वाङ्मय

**१. प्रवास—**

(१) काशिप्रकाश म्हणजे महायात्रा वर्णन–शामराव मोरोजी, १८५२.

**२. भूगोल—**

(१) भूगोलविद्या–बाळशास्त्री जांभेकर, १८३६. (२) Marathi Atlas–दादोबा पांडुरंग, १८२७. (३) भूगोल खगोल–महादेवशास्त्री पुराणिक, १८५४. (४) रत्नागिरी जिल्ह्याचा नकाशा–शि. भा. काणे, १८५७.

**३. दळणवळणाचीं साधनें—**

(१) लोखंडी रस्त्याचें संक्षित वर्णन–कृष्णशास्त्री भाटवडेकर, १८५४. (२) लोखंडी सडकांचे चमत्कार–गोविंद नारायण माडगांवकर, १८५८.

**४. पाठमाला—**

(१) मराठी भाषेचें क्षेत्रफळ घनफळ–१८३८. (२) विद्योपक्रमाचा ग्रंथ–माधवराव मोरोजी व नाना मोरोजी, १८४८. (३) वाचनपाठमाला–कँडी, १८५०. (४) ज्ञानबोधक (पु. २ रें)–१८५२. (५) नवनीत–परशुरामपंत गोडबोले, १८५४.

**५. संस्कृत काव्यांचीं भाषांतरें—**

(१) अनंगरंग–पराडकर, १८४२. (२) गीतगोविंद १८५३. भाषा, धर्म, काव्य, नीति हीं सदरें पाहा.

**६. बैठे खेळ—**

( १ ) बुद्धिबळें खेळणारांचा मित्र–हरिश्चंद्र जोशी, १८५४. ( २ ) बुधबळाचा ग्रंथ–सी. रा. जुन्नरकर, १८५४.

**७. गृहव्यवस्था—**

( १ ) संसारचोपडी ( गुजराथी वरून )–पुणें, १८४७. ( २ ) बैठक चावडी–काळे, १८५६.

**८. इतर—**

( १ ) पल्लीपतनकारिका–१८४४. ( २ ) वृंदसतसयी–परचुरे–१८४५. ( ३ ) स्वप्नचिंतामणि–सातारकर, १८४८. ( ४ ) स्वप्नाध्याय–रा. स. जोशी, १८४९. ( ५ ) पुष्पवन–१८५१. ( ६ ) बॉम्बे असोशिएशन सभेचें हकीकतीचें पुस्तक–१८५२. ( ७ ) बॉम्बे असोशिएशन सभेची पहिली अर्जी–१८५२. ( ८ ) बॉम्बे असोशिएशन सभेची दुसरी अर्जी–१८५३. ( ९ ) पाडवही ( Table of Wages )–१८५७.

## मासिकें

( १ ) दिग्दर्शन–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, १८४०. ( २ ) ज्ञानचंद्रोदय–पां. बा. जोशी पावसकर, मुंबई, १८४०. ( ३ ) उपदेशचंद्रिका–मोरभट दांडेकर, मुंबई, १८४४. ( ४ ) मराठी ज्ञानप्रसारक–मुंबई, १८५०. ( ५ ) चंद्रिका–मुंबई १८५४. ( ६ ) त्रैमासिक ज्ञानदर्शन–भाऊ महाजन, मुंबई, १८५४. ( ७ ) सुमित्र ( स्त्रियांसाठीं )–मुंबई, १८५५.

## वृत्तपत्रें

( १ ) दर्पण–बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, १८३२. ( २ ) प्रभाकर–भाऊ महाजन, मुंबई, १८४०. ( ३ ) ज्ञानोदय ( पाक्षिक )–मुंबई, १८४२. ( ४ ) ज्ञानप्रकाश–पुणें, १८४९. ( ५ ) धूमकेतु–भाऊ महाजन, मुंबई, १८५१. ( ६ ) विचारलहरी–कानविंदे, मुंबई, १८५४. ( ७ ) सद्धर्मदीपिका–बापू सदाशिवशेट, १८५५. ( ८ ) वर्तमानसंग्रह–विश्वनाथ कृष्णनाथ, कोल्हापूर, १८५५.

* * *

अनुक्रम ७३८२८ दि: ६।९।६१
क्रमांक ९८०४ नों: दि: ६-३-७९

REFBK-0009295

मूल्य अडीच रुपये

## आमचीं कांहीं आगामी प्रकाशनें

- जगांतील थोर धर्म

  —बा. ग. जगताप

- नादलुब्धाच्या आठवणी

  —ना. सी. फडके

- विचार-मंथन

  —श्री. म. माटे

व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २